# माणूस

शनिवार
२२ जुलै १९७२
पन्नास पैसे




मल्टिपर्पज शिकार !

# आवाहन

धुळे जिल्ह्यात सुमारे चाळीस टक्के लोकसंख्या भिल्ल आदिवासींची आहे. तापी नदीच्या सुपीक खोऱ्यातल्या जमिनीवर मात्र कबजा आहे बाहेरून आलेल्या सधन शेतकऱ्यांचा आणि जमीनदारांचा. पूर्वीचे वन्य जीवन उध्वस्त झालेला व दारिद्र्य आणि दडपणुकीत सापडलेला आदिवासी समाज एकीकडे आणि विपुल निसर्गसंपत्ती, ट्रॅक्टर्स व त्यांचे मालक दुसरीकडे, असे मनाला खुपणारे चित्र शहादे-तळोदे तालुक्यांमध्ये दिसत आहे.

आदिवासींच्या जमिनी स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक प्रकारे दुसऱ्याकडे गेल्या. बळाचा प्रयोग, गहाणखत, बेहिशेबी कर्ज वगैरे अनेक प्रकार यात होते. याशिवाय शेतमजूर व सालदार म्हणून काम करणाऱ्या आदिवासींची परिस्थिती तर अधिकच बिकट आहे. अनेक दिवस ओळीने उपास काढण्यापलिकडे ते काही करू शकत नाहीत.

निदान आतापर्यंत तरी करू शकत नव्हते.

गेल्या वर्षी पाटीलवाडी प्रकरणी आदिवासींवर झालेल्या गोळीबारात एक भिल्ल मरण पावला आणि या भागाकडे सर्वांचे लक्ष वेधले. तेथल्या भिल्लांमध्ये तीनचार वर्षे काम करत असलेल्या श्री. अंबरसिंग सुरतवंती यांना भिल्लांमध्ये स्थान होते. सर्वोदयाचे श्री. गोविंदराव शिंदे यांनी या भागाकडे मोर्चा वळवला. 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर तेथे गेले आणि सोमनाथचे व मुंबई-पुण्याचे काही तरुण शहाद्यात काम करण्यासाठी ईर्ष्येने उतरले. महाराष्ट्र भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी परिषदही कामात सहभागी झाली. या वर्षाच्या जानेवारी-पासून तेथे कार्य चालू आहे. वर्षानुवर्षांच्या अज्ञानातून व दडपणुकीतून आदिवासी खडबडून जागा होत आहे, संघटनेचे महत्त्व जाणून घेत आहे व स्वतःच्या पायावर उभा राहून माणसासारखे जगण्याचा हक्क मागतो आहे.

गेल्या नोव्हेंबरात सर्वोदय कार्यकर्त्यांनी केलेल्या पाहणीत गेलेल्या जमिनींची नोंद करण्यात आली होती. ३० जानेवारीला शहाद्यात पाचसहा हजारांची सभा झाली. बेकायदा बळकावलेल्या जमिनी ताब्यात घेण्याचा कार्यक्रम देण्यात आला. सोमनाथ व पुण्यामुंबईहून आलेले श्री. कुमार शिराळकर, दीनानाथ मनोहर, माधव

[ मलपृष्ठ १ वर ]

माणूस
शनिवार
२२ जुलै १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : आठवा

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

प्रकाशित लेख, चित्रे
इत्यादींबाबतचे हक्क
स्वाधीन. अंकात व्यक्त
झालेल्या मतांशी 'माणूस'
साप्ताहिकाचे चालक
सहमत असतीलच
असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे
काल्पनिक.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## शाही शिकार
## एक मुक्त चर्चा

श्री. रामभाऊ म्हाळगी
श्री. केशवराव धोंडगे
श्री. वि. कृ. टेंबे
श्रीमती मृणाल गोरे
श्री. श्री. शं. ऊर्फ काकासाहेब नवरे
श्री. नीळकंठ खाडिलकर
श्री. मधू शेटचे




बहुविधता !

मी (मा. वसंतराव नाईक) जंगलात जातो त्यावेळी तेथील आदिवासींना भेटतो व त्यांची गाऱ्हाणी ऐकून ती दूर करण्याचा प्रयत्न करतो.

(केसरी, ११ जुलै)

जंगलात मी केवळ शिकारीला जात नाही. माझी ही भेट 'मल्टिपर्पज' असते. जंगलातील आदिवासी जनतेच्या संपर्कासाठी, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेण्यासाठी माझ्या या मुक्कामाचा मी उपयोग करून घेत असतो.

(म. टा., ११ जुलै)

## बाराही महिने आंठ मैलांवरून पाणी !

कोळशापासून थोड्या अंतरावर पांढरपोणी हे आदिवासींचे गाव आहे. त्याच जंगलात १०० वर्षांपासून आदिवासींनी श्रम करून जमीन चांगली बनवली आहे. त्यांना ह्या इथून आता हटवले जाणार आहे. तसे फर्मानच निघाले आहे. ह्या आदिवासींच्या घरावर छपरे नाहीत. अंगावर पूर्णपणे झाकण्याएवढीही वस्त्रे नाहीत.

ह्या लोकांना बाराही महिने ८ मैलांवरून पाणी आणावे लागते. वीज नाही, रस्ते नाहीत. दीडशे वर्षे हे असेच रहात आहेत.

मोहाच्या फुलाच्या भाकऱ्या खातात. एक प्रकारचा विषारी कांदा साफसूफ करून खातात. साफ करताना चूक झाली तर विष बाधते, अंगावर चट्टे उमटतात. (माणूस, १३ मे)

# पुन्हा एकदा
# शाही आणि माल्टिपर्पज शिकार

निळू दामले हे एक फिरस्ते तरुण लेखक. आपल्या कामासाठी महाराष्ट्रात ते सर्वत्र हिंडत असतात. हा लेखक काळा का गोरा हे अजून मी पाहिलेले नाही. कोणत्याही वृत्तपत्राचे ते वार्ताहर वगैरे नाहीत. त्यामुळे मुद्दामहून काही खमंग व स्फोटक प्रकरण हुडकून काढून लोकांमध्ये खळबळ माजविण्याची तशी काही निकड त्यांना कधी भासत नाही. मुक्तपणे जे दिसेल त्यावर विचार करतात, लहर लागलीच तर लिहून काढतात. लिहिलेले प्रसिद्धीला पाठवतात असेही नाही. कधीकधी पाठवतातही. यात कुठलाही नियम नाही, बंधन नाही. पैसे किंवा प्रसिद्धी मिळवण्याची, कुणाची लफडी-कुलंगडी काढण्याची विकृत हौस नाही. आपल्याला खुपलेली, खटकलेली एखादी गोष्ट प्रांजळपणे सांगणे एवढाच त्यांच्या क्वचित्प्रसंगी प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणामागील उद्देश असतो.

'माणूस 'ला पाठविलेल्या एका पत्रात (दि. १९-५-७२) त्यांनी लिहिले आहे–

समाजवादी चळवळीशी संबंधित असा मी युवक आहे. सारखा फिरत असतो. अशाच भटकंतीतला कच्छमधला लेख आपण तीन वर्षांपूर्वी छापला होतात.

अनुभव घेण्याच्या आड कोणतीही गोष्ट येऊ नये ही काळजी घेतो. त्या अर्थाने मी मुक्त आहे, राहू मागतो.

म्हणूनच, कान आणि डोळे सदैव उघडे ठेवूनच वावरतो, कानावर हात नाहीत, डोळ्यावर चष्मा नाही.

एक तर मला जाणवणाऱ्या गोष्टी इतरांना जाणवत नसाव्यात आणि जाणवत असल्याच तर त्या समाजासमोर ठेवण्याचे भान, हिंमत नसावी.

म्हणूनच कधीकधी लिहितो. (लोकांसाठी)...स्वत:साठी लिहिणे मात्र अव्याहत चालूच असते...

'शाही शिकार' हे माणूसमध्ये प्रसिद्ध झालेले निळू दामले यांचे लिखाण

(दि. १३ मे १९७२) हे एका संवेदनाशील व्यक्तीचे लोकांसाठी लिहिलेले एक मुक्तचिंतन होते.

ते मुक्त होते म्हणूनच फार परिणामकारक ठरले असावे. ते सरळ व थेट जाऊन तावडतोब भिडले. कांही इंग्रजी वृत्तपत्रातून त्याचे अनुवादही प्रसिद्ध झाले. महाराष्ट्र विधानसभेत आमदार श्री. रामभाऊ म्हाळगी यांनी या प्रकरणी कपात सूचना मांडली. मुख्यमंत्री मा. वसंतरावजी नाईक यांना यावर खुलासा करण्याची आवश्यकता भासली. बोलण्याचालण्यात, पत्रलेखकांच्या लिहिण्यात हा विषय वरचेवर निघू लागला ते वेगळेच.

'माणूस'च्या मुंबई प्रतिनिधीने याविषयी काही व्यक्तींशी चर्चा केली. या व्यक्तींना विचारण्यात आलेले प्रश्न ढोबळ मानाने असे होते–

१ : १३ मेच्या 'माणूस'च्या अंकात 'शाही शिकार' हा लेख प्रसिद्ध झाला. त्यात मुख्यमंत्र्यांनी शिकारीसाठी शासनयंत्रणेचा जो वापर केला त्यासंबंधीचा मजकूर आहे. विधानसभेत कपात सूचनेवर बोलताना त्यांनी शिकारीच्या खर्चाबावत खुलासा केला. **पण 'माणूस'मध्ये आलेल्या घटना घडल्याच नाहीत असा इन्कार केलेला नाही.** यावरून त्यांनी शासनयंत्रणेचा गैरवापर केला नाही असे आपल्याला वाटते का ?

२ : मुख्यमंत्र्यांसारख्या अधिकारपदावर असलेल्या व्यक्तीने शिकारीसारखा शाही शौक करावा का ?

३ : शिकारीचा खर्च आपण व्यक्तिगतरीत्या केला असे नामदार मुख्यमंत्री म्हणाले. शिकारीसारख्या गोष्टीवर एवढा खर्च केला जाणे आपल्याला योग्य वाटते का ? शिकारीच्या निमित्ताने पोलीस व इतर शासकीय अधिकारी यांच्यावर जी फार मोठी रक्कम खर्च करण्यात आली त्यावर आपले भाष्य काय आहे ?

४ : आपला शिकारीचा दौरा 'मल्टि पर्पज' असतो असेही श्री. वसंतराव नाईक म्हणाले. प्रत्यक्षात असे घडत असावे असे आपल्याला वाटते का? आदीवासी लोकांनी आपली गाऱ्हाणी सांगायला तेथे जाणे, ही गाऱ्हाणी दूर करण्यासाठी अधिकारी वर्गाने मुख्यमंत्र्यांच्या अवतीभवती असणे, मुख्यमंत्री महाशयांनी शिकार करणे व विश्रांती घेणे याचा ताळमेळ कसा बसवायचा ?

या प्रश्नांसंबंधी विविध व्यक्तींच्या प्रतिक्रिया अर्थातच विविध स्वरूपाच्या होत्या. थोडक्यात त्या पुढीलप्रमाणे आहेत–

## आमदार श्री. रामभाऊ म्हाळगी (जनसंघ)–

मुख्यमंत्र्यांना शिकारीचा छंद आहे याबद्दल मुळीच तक्रार नाही. ते एक उत्तम


'मार्मिक' वरून
सौजन्याने

□
□




शिकारी आहेत. विश्रांतीसाठी ते जंगलात गेले याबद्दलही आमची तक्रार नाही. आमची तक्रार या शिकारीसाठी शासकीय यंत्रणेचा वापर झाला व सार्वजनिक पैशांची उधळपट्टी झाली ही आहे. या शिकारीच्या वेळी जिल्हा परिषदा, बँका, विविध खाती यांच्या अनेक जिप्स या जंगलात आल्या होत्या. शे-दीडशे पोलीस सात दिवस राबत होते. जंगलखात्याचे अनेक अधिकारी धावपळ करीत होते. हे सार्वजनिक जीवनातील शुद्धतेच्या संकेताविरुद्ध आहे. हीच खरी तक्रार आहे. 'वन्य श्वापदांचे संरक्षण करा' असे सांगणाऱ्या सरकारच्या प्रमुखाने वाघासारखे वन्य श्वापद मारावे हे योग्य नव्हे.

मुख्यमंत्र्यांनी यावर दिलेले उत्तर असमाधानकारक आहे. शिकारीसंबंधात जे मुद्दे उपस्थित करण्यात आले त्याला त्यांनी बगल दिली. आपल्या वैयक्तिक व्यवहाराला त्यांनी तात्विकतेचा मुलामा दिला. आदिवासींना भेटायला जाणे वगैरे प्रकारचा त्यांचा खुलासा केवळ असमाधानकारकच नसून शासकीय यंत्रणेला मार्गदर्शन करण्यात थिटा पडलेला आहे.



## आमदार श्री. केशवराव धोंडगे (शेतकरी कामगार पक्ष)—

नामदार मुख्यमंत्र्यांनी शिकारीच्या छंदाचा विधानसभेत पुरस्कार करून दिलदारपणा दाखविला. या शिकारीच्या मोहिमेतील सत्य घटना त्यांनी सभागृहाला सांगितल्या असत्या तर शिकाऱ्याच्या मर्दपणाला ते शोभले असते पण त्यांनी सभागृहात सत्याचीच शिकार केली.

शिकारीचा छंद काही मंत्र्यांसाठीच राखीव नाही. हा छंद गुराख्यालाही प्यारा असतो, अगदी मुख्यमंत्र्यांपेक्षा अत्यंत जिव्हाळयाचा वाटतो व त्यासाठी तो शिकारीच्या मर्दुमकीचा मनमुराद आनंद स्वपुरुषार्थाने लुटतो. या गुराख्याच्या तैनातीला कुठे असते आमदार मुख्यमंत्र्यांच्य सोबात असणारी शहेनशाही 'वसंत सेना' व नोकरांचा फौजफाटा. तो विचारा गुराखी ना! ना. मुख्यमंत्र्यांचे त्यांच्या शिकारीच्या छंदाबाबत मनःपूर्वक अभिनंदन. त्यांनी जंगलात जशी श्वापदांची शिकार केली तशी राजकीय क्षेत्रातही कुशलतेने शिकार करून आपल्या शिकारीचे कौशल्य त्यांनी दाखविलेच ना!

अधिकारावर राहून शिकारीचा छंद पूर्ण करून त्यांना खऱ्या अर्थाने शिकाऱ्याची तृप्ती मिळणे अशक्य आहे. म्हणून त्यांनी या साठाव्या वर्षी सत्तात्याग करून उर्वरित आयुष्य आदिवासींच्या जीवनात समरस होत शिकार करीत घालविण्याचा निर्धार केला तर त्यांचा सर्व विश्वात जयजयकार होईल आणि या वसंत नावाच्या खऱ्या निष्कामयोगी, आदिवासीप्रेमी, मर्द शिकाऱ्याने सत्ता मोहाचीही शिकार केली असा लौकिक त्रिखंडात दरवळेल.

त्यांनी त्यांच्या शहेनशाही शिकारीचे व त्यांच्यासाठी राबलेल्या वसंतसेनेचे कितीही समर्थन केले तरी त्यांचीच शिकार सभागृहात झाली, ही वस्तुस्थिती आहे. येथे हा वसंत शिकारी मात्र उघडा पडला. आदिवासींची सेवा आणि तिही या माध्यमातून...? महात्मा गांधींनाही या माध्यमाचा हेवा वाटावा असा हा साक्षात्कारी शिकारी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आहे हे आपले केवढे थोर भाग्य आहे !

तेथे उपस्थित असलेला लवाजमा आणि झालेला खर्च हा वसंत शिकाऱ्याच्या शिकारीवरच झाला, यासाठी संशोधनाची गरजच काय ? स्वत: खर्च केल्याचे औदार्यही नामदार मुख्यमंत्र्यांनी दाखविले. सभागृहातील सर्वपक्षीय सभासदांची एक समिती नेमून त्यांच्या शिकारी जगाची फिल्म जर काढली तर या शिकाऱ्याच्या औदार्याची किंमत जगाला कळेल. याला शासनाची तयारी आहे काय ?

गाडीबरोबर नरसाळ्याची यात्रा तशीच शिकारीबरोबर आदिवासींची सेवा हा नवसिद्धांत खासच चिंतनीय आहे. वसंत कुटुंबातील सर्वच मंत्र्यांनी आपापल्या छंदाबरोबर जनसेवा करण्याचा पायंडा पाडल्यास या राज्याचे काय होईल हो ? आदिवासींची सेवा शिकारीच्या वेळातच करता यावी यातच आदिवासींच्या सेवेचे मर्म सामावलेले आहे.

आता सचिवालय व वर्षा बंगला उचलून निबिड जंगलात नेऊन ठेवावा. म्हणजे शिकार करता करता सगळ्या समाजाची नामदार मुख्यमंत्र्यांना सेवा करता येईल.

काही मंत्र्यांनी कॅबरेचा छंद लावून घेतला आणि कॅबरे पहात पहात जनसेवा करण्याचा आग्रह धरला तर त्याला प्राधान्य मिळेल का ?

काहीही असो. ना. मुख्यमंत्र्यांनी शिकारीसंबंधी केलेली मल्लीनाथी हास्यास्पद व वस्तूस्थितीला सोडून आहे.

शेवटी असेच म्हणावे लागेल. बा शिकाऱ्या कर मजा आणि दे आदिवासी जनतेला मुक्ती !

## आमदार श्री. वि. कृ. टेंबे (सत्तारुढ कॉंग्रेस)–.

शिकारीच्या निमित्ताने शासनयंत्रणेचा गैरवापर झाला असं म्हणणं चुकीचं आहे परंतु शासन यंत्रणेवर खर्चाचा जो भार पडला तो मात्र गैरच आहे. आपल्या

पृष्ठ ६० वर

# अय्यो ! मंद्रास्स !

# जुलमाचा राम राम !

नलिनी अंबाडे

समजा, पोरंबाळंवाल्या पालकांना विचारले, की 'वर्षातील दिवाळखोरीचा महिना कोणता ?'–कालपर्यंत तरी समस्त पालकांनी उत्तर दिले असते, 'दिवाळीचा!' पण आता काळ बदलला आहे. सध्याचा जमाना पालटला आहे. हाच प्रश्न पालकांना विचारला तर, ते सांगतील 'जुलै महिना–शाळा, कॉलेजे उघडण्याचा महिना ! दिवाळखोरीचा महिना !' खरे आहे ते. दोन आण्याची स्लेटपाटी हातात देऊन, शेजारच्या शाळेत जाणाऱ्या कुणा पोराबरोबर आपलेही कारटे पिटाळून देण्याचे दिवस गेले. उन्हाळ्याच्या सुटीत, जन्मतारखेचा दाखला व पाकीटात एक मोठी नोट ठेवून, दारोदार हिंडण्याचे दिवस पालकांवर आज आलेत खरे ?

बालवर्गात असो वा 'केजी'त असो, मुलाला ॲडमिशन देणे म्हटले, की 'स्वयंस्फूर्त देणगी' आलीच ! देणगीचा आकडा शाळेच्या वा तुमच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून नसतो, तर दाराशी असणाऱ्या गर्दीवर ! झाले, देणगी, प्रवेश-फी, टर्म-फी अशांमध्ये पहिली मोठी नोट संपून जाते. विशी कापडाचाच ठराविक युनिफॉर्म, बूट-मोजे, टॉय, बॅच, पुस्तकांची पेटी ह्यांमध्ये दुसरी नोट संपते ! पगारातून राहिलेली तिसरी शेवटची नोट जपून ठेवावी म्हणावे तर.. ? वह्या-पुस्तके, कंपासपेटी, रंगपेटी, बसपास, टिफिन बॉक्स, पेन अन् खोडरबर ह्यांमध्ये केव्हाच तिचाही निकाल लागतो. बिचारा बाप हा फटका ॲडजेस्ट करण्यात तीन महिने अपेक्षित धरतो, तर तेवढ्या किमतीत चिरंजीव बोलायला शिकतात, 'या मॅन ! नो मॅन !!'

कल्पना करा, हेच पाल्य मॅट्रिक होऊन, कॉलेजला जाणारे असेल तर ? तर, तसा फारसा फरक नाही म्हणा. फक्त एका पूज्याचा. म्हणजे 'केजी'साठी दोनशे, अडीचशे ना ? तर त्यावरच एक पूज्य ! अहो, तुमच्या महाराष्ट्रातील 'कॅपिटेशन फी'चे चालू बाजारभाव आपल्याला ठाऊक नाहीत हं. हे भाव आहेत केरळातील–मद्रासमधील. 'शेड्यूल्ड कास्ट'मध्ये न जन्म घेण्याचा गुन्हा केला असेल तर सरकारी कॉलेजाचे दारात जाऊच नका. प्रायव्हेट कॉलेजात मिशनऱ्यांची कॉलेजे प्रसिद्ध. पण तेथे जगन्नाथऐवजी जोसेफला प्राधान्य. अर्थात जगन्नाथनेही पाच-सात हजार 'व्हॉलंटरी डोनेशन' दिली, की त्यालाही सीट तयार असतेच. आज देशात

सर्वांत अधिक साक्षरता केरळात आहे. तेथल्या सरकारला हा शिक्षणातील बाजार बंद करायचा होता. कालच्या उन्हाळ्याच्या सुट्टीभर खलबते झाली. सध्या सत्तारूढ कडबोळ्याच्या सरकारात पाचजण आहेत. तरी सरकार तसे काँग्रेसचे आहे. गंमत अशी, की सी. पी. आय. (उजवे कम्युनिस्ट) सरकारात तर डावे बाहेर. जूनच्या १९ ला कॉलेजे उघडणार होती. तोच विद्यापीठाकडून एक खलिता सर्व प्रांतातील कॉलेजांना मिळाला अन् त्यानेच पुढचे रामायण सुरू झाले. खलिता होता, 'या वर्षापासून सरकारी कॉलेजे घेतात तेवढीच फी घ्यायची व फीव्यतिरिक्त काहीही घ्यावयाचे नाही' –बस्स !

सोमवारी १९ जूनला, केरळातील १२० खाजगी कॉलेजांपैकी फक्त २ च उघडली. प्रांतात आज असणाऱ्या १४३ कॉलेजांपैकी फक्त २३ सरकारी आहेत व वरची दोन, अशी २५ फक्त आज चालू आहेत. बाकीच्या ११८ ना कुलूपे आणि सभोवती पहारा. कुणाचा ? खाजगी सशस्त्र स्वयंसेवकांचा ! साऱ्या खाजगी कॉलेजांनी आपली संघटना केली व जाहीर केले, 'सरकारने–म्हणजेच सरकारी धोरणानुसारच विद्यापीठाने–हुकूम मागे घ्यावा किंवा कमी फी घेण्यामुळे होणारा तोटा, ग्रँटमध्ये वाढवून द्यावा, तोवर आमची सर्व कॉलेजे बंद !' सरकारने जाहीर केले, 'जी उघडणार नाहीत, ती ताब्यात घेतली जातील.' तात्काळ कॉलेजांनी आपापल्या 'सेना' स्थापन केल्या व पहाऱ्यावर बसविल्या. अर्थात त्याला खरे कारण दुसरेच आहे. 'केरला स्टूडंटस् युनियन' ही काँग्रेस-प्रणित मध्यवर्ती मजबूत युवक-संघटना आहे. तिने जाहीर केले, 'बंद कॉलेजे उघडण्यास आम्ही भाग पाडू, त्यामध्ये इमारतींचे नुकसान झाल्यास आम्ही जबाबदार नाही !' उत्तरास प्रत्युत्तर मिळाले ते नायर सर्व्हिस सोसायटीच्या ४ कॉलेजांच्या 'सेना' प्रमुखांचे. २०० स्वयसेवक कॉलेजांचे रक्षण करीत आहेत. त्यांनी सांगितले, 'नुकसानीचे उत्तर जाळपोळीने देऊ.' बघता बघता आज अख्खा केरळ धगधगू लागला आहे–मानसिक दबावामुळे !

तसा विचारच केला, तर सरकारी कॉलेजे व खाजगी कॉलेजे यामधील फीमध्ये तसा फारसा फरक नाही. मुद्द्याचा प्रश्न आहे तो, अॅडमिशनच्या वेळी घेतल्या जाणाऱ्या 'देणग्यांचा !' अडलेला भाडेकरू प्रथम अव्वाच्या सव्वा पागडी भरून आधी जागा मिळवतो आणि नंतर घरमालकाला त्रास देण्यास सुरुवात करतो, तसाच काहीसा प्रकार येथेही झालाय. मेडिकल व इंजिनियरिंग कॉलेजे केवळ सरकारचीच आहेत. विद्यापीठ तारखा वाढवीत गेले व १० जुलैवर येऊन थांबले. कॉलेजे बंद ती बंदच !

| कोर्स | सरकारी कॉलेज फी | खाजगी कॉलेज फी |
|---|---|---|
| प्री. डिग्री......... | १२४ रुपये | १३६ रुपये |
| बी. ए., बी. एस्सी. बी. कॉम. | १४४ ,, | १६० ,, |
| एम. ए., एमेस्सी., एम. कॉम. | १६० ,, | २४० ,, |
| शाळामास्तर ट्रेनिंग...... | १५० ,, | ४५० ,, |

खाजगी कॉलेजांचे असोसिएशनची भूमिका काय आहे ? ती थोडीफार पटणारी आहे. देशातील बहुतांशी शिक्षणसंस्थांची आर्थिक स्थिती बेताचीच आहे. शाळा, कॉलेजे स्वार्थत्यागावरच चालवली जातात. सरकारी मदत एक-तृतीयांश मिळते. सरकारने शिक्षकांना पगाराची स्केल्स ठरवून दिली, तर चार पैसे सुटणारा पुस्तकांचा धंदा स्वतःकडे घेतला. सरकारी कॉलेजातील प्रत्येक विद्यार्थ्यामागे सरकार ५०० रु. खर्च करते, पण आम्हांला ग्रँट परहेड २०० च मिळते. त्यामध्ये सरासरी १५० रु. फी धरली तरी एका विद्यार्थ्यामागे उत्पन्न जेमतेम ३५० रुपये पडते.

सरकारी भूमिका कायमच आहे. 'फी कमी करा. ग्रँट वाढवून देणार नाही... नाही...त्रिवार नाही !' एक जुलैला विद्यापीठाने दुसरीच एक योजना पुढे आणली. कॉलेजातील सेवक-वर्गाचा पगार सरकारी ट्रेझरीतून होईल व फी वसुली सर्वच्या सर्व जमा करावी. यामुळे कॉलेज, लायब्ररी, प्रयोगशाळा, मैदाने, इमारतडागडुजी-साठी काहीही तरतूद राहात नाही व दिवसेंदिवस ती ओसाड होतील. म्हणून ही योजना कॉलेजांनी फेटाळून लावली. शिवाय नव्या योजनेनुसार ३५% जागा शेड्यूल्डकास्टला राखीव व उरलेल्यांपैकी ८०% सरकार भरणार होते. म्हणजे केवळ २०% मुलांकडून 'कॅपिटेशन फी' मिळणार होती ! कॉलेजांनी हेही प्रपोजल धुडकावून लावलेच !

सामोपचाराची आशा संपल्यावर, सरकारची आता बलाची भाषा सुरू झाली. बंद कॉलेजास दम भरण्यास सुरुवात झाली. शिक्षणमंत्री श्री. महंमद कोया म्हणतात, 'वाटल्यास घटनेतील ३० वे कलमात दुरुस्ती करू, पण बंद कॉलेजांचे विद्यापीठाशी असणारे अॅफिलिसिएशन रद्द करू.' कॉलेजांनी भरती केलेल्या सेवकांना मान्यता न देणे हा दुसरा उपायही विद्यापीठ करू म्हणते, पण त्याला विद्यापीठाचे घटनेतील ६३ वे कलम आडवे येते. ते पण बदलण्याचा विचार आहे म्हणे. आज केरळातील कॉलेजात लेक्चररची नोकरी जर हवी असेल तर किमान १०,००० ची 'स्वखुषीने देणगी' द्यावी लागते. तितकीच रक्कम एम. एस्सी.साठी फर्स्टग्रूप (मॅथ–फिजिक्स–केमिस्टी) साठी 'द्यावी' लागते. म्हणून तर विद्यार्थ्यांचाच काय प्रोफेसरांचाही सरकारला पाठिंबा.

सक्तीचा सॅल्यूट लष्करी अधिकाऱ्यांस द्यावाच लागतो ना ? सरकारी धोरणाचा कदाचित विजय होईलही, कारण सत्तेपुढे शहाणपण नसते. पण त्यामुळे धोरणाचा उद्देश सफल होईल काय ? कायद्याने फी कदाचित कमी होईल, पण त्याच्या दुप्पट वाढ 'कॅपिटेशन डोनेशन'मध्ये होईल अन् पालकांवरील बोजा अधिकच वाढेल. जुलमाच्या रामारामामुळे, प्रेम निर्माण होत नसते, तर द्वेष, संताप वाढतो. एके दिवशी काहीतरी निमित्त त्याला मिळते अन्... ! केरळात तसे न होवो हीच अपेक्षा !

◻ ◻ ◻

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## कॉफी हाऊस

जगातलं पहिलं कॉफी हाऊस बहुधा तुर्कस्थानमध्ये १५ व्या शतकात सुरू झालं असावं. इतर ठिकाणची कॉफी हाऊसेस नंतरच अस्तित्वात आली. इटालीमधील पहिलं कॉफी हाऊस १६४५ मध्ये, लंडनचं १६५२ मध्ये, फ्रान्सचं १६७२ मध्ये, हॅम्बुर्गचं १६८० त आणि व्हिएन्नाचं १६८३ त सुरू झालं. १७ व्या शतकाच्या अखेरपर्यंत युरोपातील बहुतेक शहरात कॉफी हाऊसेस दिसू लागली. आश्चर्याची गोष्ट अशी की, भारत, सिलोन, ईस्ट व वेस्ट इंडिज बेटं ह्या प्रत्येक ठिकाणाहून युरोपीय देशात मोठ्या प्रमाणावर कॉफीच्या बियांची निर्यात होत असूनही येथे मात्र कॉफीला पेय म्हणून स्वीकारण्याचा प्रघातच नव्हता.

भारतातलं पहिलं कॉफी हाऊस कलकत्त्यालाच १७८० मध्ये प्लासीच्या लढाईनंतर अस्तित्वात आलं. पण कॉफी हे पेय भारतीयांपेक्षा युरोपियनांचं म्हणूनच प्रसिद्ध होतं. कलकत्त्यात कॉफी हाऊसेस लोकप्रिय होण्यास जरा वेळच लागला. जेव्हा लोकप्रियता मिळाली तेव्हा ती त्या पेयाच्या मोहापेक्षा निराळ्याच कारणास्तव मिळाली. उन्हाळ्याच्या दिवसांत रस्त्यावरचं ऊन सहन न झाल्यामुळं लोक बाजूच्या कॉफी हाऊसमध्ये चटकन् घुसत. आत संगमरवरी टेबलं, खुर्च्या आणि पोऱ्याकडून दोरीने ओढल्या जाणाऱ्या पंख्याची गार हवा असे. १८३५ च्या सुमारास कलकत्त्यातील कॉफी हाऊसेसमध्ये अमेरिकेकडून जलमार्गाने आलेला बर्फ असायचा. अर्थात् किंमत भरमसाट असायचीच. पण अनेक लोकांना त्यामुळे आळसात वेळ घालवण्याचे एक साधन आपोआपच प्राप्त झाले होते. सैनिकांची देखील तेथे गर्दी होऊ लागली. केवळ कॉफीसाठीच नव्हे—वर्तमानपत्रेही तेथे ठेवलेली असत, त्यांचेही एक आकर्षण असे म्हणून.

कलकत्त्यातील सुरुवातीची कॉफी हाऊसेस लाल बझार व बेंटिक स्ट्रीट विभागात स्थापन झाली होती. १८ व्या शतकात येथे वास्तव्य करून असलेल्या सोफिया

गोल्डबर्थ हिने कलकत्त्यातील कॉफी हाऊसेसबद्दल लिहून ठेवले आहे की–" येथील कॉफी हाऊसमध्ये कॉफीची किंमत एक रुपया असून येथे इंग्रजी वर्तमानपत्रे वाचायला मिळतात. ही वर्तमानपत्रे लंडनच्या पद्धतीप्रमाणेच फाईलमध्ये व्यवस्थित लावून ठेवलेली असतात. इंग्रजी वर्तमानपत्राबरोबरच 'कलकत्ता ऑर्गनायझर' आणि 'कलकत्ता क्रॉनिकल' ह्यांच्याही प्रती आढळतात." १८ व्या आणि १९ व्या शतकात कॉफी हाऊसेसची नावे 'व्हन्सिटार्ट रो,' 'लंडन टॅव्हर्न–१७८०,' 'हरमानिक हाऊस,' इ. असत. १७८४ च्या अखेरच्या सुमारास एका पत्रकाराने ह्यांचा उल्लेख करून म्हटले आहे की जगातील कोणत्याही कॉफी हाऊसपेक्षा ही कॉफी हाऊसेस उत्तम तऱ्हेने चालतात. ◻

## पुढे काय ?

एकदा नव्हे, चांगलं दोनदा हे असं झालं. विद्यापीठाचे बंद दरवाजे उघडायला मुख्यमंत्र्यांना पाचारण करावं लागलं. मी मी म्हणणारे शिक्षणक्षेत्रातले रथी–महारथी हतबल झाले. त्यांची गात्रे शिथिल झाली आणि नाईलाजास्तव मुख्यमंत्र्यांना हस्तक्षेप करणं भाग पडलं. शिक्षकाच्या पेशाशी परिचित असलेल्या उपकुलगुरूंना जे विद्यापीठाच्या खुल्या मैदानात जमलं नाही ते आमच्या मुख्यमंत्र्यांनी शिक्षणक्षेत्राशी अपरिचित असूनही रायटर्स बिल्डिंगमध्ये बसल्या बसल्याच करून दाखवलं, हे आश्चर्यच नव्हे काय ? विद्यापीठाच्या इतिहासात आजवर कधीही न घडलेली ही गोष्ट !

दोन्ही वेळा तीच पुनरावृत्ती. दोन्ही वेळा मुख्यमंत्र्यांना ते आपल्या कामात व्यग्र असताना विद्यापीठ पूर्ववत् चालू ठेवण्याची समस्या हाताळावी लागली. विद्यापीठाने परीक्षा रद्द केल्या. कारण एम्. ए. च्या विद्यार्थ्यांनी म्हणे सर्रास कॉप्या केल्या. मग एक रेव्ह्यू कमिटी स्थापन झाली. विद्यापीठाने धड कमिटीला पाठिंबा दिला नाही, की विद्यार्थ्यांशी तडजोड केली नाही आणि न सुटणाऱ्या समस्येचं हे रडकं बाळ मुख्यमंत्र्यांच्या हाती जबरीने दिलं. त्यांनी ते योग्य तऱ्हेने सांभाळलंही.

एकदाची विद्यापीठाची दारं तर उघडली. पण ती अशी किती दिवस उघडी राहतील शंकाच वाटते. कारण मुरलेलं दुखणं तर कायमच आहे. त्यावर औषधोपचार झालेच नाहीत. अन् पुन्हा पुन्हा ते दुखणं डोकं वर काढू लागलं तर कदाचित् सेक्रेटरिएटमध्येच कलकत्ता युनिव्हर्सिटीचं स्पेशल दालन उघडावं लागेल. जर आपले रोजचे प्रश्न सोडवण्यात विद्यापीठीय अधिकारीवर्ग सारखाच अपयशी ठरू लागला, तर मुख्यमंत्र्यांना सारी सूत्रे आपल्या हाती घ्यावी लागतील. मग मात्र विद्यापीठाच्या स्वतंत्र राज्यकारभाराला किंवा स्वायत्ततेला अर्थच उरणार नाही. त्या शब्दाचे नैतिक मूल्यच नष्ट होईल.

वस्तुतः विद्यापीठांचा सर्व कारभार त्यांचा त्यांनीच चालवायचा असतो. पण कुठवर? गाडी रुळावर नीट चालत असेल, विद्यार्थ्यांचे भले होत असेल नि ज्ञानार्जन योग्य तऱ्हेने पार पडत असेल तोवरच. पण ह्या गाडीची चाकं जागच्या जागीच खिळून राहिली नि तिचे रूपांतर कर्तृत्वहीनता व लाचलुचपतीच्या मालाने भरलेल्या मालगाडीच्या डब्यात झाले तर मुख्यमंत्र्यांना ती गाडी सुरळीत चाल करण्यासाठी कसून प्रयत्न करणं आलंच. ज्या विद्यार्थ्यांना १९७० मध्येच वास्तविक एम्. ए. ची पदवी मिळायची ती अजूनही—७२ साल अर्ध्यावर आलं तरी मिळू नये? त्यांच्या जीवनाची—विशेषतः करिअरची दोन वर्षं फुकट गेली ह्याला जबाबदार कोण? नुसत्या कमिट्या स्थापन करून ह्या प्रश्नांची उत्तरं सापडणं कठीण आहे. मुख्यमंत्र्यांनाच आता डोकं खाजवून उत्तरं शोधून काढणं भाग आहे.

विद्यापीठात माजलेल्या गोंधळामुळे बी. ए., बी. कॉम्. वगैरे अनेक परीक्षा लांबणीवर टाकण्यात आल्या. ज्यांच्या परीक्षा झाल्या त्यांचे रिझल्ट लांबणीवर पडले. अशा अनेक विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातून पत्रे लिहिली, की आम्ही पुढच्या वर्गात प्रवेश घेऊ शकत नाही कारण रिझल्ट लागला नाही; आम्ही नोकऱ्यांसाठी अर्ज करू शकत नाही, कारण आमची डिग्री आमच्या हातात आलेली नाही. संभ्रमात पडलेल्या आम्ही विद्यार्थ्यांनी करावे तरी काय? आणि एकाने तर चक्क लिहिले की अशा परिस्थितीत नक्षलगिरी, डाकूगिरी, चोऱ्यामाऱ्या हे धंदे आम्हांला सारखे खुणावताहेत. आम्ही त्यांचा अवलंब करावा काय?... □

## जमाईषष्ठी

जावयाची षष्ठी करण्याचा समारंभ (मराठी अर्थाने नव्हे हं!) बंगाल सोडून अन्यत्र कुठेही साजरा होत नसावा. तसे सर्वच देशात जावई म्हणजे एक VIP व्यक्ती समजली जाते. पण एका विवक्षित दिवशी जावयाची ज्यादा सरबराई केली जावी हे बंगालमध्येच प्रामुख्यानं आढळतं.

जून महिन्यात पौर्णिमेनंतर येणाऱ्या षष्ठीला हा समारंभ साजरा करतात. जावयाला सासुरवाडीचं खास आमंत्रण असतं. त्याच्यासाठी उत्तमातले उत्तम जेवणाचे पदार्थ तयार होतात. इतकंच नव्हे, नाना तऱ्हेच्या किंमती वस्तुही भेटीदाखल त्याला देण्यात येतात. पहिल्या वर्षी वस्तूंच्या किंमती आणि संख्या यांचं प्रमाण फारच जास्त असतं. जशी वर्षं लोटतात, तसं ते कमी कमी होत जातं—अर्थात् जावयाबद्दलचं प्रेम कमी होत नाही.

मुलगी एकुलती एक असेल नि बापाची खूप इस्टेट असेल, तर जावई फार भाग्यवान आहे असे समजावे. कारण जमाईषष्ठीला त्याचा VIP चा मान वर्षानु-

वर्ष त्याच प्रमाणात कायम राहतो. अर्थात् हे भाग्य वाट्याला येणाऱ्या जावयांचं प्रमाण फारच कमी. बाकीच्यांच्या नशिबी ओढून ताणून साजरी केलेली 'षष्ठी' येते. अलीकडचे दिवसही जरा असेच आहेत. शिवाय काही घरांमध्ये सासऱ्याच्या हातून साळ्याच्या हाती राज्याची सूत्रं गेलेली असतात. मग तोही आपल्याला ज्या प्रमाणात वागणूक मिळाली असेल त्याच प्रमाणात आपल्या मेहुण्याला वागवायचं ठरवतो. नाही म्हटलं तरी ह्या सगळ्या गोष्टींचा परिणाम होतोच जमाईषष्ठीच्या समारंभावर.

जमाईषष्ठीला जावयाची सरबराई होत असताना मुलीला मात्र व्रतपालन करावे लागते. म्हणून अलीकडे निराळाच एखादा दिवस ठरवतात आणि जमाई-षष्ठी त्या दिवशी साजरी करतात. म्हणजे मुलीला पण चांगल्या चांगल्या पदार्थांवर ताव मारण्याची मुभा मिळते.

एका जावईबापूंना जमाईषष्ठीचं आमंत्रणच बंद झालं. कारण विचारलं तर म्हणाले–सासऱ्याच्या कुटुंबात त्याच दिवशी काहीतरी अघटित घडलं नि तेव्हा-पासून त्यांनी हा सोहळा बंद केला. खरी गोष्ट अशी होती, की नऊ मुलींच्या बापाने आपली एक मुलगी ह्यांच्या पदरी बांधली होती. आता ९ जावयांची षष्ठी करण्याच्या कल्पनेनेच त्यांना घाम सुटला. मग ही अशी खोटी सबब सांगून त्यांनी सगळ्याच जावयांना वाटाण्याच्या अक्षता दिल्या.

एका जावयाची गोष्ट अशी, की सासऱ्याने आपली एकुलती एक मुलगी ह्या गृहस्थांना अर्पण केली होती. काही वर्षांतच ती मृत्यू पावली. मग जावयाने दुसरं लग्न केलं. तरी पण पहिल्या सासुरवाडीचं सुद्धा न चुकता त्यांना षष्ठीचं आमंत्रण येऊ लागलं. कारण सासऱ्याचं म्हणणं–'काही झालं तरी जावई तो जावईच !' आता दोन्ही सासुरवाडींची आमंत्रणं स्वीकारून दोन्हीकडच्या लोकांना ते कसं काय खूष करीत असत ही समजून घेण्याची गोष्ट आहे.

ज्या बंगाली माणसांची लग्नं विजातीय किंवा पाश्चिमात्य स्त्रियांशी होतात त्यांना मात्र ह्या जमाईषष्ठीच्या सोहळ्याला मुकावंच लागतं. तसंच जे बंगालमधून अन्यत्र कामधंद्यानिमित्त स्थायिक झालेले आहेत, त्यांनाही ह्या सुखाला पारखं व्हावं लागत असेल. अशा दूरस्थ जावयांसाठी त्यांच्या बंगालमधील बांधवांनी एक चळ-वळ सुरू करून 'अखिल विश्वातील जावयांनो, जमाईषष्ठीला एकत्र या, एक व्हा' अशा घोषणा द्याव्यात असं वाटतं.

□ □ □

# त्या लेखकांना किती पैसे मिळतात?

रवींद्र पिंगे

समस्त लेखकांना जीवापलीकडे प्रिय असलेल्या विषयाला आज स्पर्श करायचा आहे.

विषय : इंग्लिश लेखकांना लेखनावर किती पैसे मिळतात?

कुठलेही दोन लेखक भेटले, की "तुला किती दिले? इतरांना किती देतात? मला किती मिळतील?' ही ठराविक प्रश्नांची पानं पिसली जातातच. दिवाळीचे दिवे विझले की मराठीत तरी ह्या विषयाला जोरदार भरती येते. आणि ह्यात काहीही गैर नाही. साहित्यसेवेतून निव्वळ अध्यात्मिक आनंदाचा लाभ ज्या कुणाला होत असेल त्यांना तो लखलाभ असो. अध्यात्मिक आनंदाच्या अगोदर पोटभर जेवणाचा आनंद पदरात पाडून घेतलेला बरा असाच कौल शेकडा नव्व्याण्णव लेखक छातीठोकपणे देतील. अखेर व्यवहार कुणाला सुटला आहे? जोपर्यंत वाणी, धोबी, न्हावी, सुतार, शिंपी, कोळसेवाला, बसवाला, कॅन्टीनवाला, आणि इन्कमटॅक्सवाला त्यांचे व्यवहार निव्वळ अध्यात्मिक आनंदावर विसंबून करीत नाही, तोपर्यंत लेखकाला पदरात पडतील त्या मानधनाचे चतकोर गोळा करण्यावाचून गत्यंतरच नाही.

संपादक – प्रकाशकांकडून अगदी कटाक्षाने पैसे वाजवून घेणारा पहिला मराठी लेखक म्हणजे राम गणेश गडकरी. ते गुणी असून शिवाय भलतेच लोकप्रिय होते हे त्यांना फार सोईचं झालं. 'मनोरंजन'कार काशिनाथ रघुनाथ मित्र गडकऱ्यांना दरमहा पंचवीस रुपये लेखनापोटी नियमाने देत असं गडकऱ्यांचे स्नेही आम्हांला तोंडी सांगत. इतकी घसघशीत रक्कम त्या वेळी कुणाला लेखनावळ म्हणून मिळाल्याचे ऐकीवात नाही. गडकऱ्यांचे गुरू जे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनासुद्धा 'सुदाम्याचे पोहे'च्या संपूर्ण आवृत्तीचा मोबदला म्हणून फक्त पंचवीस रुपये मिळाले. किर्लोस्कर नाटक कंपनीच्या प्रतिष्ठीत नाटककाराची नि 'विविधज्ञान-विस्तार'च्या विद्वान लेखकाची जिथे ही उफराटी परिस्थिती, तिथे इतरांचा काय पाड लागणार होता? एकोणीसाव्या शतकातल्या मराठी लेखक-कवींना मोबद-

त्याच्या पोटी पूज्यच मिळाले असणार हे उघडच आहे. केशवसुत एवढे मोठे क्रांतिकारक कवी. त्यांना कवितेवर पाच-दहा रुपये सुटले असतील की नाही शंकाच आहे. लेखकांनी पैशाची अभिलाषा न बाळगता वाचकांच्या नि विशेषत: पंडितांच्या कौतुकाकडे पाहून लेखनयज्ञ धगधगता ठेवायचा ही मराठी जगतातली वहिवाट एकोणीसशे पंचवीस सालपर्यंत होती. ना. सी. फडके यांना त्यांच्या कीर्ती मिळवून देणाऱ्या पहिल्या कादंबऱ्यांच्या पहिल्या प्रकाशनामुळे पैसे सुटले नाहीत असा त्यांचाच लेख आहे. असं असलं तरी लेखकाला त्याच्या लेखनाचा मोबदला मिळालाच पाहिजे हे तत्त्व हिरीरीनं मांडलं. नाव कमावलेल्या फडक्यांनीच. म्हणून, लेखनावर मिळणाऱ्या पैशांची कीर्द ठेवणाऱ्या आजच्या समस्त मराठी लेखकांनी, मानधन मिळण्याच्या लेखकाच्या आद्य हक्काचा झेंडा मराठी माळावर रोवणाऱ्या ना. सी. फडके यांचं चिरकाल ऋणी राहिलं पाहिजे. फडक्यांची मान ताठ नसती तर कदाचित आजचे दिवस मराठी लेखकांना दिसतेच ना !

सर्वसामान्य मराठी लेखकाला आता चळचळीत नसली तरी पानसुपारी सुटण्याइतकी लेखनावळ मिळू लागली आहे. चांगले मान्यवर मराठी लेखक आता खास अंकातल्या कथेसाठी शंभराची नोट विनासायास मिळवू शकतात. थोडंफार नाव असलेला लेखक पंचवीस रुपयांखाली लेखणी उचलीत असेल हे आता संभवतच नाही. चाळीस रुपये हेच माप आता सर्वसामान्य अंकातल्या साहित्यासाठी रूढ झालं आहे. आकाशवाणीचे दरही असेच आहेत. खास अंकासाठी साठ ते पंच्याहत्तर. नावाचा गडगडाट झालेले चार पाच लेखक एकेका लेखासाठी वा कथेसाठी दिड-दोनशे रुपये वाजवून घेतात. मात्र अशांच्या मानधनाचाच तेवढा हेवा वाटतो.

इतर भाषेतही साधारणपणे हीच परिस्थिती आहे. गुजरातीत मराठीच्या मानाने पाच-दहा रुपयांनी कमी मानधन मिळतं. सिंधी लेखकांना मिळणारं मानधन केविलवाणं असतं. उर्दूतही जवळपास तीच स्थिती आहे. उर्दू लेखक आता पैशासाठी हिंदीकडे वळले आहेत. हिंदी लेखकांना मराठी लेखकांच्या साधारणपणे अडीचपट मानधन मिळतं. बंगाली, तामीळ, मल्याळम् लेखकांना दुप्पट मिळतं. निव्वळ ललित लेखनावर मानाने जगता येण्यासारखी परिस्थिती कुठल्याही भारतीय भाषेत सर्रास निर्माण झालेली नाही. प्रत्येक भाषेत फार फार तर असे चार पाच बहुप्रसव लेखक असतील. त्यापेक्षा जास्ती कुठेही नाहीत. इतरांना ललित साहित्याच्या जोडीला साप्ताहिक स्तंभलेखन, संपादनकार्य, कोशकार्य, भाषांतर–अनुवाद, गाईड लेखन, भावगीत लेखन वगैरे अर्धवेळ कामं नेकीने करावी लागतात; किंवा शिष्यवृत्त्या, बक्षीसं वगैरे खुबीने खिशात घालण्यासाठी वरिष्ठ वर्तुळात उठावश्या काढाव्या लागतात; किंवा सरकारी कमिटचांवर सिटा पकडण्यासाठी सचिवालयात किंवा सरकारी अंमलदारांच्या मोहोल्ल्यात चिरटचा घालाव्या लागतात. पण असे चतुर लेखक दिसण्यात जरी ढब्बू असले तरी त्यांचे दिवे मालवलेलेच असतात. बॅटरीसारखे ते अधूनमधून उघडझांप करून दाखवतात.

पण निरांजनासारखे ते शांतपणे तेवू शकत नाहीत.

इंग्लंड-अमेरिकेत स्थिती काय आहे ?

लंडनला प्रसिद्ध होणाऱ्या New Statesman ह्या लोकप्रिय साप्ताहिकाने लेखकांना मिळणाऱ्या मानधनाचा एक डोळे फिरवणारा आढावा प्रसिद्ध केला आहे. त्या आढाव्यातून जे निष्कर्ष निघाले आहेत ते असे :–

इंग्लंडमध्ये इंग्रजी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांची संख्या ही एवढी आहे :

दैनिके १४५

साप्ताहिके १२००

मासिके २०००

विशिष्ट धंदेविषयक मासिके २०००

घरगुती मासिके ६००

ह्या इतक्या प्रचंड संख्येच्या नियतकालिकांसाठी लेखक कुठून आणायचे ? एका दैनिकाला कमीत कमी दहा लेखक हवेत असं गृहीत धरलं तरी नुसत्या दैनिकांना लेखक पुरवायला कमीत कमी दीड हजार लेखक हवेत. महिन्याला जर दोन हजार मासिकं प्रसिद्ध होतात, तर त्यांना लेखनसाहाय्य पुरवणारे लेखक गेला बाजार दहा हजार तरी नकोत ? अगदी सरळ हिशोब केला, तरी इतक्या नियतकालिकांना साहित्याचा पुरवठा व्हायचा असेल तर पन्नास हजार लेखक तरी हवेतच ! तशात, कसदार आणि हुकूमी लेखक आकाशवाणी आणि टेलिव्हिजनवर नोकरीला असतात. त्यांची संख्या शेकड्यांनी आहे. म्हणजे एवढ्याशा इंग्लंडमध्ये लेखक आहेत तरी किती ? मति गुंग होते.

ह्या लेखकांना मानधन म्हणून किती रक्कम वाटावी लागते ?

त्याचा हिशोब असा :

सर्वांत जास्त मोबदला ‘प्लेबॉय’ मासिक देतं. ह्या मासिकात लिहिणाऱ्याला प्रत्येक शब्दाला दहा रुपये मोबदला मिळतो. म्हणजे हजार शब्दांच्या लेखाचं मानधन रोख दहा हजार रुपये मिळतं. ह्या मासिकाचे संपादक लेखकांना विषय देऊन लेख तयार करायला सांगतात. असा लेख जर संपादकांना नापसंत झाला तर लेखकाने आपल्या शब्दाखातर मेहेनत घेतली म्हणून लेख परत पाठवताना त्याला प्रत्येक शब्दाला पाच रुपये नुकसानभरपाई पाठवतात !

लेखकाला प्रचंड प्रमाणावर मोबदला देणारं साप्ताहिक म्हणजे Sunday Mirror. हे साप्ताहिक सुट्या लेखाला दहा हजार रुपये आणि एका लेखमालेला जास्तीत जास्त पाच लाख रुपये देते. बिटल्स ह्या अफाट लोकप्रियता मिळविलेल्या गायकवृंदाचं चरित्र क्रमशः लिहिणाऱ्या लेखकाला सण्डे मिररने पाच लाख रुपयांचे मानधन दिले. मात्र हे साप्ताहिक लेखनातील अचूकपणाबद्दल विलक्षण कटाक्ष राखते. त्यांना माहिती अगदी अचूक लागते. चुकभूल द्यावी, घ्यावी हा प्रकार त्यांना अजिबात चालत नाही. चटकदार विषय, कमावलेली शैली, आकर्षक घाट

आणि जीवनातल्या प्रश्नांशी निगडीत रचना ही त्यांची अत्यावश्यक पथ्यं असतात. ह्या गुणांनी मंडित असलेले लेखनच 'सण्डे मिरर' प्रसिद्ध करतं. एकदा पंधरा वर्षांच्या एका मुलाने "मी लेखनसाधना कशी करू? तुम्ही मार्ग दाखवा," असं पत्र इंग्लंडमधल्या सॉमरसेट मॉम, जे. बी. प्रिस्टले, कॉम्पटन मॅकेंझी, पी. जी. वुड-हाऊस, एव्हेलीन वॉ वगैरे लेखकांना लिहिलं, ज्या लेखकांच्या स्वाक्षऱ्याही मिळणं कठीण त्या ह्या सर्व लेखकांनी आपला वेळ खर्चून त्या शाळकरी मुलाला लेखक कसं व्हायचं, काय वाचायचं, काय टाळायचं, कसे विषय निवडायचे, त्यांची मांडणी कशी करायची, वगैरे उपदेशपर पत्रं पाठवली. त्या मुलाने त्या पत्रावर आधारीत लेखमाला मिररमध्ये लिहून हातोहात हजारो रुपये मिळवले!

लेखकांना मानधनापोटी मनमुराद रक्कम चारणारं हे एक टोक. Tribune ची स्थिती नेमकी ह्याच्या उलट आहे. आपण लेखकाला मोबदला देऊ शकत नाही, मात्र यदाकदाचित पैसे जमलेच तर लेखकांचा वाटा ताबडतोब बाजूला काढू अशी त्यांची हमी असते. मोबदला देऊ न शकणारे इंग्लंडमधले बहुधा हे एकमेव नियतकालीक असेल.

Sunday Times हे साप्ताहिक अग्रलेखाच्या शेजारी छापल्या जाणाऱ्या लेखाला आठशे ते हजार रुपयांचा मोबदला देतं. इंग्लंडच्या मानाने ही रक्कम क्षुल्लक आहे. पण सण्डे टाईम्समध्ये लिहिणाऱ्या लेखकाला प्रतिष्ठा फार मिळते.

Sunday Telegraph ह्या साप्ताहिकात 'फोकस' म्हणून प्रचलीत विषयावर छोटासा स्तंभ असतो. त्यात लिहिणाऱ्याला दोन हजार रुपये देतात. आठवड्यातील घडामोडींचा आढावा घेणाऱ्याला तीन ते चार हजार रुपये देतात. सनसनाटी बातमी देणाऱ्याला साठ रुपयापासून आठशे रुपयापर्यंत देतात. आपल्या पहिल्या पानावर ते प्रचलीत समस्येवर मतप्रदर्शन करणारा आठशे शब्दांचा लेख प्रसिद्ध करतात. त्याचं मानधन हजार ते बाराशे रुपये असतं.

Observer हे साप्ताहिक 'फोकस' ह्या स्तंभाकरता लेख मुद्दाम मागवतं. मोबदला बाराशे रुपये असतो. मागवलेलं साहित्य पसंत न पडल्यास ते साभार परत करताना लेखकाला त्याने घेतलेल्या श्रमाबद्दल सहाशे रुपये पाठवतात. 'ऑब्झर्व्हर' अग्रलेखाच्या शेजारी हजार–बाराशे शब्दांचा लेख प्रसिद्ध होतो. त्यासाठी आठशे ते हजार रुपये देतात. बातमीपत्रातल्या मजकूरासाठी एका शब्दाला पन्नास नवे पैसे ते दीड रुपयापर्यंत दर आकारून मोबदला पाठवतात.

इंग्लंडमधल्या दैनिकामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखांचा मोबदला सर्वसाधारणपणे पाचशे रुपयांपासून दोन हजार रुपयांपर्यंत असतो. दैनिकातल्या बातमीपत्रांसाठी चाळीस रुपयांपासून दोन हजार रुपयांपर्यंत महत्त्वाप्रमाणे मोबदला वाटला जातो.

सायंदैनिकांना इंग्लंडमध्ये जोरदार खप असतो. Evening News ह्या सायंदैनिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातमीपत्रांना तीन शब्दांना एक रुपया हा भाव आहे. जास्तीत जास्त एका बातमीला पाचशे रुपये देतात. सायंदैनिकातल्या अग्रलेखांच्या शेजारच्या लेखाला सहाशेपासून दीड हजार रुपयांपर्यंत मोबदला मिळतो. Evening

Standard चांगल्या लेखकाकडून एक मोठा लेख मिळवतात नि तो पाच भागात प्रसिद्ध करतात. प्रत्येक भागाचा मोबदला एक हजार रुपये देतात. म्हणजे लेखकाला एका लेखाचे पाच हजार रुपये मिळतात. त्यांनी एकदा एका लेखकाकडून सबंध वर्षात अधूनमधून प्रसिद्ध करण्यासाठी सुटं सुटं लेखन मागितलं, एकूण मोबदला पंधरा हजार रुपये ठरला. लेखन हाती आलं, पण ठरल्याप्रमाणे प्रसिद्ध होऊ शकलं नाही. तरीही त्यांनी लेखन प्रसिद्ध न करताच लेखकाला ठरलेले पंधरा हजार रुपये देऊन टाकले! सर्वसाधारणपणे सायंदैनिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखाला प्रत्येक शब्दाला एक रुपया असा सरसकट मोबदला वाटला जातो. अर्थात, दर्जेदार साहित्यिकाला ह्यापेक्षा वाढीव दराने लेखनावळ मिळते.

ज्या साप्ताहिकातर्फे हा आढावा घेण्यात आला त्या New Statesman मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या हजार शब्दांच्या लेखाला चारशे रुपये दिले जातात. मुख्य लेखाला सहाशे रुपये आणि साप्ताहीक पुस्तक परीक्षणालाही सहाशे रुपयेच मोबदला दिला जातो.

इंग्लीश लेखकांना खुद्द त्यांच्या देशात किती पैसे मिळतात त्याचं गणित हे असं आहे. अमेरीकेत ह्याच्या अनेक पटीने मिळत असतील. अर्थात ही झाली सर्वसामान्य लेखकाची कमाई. चर्चिल, प्रिस्टले, मॉम, वुडहाऊस, ओसबोर्न, वेन, कोनोली वगैरे सिद्धहस्त आणि सुप्रसिद्ध साहित्यिकांना पावसाच्या सरीसारखा पैसा मिळत होता नि आजही मिळतो. म्हणून ते वैभवशाली राजवाडे बांधून त्यात मिजाशीने राहातात. जगभर हिंडतात. कुणाचीही पर्वा करत नाहीत. नाटककार, टेलीव्हिजनचे लेखक हे तर अवाढव्य पैसा मिळवतात नि तेवढाच करही भरतात. मात्र, जरी आपण धनवान लेखक असलो तरी आपल्या वाचकांचा आपल्यावर जीव नाही, त्यांना साहित्यगुणांची मर्मग्राही पारख नाही आणि एकूण साहित्याविषयीच त्यांना डोळस आस्था नाही, ह्याची त्यांना रूखरूख असते. मराठी लेखक पैसे मिळत नाहीत म्हणून कुरकुरतात. त्यांना निदान अध्यात्मिक वगैरे पातळीवरचा दुर्लभ आनंद व्हावा म्हणून एक सत्यघटना सांगतो.

जॉन वेन हा इंग्लंडचा तरुण आणि ताकदीचा कवी-कादंबरीकार इकडे फेर-फटका करून गेला. आपल्या अनुभवाचं सार मांडणारा एक स्फोटक लेख त्याने Encounter मासिकात लिहिला होता. पुण्यातल्या मराठी ग्रंथकारांचं भयानक इंग्रजी ऐकून आपण कसे घायाळ झालो त्याचं वर्णन ओरबाडणाऱ्या शैलीत करून त्यानं भरतवाक्यात म्हटलं होतं, की हे सर्व दोष गृहित धरूनसुद्धा असं वाटतं, की लेखक म्हणून जन्म घ्यावा तर मराठी भाषेत! मराठी लेखकांना साहित्याबद्दल किती आस्था आहे, ळळा आहे; त्यांचा जीव कसा साहित्यात गुंतलेला आहे; साहित्याविषयीची त्यांची समज किती सुजाण आहे. आमच्या नावाचा दबदबा आणि आम्हांला मिळणारी मोबदल्याची रक्कम ओवाळून टाकावीशी वाटते!

□ □ □

१९ जुलै १९६९ ला
बँक राष्ट्रीयीकरण झाले.

# तीन वर्षांची वाटचाल

माधव काळे

तीन वर्षांपूर्वी, झंझावाती निर्णयाने देशातील चौदा प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. उलट सुलट टीकांची वादळे होऊनही राष्ट्रीयीकरणाचे बी रुजले आहे. रोपटे वाढत आहे. ही वस्तुस्थिती आहे. तरीही शाशंकता गेलेली नाही. राष्ट्रीयीकरणाने काय साधले? बँकांच्या व्यवहारात खरोखरी काय बदल झाले? ज्या सामाजिक उद्दिष्टांसाठी राष्ट्रीयीकरण केले गेले ते कितपत यशस्वी झाले? बँकांचे असंख्य ठेवीदार, खातेदार आणि कर्जदार या सर्वांना काही फायदा झाला का? बँकांचा नोकरवर्ग राष्ट्रीयीकरणाच्या बदलत्या परिस्थितीत आपले कर्तव्य कितपत पार पाडत आहे? नोकरवर्गाची कार्यक्षमता (efficiency) घटली आहे का? त्याच्या प्रामाणिकपणाला, स्वामीनिष्ठेला तडे गेले आहेत का? असे आणि अशासारखे अनेक प्रश्न अजूनही विचारले जातात. यामुळेच राष्ट्रीयीकरणानंतरची तीन वर्षांची वाटचाल कशी काय झाली याचा आढावा घेणे उचित ठरेल.

समाजाचा शिल्लक पैसा ठेवींच्या रूपाने गोळा करून तो देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक अशा उद्योगांना देणे हे व्यापारी बँकांचे प्रमुख कार्य. राष्ट्रीयीकरणानंतर शेती, लघुउद्योग, निर्यात, व्यापार, लहान व्यापारी आणि सामान्य जनता यांना कर्ज देण्यात प्राधान्य (Priority) देण्यात आले. यामध्ये समाजातील दुर्लक्षित क्षेत्रांचा योजनाबद्ध विकास हे प्रमुख ध्येय समजले गेले. त्याचबरोबर व्यापारी बँकांची नेहमीची क्षेत्रे म्हणजे सर्वसाधारण व्यापार उदीम, कापूस, कापड, साखर, लोखंड वगैरे मोठे उद्योगधंदे यावर मोठ्या प्रमाणावर पडणारा ताणही लक्षात घ्यायला हवा. राष्ट्रीयीकरणानंतर जास्तीत जास्त नफा (maximization of profits) आणि कमीत कमी धोका (minimum risk) हे पारंपारिक तत्त्व सोडून सामाजिक गरजेनुसार अग्रहक्क कर्जदाराच्या आर्थिक क्षमतेपेक्षा त्याचा कर्ज मागणीचा उद्देश, हेतु (purpose) यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले.

पूर्वी कर्ज देताना सुरक्षितता (safety) तारण (security) आणि नफा (profitability) याचा विचार होत असे. आता कर्जदाराच्या पतीचा, त्याने देऊ केलेल्या तारणाचा किंवा त्या कर्जापासून मिळणाऱ्या व्याजाचा विचार न होता कर्ज दिल्याने होणारी उत्पादनवाढ व सामाजिक गरजेनुसार विकास हे निकष लावले जातात.

नवीन अग्रहक्क क्षेत्रांना पतपुरवठा करणे ही मोठी जबाबदारी राष्ट्रीयीकृत बँकांवर येऊन पडली. त्यासाठी ठेवी वाढणे अत्यावश्यक ठरले. राष्ट्रीयीकरणानंतर ठेवी कशा वाढतील ही मोठी चिंता होती. शहरातून ठेवी मिळवायच्या प्रयत्नांना मर्यादा होती. इतर प्रगत देशांशी तुलना करताना आपला देश मागासलेला. साक्षरतेचे प्रमाण कमी. बहुसंख्य लोक खेड्यात राहाणारे. अनभिज्ञ. बँकेविषयी उदासीन आणि असे असूनही ठेवी मिळविण्यासाठी खेडोपाडी शाखा काढणे हे आवश्यक नव्हे अटळ होऊन बसले आणि आज आढावा घेताना शाखाविस्तार आणि ठेवी विस्तार (Deposit moblization) या दोन्ही दृष्टीने बँकांनी केलेली प्रगती निश्चित आशादायक आहे.

## निरर्थक भीती

याबाबत आकड्यांच्या भाषेत बोलावयाचे झाले तर उपलब्ध माहितीनुसार बँकांच्या एकूण ठेवी मार्च १९७२ अखेर ७,०५४ कोटींवर गेल्या आहेत. राष्ट्रीयीकरणानंतर पहिल्या वर्षी ठेवी घटल्या आणि राष्ट्रीयीकरणामुळेच हे झाले अशी ओरड सुरू झाली. परंतु त्याला कारणे वेगळी होती. दुसऱ्या वर्षी ठेवींमध्ये समाधानकारक वाढ झाली. दुसऱ्या वर्षी एकूण ठेवींमध्ये ८७३ कोटींची वाढ झाली. तर तिसऱ्या वर्षी मार्च ७१ ते मार्च ७२ या एका वर्षात ठेवींमध्ये ११४८ कोटींची प्रचंड वाढ झाली. ही वाढ राष्ट्रीयीकरणाच्या यशाचे द्योतक नाही का?

राष्ट्रीयीकरणापूर्वी लोक बँकांचे सरकारीकरण झाल्याने बँकेत पैसे ठेवायला कचरतील अशी एक भीती व्यक्त केली जात असे. पण ठेवींमधील वाढ पहाता ही भीती निरर्थक तर ठरली आहेच उलट राष्ट्रीयीकृत बँका लोकांच्या विश्वासाला अधिक पात्र ठरल्या आहेत असे का म्हणू नये?

शाखाविस्ताराच्या दृष्टीने विचार करता बँकांचे यश स्पृहणीय समजावे लागेल. रिझर्व बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार ३१ डिसेंबर १९७१ अखेर व्यापारी-बँकांच्या एकूण शाखा १२,९८५ आहेत. राष्ट्रीयीकरणानंतर शाखाविस्ताराचे मूलभूत तत्त्व बदलले. कोणत्याही बँकेला नवीन शाखा काढण्यापूर्वी रिझर्व बँकेकडून अनुज्ञा घ्यावी लागते. ही अनुज्ञा देताना दोन शाखा शहरी विभागात (urban) उघडताना एक शाखा ग्रामीण विभागात ज्या ठिकाणी कोणतीही बँक नाही (unbanked area) अशा ठिकाणी काढलीच पाहिजे हे बंधन घालण्यात आले. तरीही शाखा भराभर उघडण्यात आल्या. राष्ट्रीयीकरणापूर्वी नऊ वर्षांच्या काळात

बँकांनी ३२५६ शाखा उघडल्या. म्हणजे सरासरी ३६२ शाखा प्रतिवर्षी सुरू झाल्या. जून १९६९ ते एप्रिल १९७१ या अल्पकाळात नव्या ३४१९ शाखांची भर पडली म्हणजे सरासरी दरमहा १५५ नव्या शाखा राष्ट्रीयीकरणानंतर बँका उघडू शकल्या. दिवसाला ५ नवीन शाखा हे प्रमाण निश्चितच कौतुकास्पद आहे. शिवाय यापैकी २/३ शाखा ग्रामीण भागात उघडल्या गेल्या हे विशेष. बँकिंगचे लोण या रीतीने अविकसित आणि मागासलेल्या खेडोपाडी जाऊन पोचले. ज्या खेड्यात व्यापारी बँकेने शाखा उघडणे दोन तीन वर्षापूर्वी अगदी अशक्य वाटत होते. त्या आडगावात बँकांच्या शाखा मोठ्या समारंभाने सुरू केल्या गेल्या. बडोदा बँकेची नवी शाखा सातारा जिल्ह्यातील दहीवडी या खेड्यात उघडली गेली, त्या वेळेस उद्‌घाटन करताना अर्थमंत्र्यांनी या गोष्टीचा मोठ्या कौतुकाने उल्लेख केला होता. राष्ट्रीयीकृत बँकांनी ज्या ठिकाणी नव्या शाखा सुरू केल्या ती गावे खरोखरीच अपरिचित वाटतात ! उदाहरणार्थ, सेंट्रल बँक ऑफ इंडियाने जळगाव जिल्ह्यात बोधवड येथे शाखा उघडली. महाराष्ट्र बँकेने यवतमाळ जिल्ह्यात घाटंजी, पांढरकवडा येथे शाखा उघडल्या. बँक ऑफ इंडियाने कुलाबा जिल्ह्यात पोलादपूरला शाखा सुरू केली. पंजाब नॅशनल बँकेने उत्तर प्रदेशात प्रति दिवशी ३/४ या प्रमाणे शाखा उघडल्या. राजस्थान, आसाममधील अनेक लहान लहान गावातून बडोदा बँकेच्या शाखा उघडल्या गेल्या. ग्रामीण विभागात १९७० मध्ये ३,७६६ शाखा होत्या त्या आता ४,८८९ आहेत. म्हणजे राष्ट्रीयीकृत बँकांनी ग्रामीण विभागात जवळ जवळ २९ % पेक्षा अधिक प्रमाणात नव्या शाखा उघडल्या.

## ‘ अग्रणी बँक ’ योजना

शाखा विस्ताराला पोषक अशी आणखी एक योजना रिझर्व बँकेने अंमलात आणली. ती म्हणजे ‘ अग्रणी बँक योजना ’ (Lead Bank Scheme) अविकासित, मागासलेल्या भागाचा योजनाबद्ध सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने ही योजना पुढे आली. या योजनेनुसार रिझर्व बँकेने प्रमुख राष्ट्रीयकृत बँकांना निरनिराळे जिल्हे वाटून देऊन त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करून दिले आहे. या जिल्ह्यात ती विशिष्ट बँक ‘ अग्रणी ’ (Lead) बँक समजली जाते. या अग्रणी बँकेने त्या जिल्ह्याची पाहाणी करून, कोणकोणत्या ठिकाणी शाखा उघडाव्या ? शेती, छोटे उद्योग, कारागीर, छोटे व्यापारी यांना कसे आर्थिक सहाय्य करावे ? ग्रामीण भागातील लोकांना बचतीचे महत्त्व पटवून देऊन बचतीची सवय लागावी यासाठी कोणत्या योजना कराव्या ? या गोष्टीचा प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. याप्रमाणे प्रत्यक्षात कार्य सुरू झाले असून सरकारी अधिकारी, जिल्हा परिषदेचे सदस्य व अधिकारी, त्या त्या जिल्ह्यातल्या इतर बँकांचे अधिकारी यांच्या वारंवार बैठकी बोलावून, योजना आखून विकासाचे कार्य मोठ्या जोमाने चालू केले आहे. या ‘ अग्रणी बँक ’ योजनेमुळेच शाखाविस्तार वेगाने होत आहे. बँकांच्या कार्याला

नवी क्षितिजे मिळत आहेत. प्रगतीची पावले विकासाच्या दिशेने पडताहेत–हे यशाचे गमक नव्हे काय !

## चित्र बदलू लागले

बँकांच्या कर्जविषयक धोरणात अमूलाग्र बदल झाल्याचे वर सांगितले आहेच. मोठ्या, सधन आणि आर्थिक दृष्ट्या समर्थ व्यापारीवर्गाला पारंपारिक दृष्टीकोनातून कॅश क्रेडीट, ओव्हरड्राफ्ट स्वरूपाची कर्जे द्यावयाची आणि अल्प काळात त्याची परत फेडही करून घ्यायची हे तत्त्व मानले जात होते. लांब मुदतीची आणि थोडा अधिक धोका असलेली कर्जे निशिद्ध समजली जात होती. पण राष्ट्रीयीकरणानंतर हे पालटले. व्यापारी बँकांनी शेतकऱ्यांना कर्जे द्यावीत ही कल्पनासुद्धा पूर्वी हास्यास्पद समजली जाई. वास्तविक भारत हा शेतीप्रधान देश. बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून. उत्पादनवाढ ही निकडीची गरज. यामुळे आर्थिक क्षेत्रात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या व्यापारी बँकांनी यापूर्वीच शेती व्यवसायाला सहाय्य करायला हवे होते. पण भांडवलदारांच्या आणि स्वार्थांध मूठभर संचालकांच्या हातात सत्ता असल्याने हे होऊ शकले नाही. सामाजिक नियंत्रणाच्या योजनेच्या काळात सुरुवात झाली पण धोरण पूर्णपणे बदलू शकले नाही. राष्ट्रीयीकरणानंतर मात्र रिझर्व बँकेनेच या बाबतीत पुढाकार घेतला आणि बँकांचे कार्यक्षेत्र झपाट्याने बदलत गेले. शेतीला अग्रहक्क मिळाला. योजनाबद्ध विकासासाठी प्रयत्न होऊ लागले. निरनिराळ्या योजना आकार घेऊ लागल्या. शेतकऱ्याला वेळेवर आणि पुरेसे अर्थसाहाय्य व्हावे यासाठी बहुतेक सर्व बँकांनी अल्प मुदतीच्या, मध्यम मुदतीच्या आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या योजना जाहीर केल्या. वर्तमानपत्रातून, आकाशवाणीवर जाहिराती झळकू लागल्या. अशिक्षित, अनभिज्ञ आणि बुजरा शेतकरी धिटाईने बँकेत जाऊ लागला. अधिकाऱ्यांशी आपल्या अडचणीसंबंधी, गरजेसंबंधी मोकळ्या मनाने चर्चा करू लागला. बँक अधिकाऱ्यांच्या ' टाय 'च्या गाठी सैल होऊ लागल्या. धुळीने भरलेल्या अरुंद रस्त्यावरून जीप गाड्या शेताच्या बांधापर्यंत धावू लागल्या. शेती-तज्ज्ञ, तंत्रज्ञ, जिऑलॉजिस्टही खेडोपाडी जाऊन पहाणी करू लागले. लाल फितीत अडकून पडलेल्या योजना साकार झाल्या. विहिरी खोदण्यासाठी, पंप व इंजिने बसविण्यासाठी जमिनीची सुधारणा करण्यासाठी, अवजारे विकत घेण्यासाठी फळबागांसाठी, उसाच्या वा कापसाच्या योजनाबद्ध लागवडीसाठी, डेअरी डेव्हलपमेंटसाठी, कुक्कुटपालनासाठी–अनेक योजनानुसार मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे मिळू लागली. हे सर्व करताना बँकेच्या अधिकाऱ्यांना व नोकरवर्गाला, हे नवीन आव्हान स्विकारताना कष्ट पडत होते. हे काम साधे नव्हते. शहरी वातावरणात इस्त्रीच्या कपड्यात वावरणाऱ्या, ठराविक चाकोरीतले जीवन जगणाऱ्या अधिकाऱ्याला ग्रामीण विभागाशी समरस होणे जड जात होते. काही वैयक्तिक सुखाला मुकावे लागत होते. शेतकऱ्यात मिसळताना, त्यांच्या अडी-अडचणी, सुख-दुःखे

समजावून घेताना, स्वतःचे घडीवद्ध आयुष्य विसरावे लागत होते. हळूहळू हे सारे होत होते. निसर्गाने साथ दिली तर अमाप यश पदरात पडत होते. हरित-क्रांतीची ही नांदी होती !

शेती व्यतिरिक्त अग्रहक्काची आणखीही क्षेत्रे होती. लघुउद्योग, ट्रक चालविणारे, रिक्षा शिकणारे, लहान मोठे वाहतूक कंत्राटदार (Transport operators), टॅक्सीवाले, छोटे व्यापारी, स्वतंत्र व्यवसाय करणारे, व्यावसायिक डॉक्टर्स, वकील, आर्किटेक्टस्, इतर कारागीर यांनाही बँकांनी अलीकडच्या काळात कर्जे दिलीं आहेत. शेती व ही इतर अग्रहक्क क्षेत्रे (Priority Sector) मिळून ही कर्जे ९६१ कोटींवर गेली आहेत. जून १९६९ मध्ये एकूण ११,४९,५८७ एवढी कर्ज-खाती होती, ती १९७१ अखेर १३,०४,५१४ एवढी झाली आहेत. ही कर्जे मंजूर करणे सोपे जावे यासाठी अधिकाराचे विकेंद्रीकरणही केले गेले. काही ठराविक मर्यादेत शाखाप्रमुखांना (Branch Agents) ही कर्जे सुलभ रीतीने देता येतात. याशिवाय ही कर्जे वसूल होण्यामागचा धोका कमी व्हावा यासाठी रिझर्व बँकेने दोन हमीमंडळे स्थापन केली आहेत. एक हमी मंडळ (Credit Guarantee Corporation) लघुउद्योग धंद्यासाठी व दुसरे इतर लहान कर्जदारांसाठी. (Small Loans) या मंडळांनी दिलेल्या कर्जाची ८० टक्के हमी काही अटींवर स्वीकारली आहे !

## कमिशनचा अहवाल

बँकाच्या सर्वांगीण विकासाचा, कार्यपद्धतीचा, व्यवस्थापन पद्धतींचा विचार करण्यासाठी नेमल्या गेलेल्या बँकिंग कमिशनचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. कमिशनच्या सूचना विचाराधीन आहेत. त्या सर्वच्या सर्व प्रत्यक्षात आणल्या जातीलच असे नाही. परंतु कमिशनने सूचित केलेली राष्ट्रीयीकृत बँकांची पुनर्रचना केली गेल्यास, दोन किंवा तीन युनिटस् ठेवून त्यांच्याकडे विशिष्ट स्वरूपाची कामे सोपवून दिल्यास बँकांमध्ये सध्या असलेली स्पर्धा कमी होऊन त्या चांगल्या प्रकारे सेवा करू शकतील असे मत व्यक्त केले आहे. सध्या ठेवीचे व्याजाचे दर, कर्जाचे दर यामध्ये एकसूत्रीपणा आहे. परंतु ड्राफ्टस्, मेल ट्रान्स्फर्स, टेलिग्रॅफिक ट्रान्स्फर्स, चेक वसुली वगैरे बाबतचे कमिशनचे दर वेगवेगळे आहेत. जरी राष्ट्रीयीकरण झाले असले तरी प्रत्येक बँकेचे स्वतंत्र अस्तित्व (Identity) अजून तरी टिकले आहे. यामुळे प्रत्येक बँक आपले वैशिष्टच कायम ठेवून खातेदाराला आकृष्ट करण्यासाठी उत्तम प्रकारे सेवा उपलब्ध करण्यासाठी धडपडते आणि ही 'सेवा स्पर्धा' मारक न ठरता पोषकच ठरते असेही मत व्यक्त केले जाते. तेव्हा पुनर्रचनेचा प्रश्न घाई गर्दीने सोडवता येण्यासारखा नाही असे दिसते.

राष्ट्रीयीकरणाच्या यशापयशाचा विचार करताना बँकांच्या कार्यपद्धतीत अजूनही काही उणीवा आहेत, दोष राहून गेले आहेत आणि राष्ट्रीयीकरणाच्या सर्व अपेक्षा

बँका पूर्ण करू शकल्या नाहीत असे म्हटले जाते त्यातही तथ्य आहे. नव्याने येऊन पडलेल्या जबाबदाऱ्या पार पाडताना, योजना अंमलात आणताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. उदाहरणार्थ ग्रामीण भागात शाखा उघडण्यात व्यावहारिक अडचणी कशा तापदायक होतात याची कल्पना सहजासहजी येणार नाही. लहान गावात बँकेला हवी तशी सुरक्षित आणि सोईस्कर जागा मिळणे मोठे मुष्किलीचे असते. शिवाय लहान गावातून पुरेशा संरक्षणाची सोय नसते. पुष्कळवेळा शासनाकडूनही संरक्षणाची कोणतीही जबाबदारी उचलली जात नाही. पोलिस-चौकी जवळ नसते. किंवा असल्यास बेपर्वाई असते. अशा वेळी नोकरवर्गाला अक्षरश: जीव मुठीत घेऊन काम करावे लागते. ग्रामीण शाखेतून रोकड रकमा आणणे वा आसपासच्या मोठ्या गावात जादा शिलकेचा भरणा करणे ही कामं जिवाचा धोका पत्करून करावी लागतात. उदाहरणादाखल एक सत्यकथा — एका बँकेचा अधिकारी आणि एक शिपाई जवळ जवळ दोन लाखांची रक्कम पोचविण्यासाठी एस. टी. च्या बसमधून प्रवास करीत होते. रक्कम एका लोखंडी ट्रंकेत होती. बसमध्ये चढताना ट्रंक बरोबर न घेता तो वर टपावर टाकली पाहिजे असा आग्रह कंडक्टरने धरला. बिचाऱ्या अधिकाऱ्याची मोठी पंचाईत झाली. दोन लाख रुपये असलेली ट्रंक टपावर कशी टाकावी ? बरं ट्रंकेत काय आहे हेही सांगता येईना. शेवटी महत्त्वाचे कागदपत्र आहेत असं सांगून ती ट्रंक एकदाची आत चढविली. पण एवढ्याने संपलं नाही. बस घाटात बंद पडली. काही केल्या सुरू होईना. सर्व उतारू उतरले. पण दोघे जण उतरेनात. गाडी ढकलायची वेळ आली. हे दोघे ट्रंकेवर पाय ठेवून जाम बसलेले. कंडक्टरला आणि इतर उतारूंना आला राग. तुम्ही कोण टिक्कोजीराव असं ओरडत दोघं तिघं आत घुसले आणि दोघांना बाहेर खेचलं. एवढं काय आहे त्या ट्रंकेत ? उघडून दाखवा — कंडक्टरला भलताच संशय — चोरीचा माल ? दारू ? अनेक संशय — अधिकाऱ्याला दरदरून घाम फुटला. केविलवाणी नजर, भित्रा स्वर — संशय वाढला. शेवटी शिपायानं कंडक्टरला बाहेर नेऊन कसे बसे प्रकरण मिटवले. बस सुरू झाली. मुक्कामाला पोचली — आणि जीव भांड्यात पडला—!

## अवास्तव टीका

राष्ट्रीयीकरणानंतर बँकेच्या नोकरांच्या निष्ठेचं अवमूल्यन झालं, अशी टीका कधी कधी ऐकू येते. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती पाहिल्यास ही टीका किती अवास्तव आहे, हे कळून येईल. शेतीसारख्या अग्रहक्क व्यवसायाला आर्थिक सहाय्य देण्यासाठी निरनिराळ्या योजना आखल्या गेल्या. पण त्या प्रत्यक्षात राबवताना जड गेले. बँकांपाशी पुरेसा अनुभवी व कुशल नोकरवर्ग या नव्या क्षेत्रांसाठी आज तरी नाही. प्रत्यक्षात जरूर ते शिक्षण देऊन नोकरवर्ग तयार करणे लौकर घाईगर्दीने जमणारे नाही. सुरुवातीच्या काळात उत्साहाने शेतीव्यवसायाला मोठ्या प्रमाणावर

कर्जे दिली गेली. काही वेळा अटी शिथिल करण्यात आल्या. सवलती दिल्या गेल्या. काही तांत्रिक उणीवा राहून गेल्या. कर्जाचे कागदपत्र, गहाणखतं, वगैरेमध्ये नकळत कायद्याच्या दृष्टीनं चुका राहून गेल्या. यामुळे कर्जाची परतफेड होण्यास, वसुली करून घेण्यात व्यावहारिक अडचणी निर्माण झाल्या. वसुलीचे प्रमाण समाधानकारक नाही, ही ओरड सुरू झाली. पण याचे खापर कर्मचारी वर्गावर व व्यवस्थापनावर फोडण्यात येते, ते मात्र बरोबर नाही. याला नोकरवर्ग सर्वस्वी जबाबदार नाही. काही अपवाद सोडल्यास कर्जाऊ पैसे घेणारे कर्जदारही दोषी आहेत. व्यापारी बँकांजवळचा पैसा म्हणजे सरकारी अनुदान नव्हे. सामान्य जनतेनं कष्ट करून, घाम गाळून आणि प्रसंगी त्याग करून टाकलेली शिल्लक अशी मातीमोल होऊन उपयोगाची नाही, याचा कोणी विचार करीत नाही. सहकारी सोसायटया आणि बँका यांना जसे जबरदस्त तडाखे बसले तसेच राष्ट्रीयकृत बँकांना बसून नजिकच्या भविष्यकाळात सारी अर्थव्यवस्थाच धोक्यात येते की काय, अशी शंका येऊ लागते. आज दिलेल्या कर्जाची वसुली ही मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे, ही नैतिक जबाबदारी सोईस्करपणे विसरली जाते. बँकेचे कर्ज काढणारा शहाणा आणि परतफेड करणारा महामूर्ख अशी विचारसरणी रूढ होताना दिसते. राष्ट्रीयकृत बँक म्हणजे जनतेची बँक म्हणजे जनतेचा पैसा— मग तो परत केला नाही तर काय बिघडणार, अशी बेजबाबदार वृत्ती दिसते. मग वसुलीसाठी अधिक कडक उपाययोजना केली, न्यायालयाकडे धाव घेतली, की बँका वाईट ठरतात. स्थानिक राजकारणी मंडळींचे दडपण, दबाव या गोष्टीही कर्जवसुलीच्या आड येतात. बँकेच्या अधिकाऱ्याने कडकपणा दाखविल्यास तो अप्रिय ठरतो. खोटया कागाळया, तक्रारी केल्या जातात. नियमात न बसणारे कर्ज नाकारले गेले तर चक्क इंदिरा गांधींकडे तक्रार जाते. मग अर्थ मंत्रालय, रिझर्व्ह बँक, संबंधित बँकेचे कस्टोडियन, प्रादेशिक अधिकारी या सर्वांकडून चौकशीचे दुष्टचक्र सुरू होते.

राष्ट्रीयीकरणानंतर लाचलुचपत, भ्रष्टाचार, फसवेगिरी, लबाडी याचे प्रमाण वाढले आहे, असा एक प्रचार केला जातो. तो सर्वस्वी अनाठायी आहे असे नाही. पण एखाद्या नगरवाला प्रकरणावरून किंवा सेंट्रल बँकेच्या लंडन शाखेतल्या अफरातफरीवरून सर्वच बँक नोकर बेजबाबदार आणि अप्रामाणिक झाले आहेत, असे अनुमान काढणे चुकीचे ठरेल. अफरातफर, भ्रष्टाचार हे प्रकार इतरत्र नाहीत का? राष्ट्रीयीकरणापूर्वी ते नव्हते? एवढेच की त्या वेळी अशा प्रकारांना तितकी प्रसिद्धी मिळाली नव्हती. हे प्रकार नाहीसे व्हावेत निदानपक्षी कमी व्हावेत यासाठी बँकांचे व्यवस्थापन, रिझर्व बँक व सरकार पूर्णपणे जागरूक आहेत. प्रत्येक बँके-

पृष्ठ ३८ वर

# कविता

## छेदनबिंदू

सुखदु:खाच्या आडव्या उभ्या रेषा
एकमेकीला छेदतात.
तेव्हा कोन तयार होतात.
जीवनातल्या
लघुविशाल घटनांचे !

तेव्हां जीवनाचा अर्थ असतो,
एका बिंदू एवढा !
सारं काही सोसावं लागतंय
निमूट......!

प्राण गुदमरताना हसतात,
बदलणाऱ्या भिंती.
न पेलणारे बाहू वाढत जातात.
तेव्हांच वाटतं,

घडलेल्या घटनांची बेरीज म्हणजे
तिनशेहे साठ अंशाचा मृत्यू !!!
वाढलेले बाहू
सावरता येत नाहीत.

प्राण नागवा होतो.
आणि बिंदू
विलीन झालेला असतो,
शुन्यातून निर्माण झालेल्या
शुन्यात !!!.

—मा. भा. भोसले

## किनारा

तुझ्या स्वप्नांच्या किनाऱ्यावर
माझी तडा गेलेली नौका
तोल सावरीत उभी असते
जीवन जगण्याचे वल्हे
तुटलेले असतात.
लाटेतून फुटलेले थेंब
डोळ्यावर येतात.
पायाखालची घसरणारी वाळू
डोळ्यात दाटलेले पाणी
दोन्हींचा मेळ बसत नाहीं
प्रयत्नांचे धागे जुळवताना
दिवस वाहून जातात
पाण्यासारखे...... सतत धार !
त्यांचा होतो इतिहास
केव्हां ते नाहीं कळत
फक्त आठवणींच्या भूतात
मी नाचत असतो
तुझ्या स्वप्नांच्या किनाऱ्यावर

मा. भा. भोसले

मा. भा. भोसले यांच्याच 'छेदनबिंदू' या दुसऱ्या कवितेतही सुरुवातीला भूमितीमधील उपमानांनी आखलेली रूपके आशयाला एक प्रयत्नघटित रूप प्राप्त करून देतात. पण त्या रूपकापाठोपाठ उत्कटतेचा असा काही आवेग वहात येतो, की कृत्रिमतेच्या रेषा त्यात कुठल्या कुठे वाहून जातात. प्राण गुदमरताना हसणाऱ्या बदलत्या भिंती, तीनशे साठ अंशाचा मृत्यू, नागवा झालेला प्राण या प्रतिमा अर्थपूर्णता आणि आवाहकत्व यांनी युक्त बनतात. एका आवेगपूर्ण असहायतेची प्रतीती त्यातून घडत राहते. कुठल्याही स्पष्टीकरणात्मक भाष्यावाचून ही प्रतीती गूढतेला सुस्पष्टतेचे रूप देत राहते. अतिशय स्थिर ठोकळेबाजपणातून सुरू झालेली कविता अत्यंत तरल आणि अर्थवाही बिंदूत विलीन होऊन संपते.

'किनारा' या कवितेची सुरुवात एका सामान्य रूपकाने झालेली आहे. स्वप्नांचा किनारा, तडा गेलेली नौका, जीवनाचे वल्हे ही सगळी रूपके प्रस्थापित आहेत. 'जीवन जगण्याचे वल्हे तुटलेले असतात' या ओळीत तर चक्क व्याकरणाची चूक झालेली आहे. पण यातूनच एक उत्कट मन:स्थिती हळूहळू साकार होऊ लागते. या मन:स्थितीचे चित्रण शब्द हळूवारपणे करीत राहतात. पायाखालची घसरणारी वाळू आणि डोळ्यात दाटलेलं पाणी यांचा मेळ न बसणे, प्रयत्नांचे धागे जुळवताना दिवस वाहून जाणे या प्रतिमा साध्या असल्या तरी अनुभूतीचे प्रतिबिंब उमटलेल्या आहेत. शेवटच्या चार ओळीत भावोत्कटतेला परिणामकारक आकार प्राप्त होतो. एक तऱ्हेची कृतार्थ अगतिकता तेथे साठून राहते. स्वात्म अनुभव आणि सहसंवेदना यांचे रमणीय एकत्व या चार ओळीत निर्माण झाले आहे. सरळ निवेदनाने ते जास्त विलोभनीय बनविले आहे.

— रसिक





दरी निसर्गनिर्मित असते. अवाढव्य असते. ती कुणीही बुजवू शकत नाही आणि म्हणून दरीच्या दोन बाजूस उभ्या असलेल्या व्यक्ती, एकमेकांना पाहू शकतात, आपलं माणूस ओळखू येतं आणि हो! भिंत मानवनिर्मित असते, म्हणून ती पाडता पण येते आणि ती दोन मने, एक होऊ शकतात. दरी उल्लंघण्याची ताकद नसेल पण भिंत पाडण्याची शक्ती मात्र असू शकते. मानवी जीवनात मानवानेच निर्माण केलेल्या अनेक भेदाभेद भिंतींनी माणसामाणसात दुरावा निर्माण केला, त्यांना अलग अलग केले. सुखासाठी ज्याने त्याने अशा भिंती पायापासूनच उखडून टाकल्या पाहिजेत.

गावाबाहेर असलेल्या बंगल्याकडे रस्ता जातो तो अगदी सरळ, व्यवस्थित आणि स्वच्छ होता. तसा एकांतच. पण आता तो भाग गजबजू लागला होता. रस्त्याच्या दोन्ही कडेला सरकारी जमिनीवर वस्त्या होत होत्या. झपाटचाने वाढत होत्या.

'झोपडपट्टी' ही दैन्यावस्था तर आहेच पण ते एक वेगळे तत्त्वज्ञान आहे. तिथलं जीवन वेगळं. जगणं वेगळं आणि मरणही वेगळंच! माणसं वेगळी. त्यांचं पूर्ण जगच वेगळं. बंगल्यांच्या रांगांकडे या घाण गलिच्छ वस्तीतून जाताना कसं-तरीच वाटे पण नीरव शांततेपेक्षा माणसांचा कलहरव ऐकण्यात आनंद असे. आणि म्हणून बंगलेवाले नाक मुरडत किंवा मुठीत नाक धरून जात. पण मनाच्या एका कोपऱ्यात कुठंतरी बरं वाटे त्यांना.

वाढत चाललेल्या झोपडपट्टीला कुणीच आळा घालू शकत नाही. तिथल्या माणसांच्या सवयींना कोण आवरणार? पण झोपडीत राहतात म्हणून सगळेच काही अगदी 'गिरे हुए' वाया गेलेले नसतात. उच्च असो वा नीच, सज्जन आणि दुर्जन सर्वत्र असणारच. प्रमाणाचा फरक पडतो. एवढेच.

नाटक पाहून दोन तीन पोरी आपापल्या स्कुटरवरून बंगल्याकडे परतत होत्या.

---

## दरी आणि भिंत

काळाच्या ओघात ते दोघे एकत्र आले.
आणि एकमेकांपासून दूर गेले—न भेटण्यासाठी.
कुणास ठाऊक, वक्त काय करील?

**भास्कर दोडे**

---

रात्री दोनचा सुमार असेल. मध्यरात्र, पोरींची वटवट, थंड वारा! 'घेतलेली' न चढली, तरच नवल! चारपाच उनाडटप्पू पोरांचं टोळकं, झोपडीच्या आडोशाला बसून चावट गप्पा हाणीत होतं, ते रस्त्यावर येऊन बसून राहिलं. पोरी आपल्याच नादात. टोळक्याचीही ब्रह्मानंदी टाळी लागलेली. त्यांना पाहताच पोरी प्रथम चकावल्या. स्कूटर्सना ब्रेक्स मारता मारता त्यांची धांदल उडाली. एक दोघी तर चक्क फेकल्याच गेल्या स्कूटरवरून. विविधरंगी पोषाखातल्या, उफाड्याच्या भर-गच्च पोरी पाहून त्यांना फारच चढली आणि त्यांनी अतिप्रसंगास सुरुवात केली.

त्या तरुणी किंचाळू लागल्या.

झोपडपट्टीतून दिवसा विशेषतः रात्री बायकी किंचाळणं सबंध रात्र ऐकण्याची सवय सर्वांनाच होती. प्रथम कुणी तिकडे लक्ष देईना पण आवाज आणि शुद्ध सुसंस्कृत भाषा, 'मेल्या, हलकटा' सारख्या अगदीच हलक्या फुलक्या शिव्या ऐकून झोपड्यातून बापसे बाहेर आले आणि आवाजाच्या रोखाने धावले. तसेच-उघडे-नागडे !

बंगल्यातल्या श्रीमंतांच्या पोरींना अपरात्री अशा परिस्थितीत पाहून त्यांच्यातील काही सज्जन पुढे आले आणि त्यांनी गुंड टोळक्यातल्या प्रत्येकाला चांगलाच चोप दिला.

मुलींनी आपापल्या स्कूटरवर ताबा मिळवला आणि त्या निघण्याच्या तयारीत असताना त्या गर्दीतून एक व्यवस्थित दिसणारा तरुण पुढे आला आणि त्यांच्या-पैकी एकीला म्हणाला, 'माफ करा, या लोकांनी तुम्हांला त्रास दिला. ते शुद्धीवर नाहीत. आपण काय करतो आहोत, याची त्यांना जाणीव नाही, त्यांना माफ करा.'

ती हसली आणि साऱ्या जणींनी माना डोलावून, माफ केल्याचं दर्शविलं.

प्रकाशाचे झोत टाकीत स्कूटर्स निघून गेल्या.

त्यानंतर एक आठवड्याने महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पुस्तके घेत असताना तिला रात्रीचा तो आवाज ऐकू आला आणि तिने तिरक्या नजरेने पाहून घेतले. चेहरा ओळखीचा वाटला पण परिचय कसा होणार? ओळख कशी काढणार? तेवढ्यात आवाजाचा धनी तिच्या जवळच आला. एकाच वेळी दोघांनी एकमेकां-कडे पाहिलं पण त्याच्या डोळ्यात तिला ओळखीचे काही चिन्ह दिसेना. ती नाराज झाली. बोलण्यासाठी तोंड उघडलं तिनं, पण संकोचामुळे जीभ टाळूला चिकटली, ती मोकळी होईना आणि बोलही उमटेना !

तेवढ्यात तो पुस्तक देऊन निघूनही गेला !

धीर करून तिने पुस्तकांची देवघेव करणाऱ्याला त्याचे नाव विचारले. पत्ताही व वर्ग कोणता तेही विचारून घेतलं.

पुन्हा कधी भेटला तर नक्कीच बोलायचं, असं ठरवून ती तेथून निघाली.

"निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेची फळ !" याचा अनुभव तिने घेतला.

दोघांची मैत्री खूपच दृढ होत गेली आणि एकमेकांच्या निकट ते आले.

त्याने तिला आपली गरिबी सांगितली. ध्येय ऐकविले आणि भावी स्वप्नेही तिच्या डोळ्यापुढे उभी केली. त्याच्या कर्तृत्वाने ती भारली गेली. तिला खूप कौतुक वाटलं त्याचं.

सर्वप्रकारची मदत ती त्याला करू लागली.

झोपडीतून त्याला आपल्या बंगल्याच्या आवारात आणलं.

ज्या दिवशी त्याने एम. ए. ची पदवी पटकाविली, तीही विशेष प्राविण्याने, त्या दिवशी तिच्या आनंदाला पौर्णिमेच्या सागरासारखी भरती आली. तिने त्याला

खाना दिला. स्कूटरवर दोघं परतत असता, देवालयाजवळ त्याने स्कूटर थांबविली.

दोघं उतरली आणि बागेतील झाडाखाली बसली.

आज ती फार खूष होती. 'आज माझं एक स्वप्न पूर्ण झालं. तू तुझ्या जिद्दीपणाने, ध्येय गाठले असतेसच. कितीही कष्ट पडले तरीसुद्धा ! पण त्यात शक्ती, बुद्धी आणि वेळ यांचा अपव्यय झाला असता...'

- 'हो ! तुझ्या मदतीमुळे मी जास्त चांगल्याप्रकारे यश मिळवू शकलो, तुझे...'

'हं हं हं !', ती त्याच्या ओठावर आपले नाजूक गोरेपान बोट ठेवीत म्हणाली, "उपकार वगैरे काही म्हणायचं नाही हं ! एखादी वेल, एखादा वृक्ष लावण्यात, जगवण्यात कितीतरी आनंद असतो, समाधान असते. एखाद्या माणसाला मदत करण्याने तर शतगुणितच नव्हे तर सहस्रपटीने सुख-समाधान मिळते. तो अत्युच्च आनंद मला मिळाला, मी धन्य झाले...' पुढं असंच काहीतरी अर्धवट स्वतःशी, अर्धवट त्याच्याशी बोलत होती. मध्येच ती गप्प झाली. दूर कुठेतरी पाहात राहिली, शून्यात...

त्याला शांतता सहन होईना.

तो म्हणाला, 'तू...तुझे...तुला मी...'

तिने त्याला बोलूच दिले नाही.

'आता एकच इच्छा', ती म्हणाली, 'लग्न करून सुखाने संसार कर. आणि हो – मुलगी माझ्या पसंतीची करायची हं ! मला आधी दाखव. मी तुझ्यासाठी जे काही केलं, त्याची फेड म्हणून .."

"तू काय बोलते आहेस ? मी आज किती आनंदात, सुखात आहे. मनातली एक सुप्त आणि गुप्त इच्छा तुला सांगणार आहे. मी...तुला...मागणी घालतो आहे..."

त्याच्या बोलण्याचं तिला आश्चर्य वाटलं नाही, परंतु ती भांबावली.

'अहं, ते बोलू नकोस. तसा विचारही तू कधी करू नकोस.. तर मी काय म्हणत होते ?' तिने विषय बदलण्यासाठी मार्ग पाहिला.

पण तिच्या बोलण्याने तो चक्रावला होता.

बसलेल्या धक्क्यातून सावरण्यास त्याला बराच वेळ लागला. ती काय म्हणाली हे त्याला कळताच तो संतापला.

'काय ?...काय, म्हणतेस काय तू ?' तो किंचाळला.

'शांतपणे नीट ऐक. माझं तुझ्यावर प्रेम असलं, तरी तुझ्याशी लग्न करण्याचा विचार करू शकत नाही. तुझ्याशी लग्न करण्याचा माझा विचार नाही, कारण...'

तो काही न ऐकण्याच्या मनस्थितीत आला होता. तो लगेच उठला.

ती पण उभी राहिली. त्याच्या बरोबर चालू लागली. पण त्याच्या पाऊलावर पाऊल टाकून तिला चालता येईना. ती मागे पडली.


ही पहा-
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कितीहि चोळले स्वच्छ निघतच मुळी. मला वाटलं, पाण्यामुळें होत असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे ? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात ? हं, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ? मग वापरतेस तरी काय तू ?
आता मिळू लागलेली डेट डिटर्जंट वडी.
काय असतं तीत एवढं ?
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर तसलं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! डेट डिटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले आतात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं !
NEW! det
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो–अगदीं

तो स्कूटरजवळ गेला आणि चालू केली.

तिने ती बंद केली. मागच्या सीटवर हात मारला, जणू तिने सुचविले, 'तू मागे बस. मी चालविते.'

स्वत: किक् मारली. पुढे बसली. आणि तो केव्हा बसतो, याची वाट पाहात क्षणभर थांबली. पण बसण्याऐवजी तो पुढे चालू लागला होता. तिने हॉर्न दिला. मानेनेच खुणवले, 'मागे बस,' पण नजरानजर होऊनही तो न बोलता चालतच होता. त्याने तिच्याकडे पुन्हा पाहिलेही नाही !

तिने अर्धामिनिट त्याची वाट पाहिली. पण तो बसत नाही हे पाहून गिअर बदलला आणि गाडीला वेग दिला.

तो आलेला व खोलीत गेलेला नंतर तिला दिसला.

सकाळ होताच, नित्याप्रमाणे आळसात सगळे चालू असताना तिला दिवाणखान्यात त्याचा आवाज ऐकू अला.

आळस झटकून केसावर हात फिरवीत ती दिवाणखान्याच्या दरवाजाजवळ गेली. पडद्यामागे उभी राहून ऐकू लागली.

तिच्या वडिलांचे आणि त्याचे संभाषण चालू होते. सौम्य भाषेत, हलक्या आवाजात. दहावीस मिनिटे तिनं ऐकलं, वडील उठले. शतपावली करीत ते त्याला म्हणत होते, 'तुमच्या कष्टाची कदर करण्यासाठी, तिने तुम्हांला मदत केली. तुमच्याबद्दल तिला फार सहानुभूती वाटते, आदरही वाटतो. परंतु लग्नाबद्दल म्हणाल तर ती कधीच ऐकणार नाही, असा मला विश्वास आहे. मी मात्र तुमच्या आड येणार नाही. पण तुम्हीही तिच्याशी लग्न करण्याचा आग्रह धरू नये असे मला वाटते. कारणे अनेक आहेत ती तुम्ही जाणता आहात. मी सांगत नाही. तुम्हा दोघात एक फार मोठी दरी आहे. ती ओलांडण्याची तुम्हापैकी एकाचीही ताकद नाही...'

ते थोडावेळ थांबले.

त्याच्या चेहऱ्याचे निरिक्षण केले.

वातावरणातील तणाव कमी करण्यासाठी खेळकर आवाजात ते म्हणाले, 'तुमच्या सुयशाबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो.' नोकराला हाक मारून चहा-बिस्किटे आणण्यास सांगून ते पुढे म्हणाले, "आज दुपारी आमच्याकडे जेवायला या, अं ? आणि हो...तुम्ही पुढे काय ठरविलं आहे? घराकडे जायचे असेल नाही? सायंकाळपर्यंत आमची जागा रिकामी करू शकाल ना आज ?"...

प्रत्येक वेळी 'आमच्या' शब्दावर विशेष जोर दिल्याचे त्याला अस्पष्टपणे जाणवलं. चहा, फराळ न घेताच तो गेला. 'दुपारपर्यंत मी जागा रिकामी करून देतो' एवढं मात्र बोलला–अगदी ओठातल्या ओठात.

तिच्या वडिलांनी अगदी एका वाक्यातच त्याला दोघांच्या परिस्थितीतील भयंकर

अंतर जाणवून दिलं होतं.

काळाच्या ओघात तो आणि ती एकत्र आले आणि एकमेकांपासून दूर गेले. न भेटण्यासाठी? कुणास ठाऊक 'वक्त' काय करील, भविष्याच्या पोटात काय असेल ते कोण सांगू शकेल?

कालचक्र चालू होते.

आणि...एके दिवशी...दोघे पुन्हा भेटले. प्रवाहातील ओंडक्याप्रमाणे!

काही फार काळ गेलेला नव्हता, तरी दोघांनाही वाटलं...खूप वर्षांनी भेट होते आहे. भावनावेगाने तो पुढे सरसावला. पण त्याला आठवण झाली–तिच्या वडिलांची, त्यांच्या शब्दांची, दोघांमधल्या दरीची! त्याचे हात झटकन् मागे आले. पाय चटकन मागे सरकले आणि अंतर राखून तो स्तब्ध उभा राहिला. तिचे नावही त्याच्या ओठातून बाहेर पडेना.

तीसुद्धा तशीच स्तब्ध.

तिची मान खाली झुकली. डोळे पाणावले आणि...आलेला हुंदका बाहेर पडू नये म्हणून पदराचा कोपरा तिने तोंडात कोंबला.

तिची ही स्थिती त्याला असहनीय झाली.

तो पुढे झाला. जवळ सरकला.

दोन्ही हात हातात धरले. थोपटल्यासारखे केले.

त्याच्या सद्भावना, त्याची सहानुभूती तिला त्या स्पर्शद्वारे कळली. अंतःकरणाला भिडली आणि तिला जास्तच रडू फुटले!

त्याने तिला जवळ घेतले. उजव्या हाताने तिच्या खांद्यावर थोपटले आणि तिची समजूत काढीत तो म्हणाला, "मी अजूनही तुझाच आहे. तुझी वाट पहातोय. तुझ्याकरिता थांबलो आहे. तुला आजही साद देत आहे. प्रतिसाद देणं..."

आणि ती कोसळली.

त्याला पाहिल्यापासून तिचा भावसागर उचंबळून आला होता–सीमाबंध तोडून! आणि म्हणूनच स्वतःवरचा तावा सुटून गेला.

सुस्थितीत असूनही तो सुखी नव्हता.

प्रवाहपतितासारखा वहातच चालला होता. परंतु वहावत गेला नव्हता. जवळच्या दवाखान्यात नेल्यावर पुष्कळ वेळाने ती शुद्धीवर आली.

दोघांच्या नजरा भिडल्या. अंतःकरणात खोलवर जाऊन रुतल्या.

आणि मग ते पुन्हा पुन्हा भेटत राहिले.

दरी नाहीशी झाली होती. भूकंपाने जमीन जोडली गेली होती!

कालचक्राचा एक दुष्ट फेरा पूर्ण झाला होता. रहाटगाडग्याच्या फिरण्याप्रमाणे घट दुःखजलाने भरला होता, पण आता रिता होऊन, सुखजीवनाने भरण्याकडे वाटचाल करीत होता.

एकमेकांना ओढ होती पण समाजबंधन तोडण्याकडे मन धाव घेत नव्हतं.

रूढ संकेतांना झुगारण्यासाठी आवश्यक ते धैर्य नव्हतं.

सर्वसाक्षी परमेश्वर स्वत: नट आहे, नटखट आहे. जगाच्या रंगभूमीवर कळसूत्री मानव-बाहुल्यांचा खेळ करण्यात तो फार पटाईत! सर्वोच्च पर्वताच्या जागी सर्वांत खोल समुद्र करण्याची लीला त्याचीच. आणि खोल जागेवर अत्युच्च पर्वतराज निर्माण करणाराही तोच. दरी निर्माण करावी त्यानेच आणि नाहीशी करणारा त्याच्याशिवाय समर्थ दुसरा कोण आहे? दोन ओंडक्यांना जवळ आणून दूर लोटलं त्यानं. पुन्हा आणलं ते पुनरावृत्तीसाठी खास नसणार.

अनेक भेटीतून मधल्या काळची हकीगत कळली. पूर्वसूत्र जुळले गेले.

पूर्वी ती दोघातील दरीला भीत होती.

आणि आता दोघांत असलेल्या भिंतीला.

तिच्यात आणि त्याच्यात आजही अंतर आहे. ती सर्व दृष्टचा खाली आली आहे. वडिलांच्या समक्षच थाटात तिचा विवाह झाला. पण एकुलती एक म्हणून बापाने दोघांना आपल्याजवळच राहायचा आग्रह केला.

तिच्या अलौकिक सौंदर्याने आणि उफाड्याच्या तारुण्याने तो बेहोष, धुंद झाला होता आणि 'अतिकामसू' वृत्तीने त्याचा शेवटी घात झाला. राजयक्ष्मा होऊन तो खलास झाला.

भरपूर खावं पण एकदम नव्हे, तर पचेल एवढं—थोडं थोडं! हे साधं तत्त्वही त्याने मानलं नाही. पोटापेक्षा जास्त खाण्याचा प्रयत्न केला आणि परिणामी, या जगातून तो निघून गेला.

मुलींच्या आयुष्याची परवड कोणत्या बापाला सहन होईल?

आघाताने म्हातारा पार वाकला.

औषधपाण्यातच खूप पैसा गेला. कमाई नाही. आहे ते जपून खाल्लं तरी कधी ना कधी संपणारच! बंगलाही गेला, रोख रक्कमही संपत चालली.

बापाचं दु:ख पाहून पोर दु:खी आणि तिला दु:खी पाहून बापाला पुन्हा शत-गुणित दु:ख! तो मात्र चांगल्या नोकरीत होता. सुस्थिर झाला होता पण...अंत:करण मंदिरातील देव्हारा रिताच होता. देव नसलेल्या मंदिराला किंमत काय? मूर्तीच्या शोधात तो होता.

मूर्ती त्याला गवसली. त्याच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

पण...ती अजून बुजत होती.

परिस्थितीतील बदल ती विसरू शकत नव्हती.

आणि एके दिवशी तो दारात हजर.

तीच वेळ. सकाळची. गाव मात्र वेगळं. स्थळ वेगळं.

माणसं तीच. परिस्थिती वेगळी. मन:स्थिती वेगळी.

विषय तोच पण अडथळा वेगळा.

दरी नव्हती. भित मात्र उभी !


भिंत मनुष्य-निर्मित. जो उभारतो तो नेस्तनाबूत करण्याचीही शक्ती बाळगतो.

भिंत कोसळविण्याच्या ईर्षेने तो आला होता. हट्टी स्वभाव अजून कायमच !

आणि तिच्या वडिलांपुढे त्याने विषय काढला. सांगण्याआधीच तिने चहा करून आणला होता. त्याने आधी चहा घेतला आणि दोघांना जेवणाचे आमंत्रण दिले.

दुपारी दोघे त्याच्याकडे आले.

भिंत नष्ट होऊन दोघे एकमेकांजवळ आले होते—दूर न होण्यासाठी—कायमचे एकमेकांचे होण्यासाठी.



## बँक राष्ट्रीयीकरण....

पृष्ठ ३७ वरून

मध्ये भ्रष्टाचारविरोधक निरीक्षक मंडळ नेमले आहे. शाखांमध्ये तक्रारपेटचा ठेवल्या आहेत. त्याशिवाय तक्रार-पुस्तके ठेवण्यात आली आहेत. आलेली तक्रार जर सत्य असेल तर दोषी कर्मचाऱ्याची संपूर्ण चौकशी करून त्याला शासन करण्याची कोणतीही हयगय होत नाही. ढासळणारी नीतिमूल्ये सावरण्याचा हा प्रयत्न तोकडा कसा समजावा ?

राष्ट्रीयीकरणानंतर संपूर्णतया अपेक्षापूर्ती करण्यास या तीन वर्षांच्या वाटचालीत बँका समर्थ ठरल्या नसल्या तरी देशाची आर्थिक उन्नती साधण्याच्या दृष्टीने त्यांनी टाकलेली ही प्रगतीपथावरची पावलं उज्ज्वल भवितव्याकडे नेत आहेत हे निश्चित. मिळालेल्या यशाने हुरळून न जाता किंवा राहिलेल्या उणीवा व विरोधी टीका यामुळे नाउमेद न होता बँका आपले कार्य अधिकाधिक तत्परतेने, कुशलतेने आणि निष्ठेने चालू ठेवून खऱ्या अर्थानं यशवंत ठरतील अशी आशा बाळगण्याइतपत यश आज त्यांनी मिळविले आहे असं म्हणणं अतिशयोक्तीचं ठरणार नाही.

□ □ □

## पुस्तके

# झुंझार माची

### चांगली असून वाया गेलेली कादंबरी

**निशिकांत मिरजकर**

'कादंबरीमय शिवकाल' या संकल्पातील, गो. नी. दांडेकर यांची ही चौथी कादंबरी आहे. 'बया दार उघड,' 'हरहर महादेव' आणि 'दर्याभवानी' या तीन कादंबऱ्यांच्या पुढील कालखंडावर प्रस्तुत कादंबरीतील कथानक आधारले आहे. खुद्द शिवाजीराजांच्या दैदीप्यमान जीवनचित्रावर कादंबरीचे केंद्र न रेखता त्या दैदीप्यमान जीवनाने झळाळलेल्या भोवतालच्या परिसरावर, माणसांवर व जीवनपरिस्थितीवर यातील प्रत्येक कादंबरीचे केंद्र दांडेकरांनी स्थिरावले आहे. 'बया दार उघड' या पहिल्याच कादंबरीत त्यांचं ते तंत्र कल्पनेबाहेर यशस्वी झाले होते. शिवाजी राजांच्या अवतारी कर्तृत्वाची अवघ्या महाराष्ट्राच्या जीवन-स्पंदनाला लागलेली तृषा त्या कादंबरीत दांडेकरांनी विलक्षण परिणामकारकतेने चित्रित केली. नंतरच्या दोन कादंबऱ्यातून मात्र हे केंद्रस्थैर्य अपरिहार्यपणे ढळले, आणि धड राजांच्या तेजस्वी जीवनाचे ठसठशीत रेखांकन नाही; आणि धड तत्कालीन महाराष्ट्राच्या भावजीवनाचे व्यापक दर्शन नाही, अशी त्या दोन्ही कादंबऱ्यांची गत झाली. 'झुंजार माची' ने देखील ही परंपरा सांभाळलेली आहे.

तशी या कादंबरीची चांगली बाजूही पुष्कळच आहे. शिवाजीराजांच्या जीवन-चित्राऐवजी त्या पार्श्वभूमीवर तत्कालीन सामान्य लोकजीवन चित्रित करणे हे 'कादंबरीमय शिवकाल'चे ईप्सित आहे. त्यामुळे दांडेकरांच्या लेखनाचा प्रकाश-झोत जेव्हा खरोखरीच सामान्य लोकजीवनावर स्थिरावतो, तेव्हा फार उत्कृष्ट व्यक्तिचित्रे त्यातून उजळून निघतात. या कादंबरीतला तातू भंडारी हा अशा

उत्कृष्ट व्यक्तिचित्रांचा प्रतिनिधी आहे. तातूच्या हालचाली, सवयी, लकबी, समजुती आणि भाषणे दांडेकर अशा काही मार्मिकतेने रेखाटतात, की या सामान्य माणसाचे व्यक्तिचित्रण एकदम सजीव बनून जाते. कोकणचा कुतूहलव्यापृत, अद्‌भुतावर विश्वास ठेवणारा, धडपडचा माणूस या तातू भंडाऱ्यामधे जिवंतपणे उभा राहतो.' एका खडकाला ठेचकाळून तो धडपडला. आपणहूनच उठत त्यानं लगेच खुलासा करून टाकला, 'नाय् – म्हंजे माका लय् लागला नाय् !' अशी त्याची उचापती धडपड, 'सांगतय्. माजी सोताची नाय् हां ! पण माकाच घावली.' असा त्याच्या बोलण्यातला निरागस सहजविनोद. 'आबलख घोड्यावर सोता रवलनाथ महाराज, तेंच्या दोनी बाजूक् हुडळी. आभाळा येवढचो उंच. हात हात जिभो भायर लोंबत असलेल्या. मागसून सगळी भुतां. वेताळ, खंकाळ, मैराळ, मुंजे, 'तेंचा आरडना, वरडना, हाकारे, कुकारे.' अशी त्याच्या श्रद्धेतील कल्पनासृष्टी हे सगळे जिवंतपणाने रसरसले आहे. लेखकाचे सूक्ष्म निरीक्षण आणि प्रत्ययकारी आविष्कार क्षमता यांची साक्ष पटविणारे आहे.

## अत्यंत वेधक चित्रण

जिथे जिथे अशा जागा दांडेकरांनी घेतल्या आहेत, तिथे तिथे ते बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले आहेत. अस्थिर राजकारणामुळे भांबावलेले, जीविताच्या आणि स्वास्थ्याच्या अशाश्वतीने भित्रे बनलेले सामान्य लोकांचे जीवन त्यांनी अगदी उत्कटतेने चित्रित केले आहे. इथेतिथेच्या चित्रांतून बोलकेपणे उमटविले आहे. डोंगर चढून शिवाजीराजे धनगराच्या झापापाशी पोचतात, तेव्हा त्याची बायकामुले झापातून बाहेर निघून पळू लागतात. रानी दडतात. धनगराला धरून आणल्यावर तो हातापाया पडू लागतो. रडूभेकू लागतो. अर्धवट बांधलेली किल्ल्याची भिंत वादळाने पडल्यावर देवचाराचा कोप शांत करण्यासाठी बळी देण्याची भाषा सर्वत्र बोलली जाऊ लागते. ज्योतिषी आणि वासुदेव यासारख्या लोकांना शत्रूच्या छावणीतसुद्धा आतपर्यंत प्रवेश करून घेता येतो. दक्षिणावर्त शंख सापडल्यावर शुभशकुनाच्या कल्पनेने माळ्यापासून हिरोजीपर्यंत साऱ्यांची मने फुलून येतात. तत्कालीन लोकजीवनाशी निगडीत असलेले शकुन, उत्सव, परंपरा, लोकसमजुती आणि व्यवहार यांचे वर्णन दांडेकरांनी अत्यंत वेधकतेने केले आहे; आणि त्यातून या कादंबरीच्या केंद्राभोवतालचे परिवलय रेखले आहे. महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचे, डोंगरदऱ्यांचे, रानमाळांचे वर्णन या परिवलयाला घट्ट आधार देणारे असे आहे. ही एका विशिष्ट काळातील, विशिष्ट परिस्थितीतील महाराष्ट्राची कहाणी आहे; याचे भान अशा ठिकाणी जागे होत राहते.

या लोकजीवनाच्या वर्तुळात शिवाजीराजांचे व्यक्तिमत्त्व सर्व अंगांनी परिपूर्ण करण्याची कोशीस दांडेकरांनी केली आहे. या व्यक्तिमत्त्वाचे अवघे रूप उदात्त ध्येयवेडाने भारलेले असले, तरी वास्तवाशी इमान राखणारे आहे. लोकसंग्रह,

न्यायनिष्ठुरता, राजकारणातील सावधता अशा विविध पैलूंनी युक्त आहे. "त्यो पुरुसच येगळ्या मातीचा घडल्याला हाय" हे हिरोजीचे विधान या कादंबरीतील विविध प्रसंगांतून आणि संभाषणांतून जणू पुन:पुन: अधोरेखित झालेले आहे. शिवाजीराजांचे बोलणे-चालणे म्हणजे दांडेकरांच्या मनीमानसी वसणाऱ्या जणू उदात्त स्वप्नाचे प्रत्यक्ष रूपवर्णन आहे. या वर्णनात उदात्ततेची एक भारदस्त पातळी सदैव कायम राखली गेली आहे. मग "आम्ही ऐसे कर्तुक करूंच करू, की अवघे पाणवठे निर्भय होतील. कोठीलही भयाने कोणाचे मन बावरून जाणार नाही. हा या देशास दिलेला आमचा शब्द आहे." असे प्रत्यक्ष राजांच्या तोंडचे आत्मविश्वासाचे उद्गार असोत, की " अवघे त्यांच्या मुद्रेकडे पाहात राहिले. जणू अवकाशातून ओंकार उमटावा, तसं राजांच्या मुखावाटे त्या संकल्पित दुर्गाचं नाव बाहेर पडलं." यासारख्या समर्पक अलंकारातून व्यक्त झालेले राजांच्या व्यक्तिमत्त्वातील इतरांच्या श्रद्धेचे उत्कट प्रतिबिंब असो, दांडेकरांची लेखणी ती विशिष्ट भारदस्त पातळी सोडत नाही. जिवाला कंटाळलेली नि देहाने विटाळलेली नावराची दुर्दैवी मुलगीदेखील राजांच्या मोजक्या सांत्वनपर शब्दांनी भारून जाते आणि प्राणार्पण सार्थकी लावण्याची संधी साधते. हिरोजीसारखा निकटवर्ती सहकारी राजांच्या साधेपणाने आणि बेगुमान व्यक्तित्वाने भारलेला असतो. तेवीस किल्ले मोगलांना द्यावे लागले, यातले राजांचे दुःख तो मनोमन अनुभवू शकतो. राजे स्वत: येणार म्हटल्यावर देहभान विसरून कर्तृत्वाचा डोंगर उभा करतो. भाऊसाहेब, तान्हाजीराव, एवढेच काय, पण साधे पुजारी आणि धनगर या सर्वांच्या बोलण्या-चालण्यातून, श्रद्धानिष्ठांतून, जगण्यामरण्यातून राजांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा घाट उभारला जातो.

जिथे भावनांचे नाटच उभे राहिले असेल, तिथे दांडेकरांची भाषा अगदी उत्कट बनते. शब्द, निवेदन, अलंकार सगळ्यात एक उत्कटतेची लय निर्माण होते. प्रसंगाचे दृश्यमय चित्रण केले जाते आणि भावनात्मक तीव्रतेचा प्रत्यय त्यातून साकार होतो. "मस्तक कापलेलं कोकरू रक्ताच्या थारोळ्यात तडफडावं तशी ती ओलेती तिथल्यातिथं तळमळू लागली. जणू सगळा आकांत ती आपल्या अंगातच जिरवीत होती."...."आभाळभरल्या आकाशातून मलूल चंद्रबिंब वर उठावं, तसं नावराच्या मुलीनं आपलं मस्तक वर उचललं. गढूळ दृष्टीनं एकदा राजांकडे पाहिलं"......"अंबारी चढवलेल्या मत्त गजासारखा राजगड छातीवर येऊ लागला." .. अशा अनेक ठिकाणी हे जाणवते. त्या त्या ठिकाणच्या प्रसंगात दांडेकर त्या त्या वेळी समरसून जगतात. भावनांनी गहिवरलेले क्षण उत्कटतेने टिपताना त्यांची लेखणी अतिशय हळुवार बनते. शब्दातीताला आवाहन करते. शिवाजीराजे आग्र्याहून सुखरूप परतले हे कळल्यावर हीरोजींच्या बैठकीवर उसळलेला आनंदकल्लोळ, हरकाऱ्याने दिलेले राजांचे पत्र वाचताना

झालेली हीरोजीची गहिवरली स्थिती, सप्तकोटीश्वराचे दर्शन घेताना राजांच्या मनी उठलेले भावनांचे आवर्त, उदेभानाच्या घावाने जायबंदी झाल्यावर मृत्यूची झापड येताना तान्हाजीरावांच्या मनी आठवलेले कल्पकल्प यासारख्या ठिकाणी दांडेकरांतील सामर्थ्यशाली कवी जागा झाला आहे. अशा ठिकाणी दांडेकरांच्या लेखनात एखाद्या काव्यासारखी लय निर्माण झालेली आहे. सिंधुदुर्गाच्या बांधकामाचे सगळे वर्णन अशा लयबद्धतेने भरलेले आहे. अवघ्या लोकांच्या मनात असणारी या बांधकामाबद्दलची आत्मीयता दांडेकरांच्या लेखणीतही उतरली आहे.

जुन्या काव्यशास्त्रीय चौकटीतील अनेक युक्त्या कादंबरीच्या परिणामकारक बांधणीसाठी दांडेकरांनी यशस्वीपणे वापरल्या आहेत. चपखल पताकास्थानांची योजना ही त्यापैकी एक आहे. हिरोजी व गोविंद विश्वनाथ यांची बळीसंबंधी चर्चा चालू असताना परसाकडील पडवीच्या दाराआडून डोकावत नाबराच्या मुलीने अवघे बोलणे प्राणांचे कान करून ऐकत राहणे, सिंहगडावर हल्ला करावयास जाताना अकस्मात सापडलेल्या गुप्त धनापाशी नागाने तान्हाजीरावांना दंश करून जाणे, सिंहगडाकडे सचिंतपणे पाहात बसलेल्या राजांना वारंवार उचकी लागणे, सिंहगडाचे पान तान्हाजीरावांनी उचलल्यावर पाल चुकचुकणे वगैरे पताकास्थाने उल्लेखनीय आहेत. यातील काही अगदीच ढोबळ आहेत; परंतु त्यांची मांडणी परिणामकारकरीतीने झालेली आहे. दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे वर्णने. दांडेकरांच्या वर्णनातील सूक्ष्मता मोठी कौतुकास्पद असते. नजरेपुढे ते ते दृश्य साक्षात उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वर्णनशैलीमध्ये असते. बारीकसारीक तपशीलाने त्या दृश्यात जिवंतपणाचे नाटच भरण्याची जादू त्यांच्या शैलीत असते. कादंबरीच्या प्रारंभीचे वर्णन या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. समुद्रकिनाऱ्यावर प्रथमच पाऊल टाकलेल्या मराठी घोडदळाचे वर्णन दृश्यरूप लेखून तेथे दांडेकरांनी सादर केले आहे. सबंध कादंबरीत अशी अनेक नवलावाची स्थळे आहेत. दांडेकरांनी परिश्रमपूर्वक जमविलेल्या ऐतिहासिक तपशीलाने ही वर्णने समृद्ध बनली आहेत.

अशी ही एक चांगली कादंबरी आहे.

## समतोल ढळला

पण या कादंबरीवर माझा एक मुख्य आक्षेप आहे. सगळे चांगले वाङ्मयीन सजावटीचे गुण असूनदेखील या कदंबरीचा समतोलच ढळलेला आहे. शिवरायांच्या देदीप्यमान जीवनचित्राच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन सामान्य लोकजीवनाचे प्रत्ययकारी चित्र रेखाटणे हे कादंबरीचे स्वरूप एकदा ठरविल्यावर त्याच्याशी एकनिष्ठ राहणे दांडेकरांना जमलेले नाही. त्यामुळे लोकजीवनापासून शिवाजीराजांच्या तेजस्वी जीवनचित्रावर कादंबरीचे केंद्र वारंवार फिरत राहते. रंजनाचे अनेक मोहक गुण धारण करूनदेखील त्यामुळे कादंबरीला एक निश्चित सुडौल आकार प्राप्त होऊ शकत नाही. लोकजीवनावर केंद्रस्थ झाल्यामुळे आग्र्याहून सुटकेसारखा

रोमहर्षक प्रसंग डावलून केवळ त्याचे इतरांवरील ठसे दाखविण्यात दांडेकर धन्यता मानतात हे ठीक; पण मग सिंहगडाच्या मोहिमेचे इत्थंभूत वर्णन कशासाठी ? ते जर हवे, तर मुरारबाजो देशपांड्यांचे प्रत्यक्ष वर्णन का नको ? आकस्मिक धनप्राप्ती आणि नागदंश यासारख्या कल्पित प्रसंगाना स्थान मिळते, तर मग जनमानसात रुजलेल्या घोरपडीच्या प्रसंगाचा उल्लेख का नको ? असले विविध प्रश्न त्यामुळे उद्‌भवतात आणि अनुत्तरित राहतात. तसेच वर्णनांतील सूक्ष्मता हा गुण खरा; पण ऐतिहासिक तपशील पुरविण्याच्या भरात दांडेकरांच्या लेखणीचे पाऊल अनेकदा रुक्षतेच्या सीमेवर पडते. आपण कादंबरी लिहीत आहोत हे विसरून अशा ठिकाणी ते अत्यंत उत्साहाने आपल्या बहुश्रुतपणाचे आणि इतिहास-संशोधनाचे दर्शन घडवू लागतात व पाने भरभरून ऐतिहासिक तपशीलाची जंत्री सादर करतात. अशा जंत्रीमुळे ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने लिखाणाचे मोल वाढत असले, तरी ललित कलाकृती या दृष्टीने तिची आकृती विसकटते. एरवी प्रभावी वातावरणाची कुशलतेने उभारणी करणारी दांडेकरांची प्रतिभा अशा ठिकाणी केवळ स्वत:ची बहुश्रुतताच पुन:पुन: गिरवीत राहते आणि यापेक्षाही विशेष म्हणजे या कादंबरीतून शिवकालासंबंधी कोणतीही कलात्मक भावाकृती तयार होत नाही. सर्व चांगले रंजनगुण असूनही एका प्रतिभावान लेखकाची ही कादंबरी उच्च कलात्मक पातळीचे मूल्य गाठू शकत नाही. चांगली असूनही वाया गेलेली ही एक कादंबरी आहे. ◻

**झुंझार माची :** गोपाल नीलकंठ दांडेकर : मॅजेस्टिक : पृष्ठे २६५ : किंमत दहा रुपये


## पाहिजे

'भूमिपुत्र प्रतिष्ठान' तर्फे एक शेतकीशास्त्र पदवीधर तरुण, पूर्ण वेळ कार्यकर्ता ( Full time extention workes ) म्हणून नेमावयाचा आहे.

कामाचे क्षेत्र तूर्त ठाणे जिल्हा. खेड्यामध्ये आदिवासी विभागात राहून काम करण्याची तयारी असावी. भातशेतीचा अनुभव असलेल्याला अधिक पसंती. वेतन अनुभव व कार्यक्षमतेनुसार ठरवले जाईल, किमान वेतन सरकारी शेतकीखात्याच्या तत्सम नोकरवर्गासारखे राहील.

ही संस्था एक ट्रस्ट असून मागास विभागात शेतीसुधारणा व शैक्षणिक उन्नती ही तिची उद्दिष्टे आहेत. पूर्वानुभव व अपेक्षित पगार यासह खालील पत्त्यावर अर्ज पाठवावा.

**भूमिपुत्र प्रतिष्ठान**

C/o कृ. रा. दाते, १०, कमलकिशोर सोसायटी
३५–ए बाळ, गोविंददास रोड, माहीम, मुंबई–१६ डी.डी.

सुरुवातीच्या हलाखीच्या परिस्थितीत, सिएरा मेस्त्राच्या पहाडी जंगलामध्य, त्या बारा-पंधरा बंडखोरांना अत्यंत कठीण अशा भौगोलिक परिस्थितीत खरोखरच बिकट अशा मानसिक ताणांनाही तोंड द्यावे लागले. बंडखोरांच्या त्या तुकडीत एकरूपता नव्हती. युद्धाच्या अनुभवातून येणारा आवेश नव्हता, की स्पष्ट अशी तात्त्विक जाणीवही नव्हती आणि अशा स्थितीत ते सारे मानसिक विफलतेशी सामना देत होते. कधी आजूबाजूचे खेडूत येऊन गटाला मिळत, कधी कुणी परिस्थिती सहन न होऊन पळून जात. एका-दोघांनी तर आत्महत्या केली. हर्बर्ट मॅथ्यूजने घेतलेली फिडेलची मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर बाटीस्टाने सुमारे दहा

# फिडेल चे आणि क्रांती

हजार सैनिक सिएरामध्ये त्याला शोधून मारण्यासाठी पाठविले होते. फिडेलच्या डोक्यावर दहा हजार पेसोंचे पारितोषिकही ठेवले होते. त्यामुळे बंडखोरांची परिस्थिती अधिकच बिकट होत होती. काही बंडखोर शहरातील चळवळीत पाठविण्याची विनंती करीत. जाणाऱ्या येणाऱ्यांची संख्या सोडल्यास फिडेलला सतत चिकटून राहणारे अठराच. अशा परिस्थितीतही हालचाली सुरू होत्याच.

क्रांतिकारकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी कास्ट्रोने ला प्लाटा येथील काही छोट्या सैनिकी बराकींवर हल्ला करण्याची योजना आखली. बंडखोरांनी अगोदर जवळील नदीत स्नान उरकले. दोन-एक महिने कुणी स्नानच केले नव्हते आणि सतरा जानेवारीच्या पहाटे बराकींना चारी बाजूंनी वेढा घालून योजनापूर्वक हल्ला चढविला. दोन सैनिक ठार झाले आणि पाच जखमी झाले आणि बराकी तासाभरात शरण आल्या. बंडखोरांपैकी एकालाही जखम झाली नाही. उलट त्यांना आठ बंदुका, एक मशीनगन आणि सुमारे एक हजार काडतुसे मिळाली.

क्रांतिकारकांचा हा पहिला विजय. बाटीस्टाला, आणि क्यूबन जनतेला जाग आणून देणारा बंडखोरांची तुकडी अद्याप सिएरा मेस्त्रामध्ये जोरात काम करते आहे याची सर्वांना खात्री पटली. आणि आपल्या अंतिम विजयाची आशा दाखविणारा असा हा पहिलाच विजय बंडखोरांना वाटला. त्यांच्यातले जे कच्चे होते ते या विजयाने तयार झाले.

बंडखोरांमध्ये सामील होणाऱ्यांमध्ये काही हेरगिरी करणारेही होते. बाटीस्टाचा असाच एक हेर म्हणजे युतिम्यो. याने बंडखोरांचे नुकसान केले. तो फिडेलच्या जिवावरही टपला होता. पण अखेर तो पकडला गेला.

---

अवस्था आणीबाणीची होती. 'ग्राम्मा 'मधून आलेल्यांपैकी बंडखोर आणि शेतकऱ्यांमधून येऊन मिळालेले असे सर्व मिळून बंडखोरांची संख्या दोन महिन्यानंतरही अठराच्या पुढे गेली नव्हती. अद्याप शस्त्रास्त्रे मिळाली नव्हती. कुमकही आली नव्हती. अजून तर खूपच मोठा टप्पा गाठायचा होता. पण फिडेल उदास नव्हता....

# अरुण साधू । लेखांक सात

---

सुरुवातीला बंडखोरांचा युतिम्यो ग्वेरा यावर एक आदर्श शेतकरी क्रांतिकारक म्हणून पूर्ण विश्वास होता. युतिम्यो गरीब शेतकरी होता आणि जमिनदाराविरुद्ध झालेल्या लढ्यात तो इतर शेतकऱ्यांबरोबर लढला होता. वाटाड्या म्हणून क्रांतिकारकांना तो खूपच उपयुक्त वाटत होता.

काही दिवसानंतर युतिम्यो सैनिकांकडून पकडला गेला. त्याला ठार मारण्याऐवजी एका अधिकाऱ्याने लाच दिली. फिडेलला ठार मारल्यास दहा हजार पेसो आणि सैन्यात अधिकाऱ्याची जागा देण्याचे त्याला आश्वासन दिले आणि सोडून दिले. युतिम्यो बंडखोरांत परत आला पण त्याचा संशय मात्र कुणाला आला नाही.

युतिम्यो आल्यापासून विचित्र घटना घडू लागल्या. एकदा युतिम्यो आपल्या आजारी आईला भेटण्यासाठी म्हणून परवानगी घेऊन कँप सोडून निघून गेला. दुसरेच दिवशी कँपच्या ठिकाणी विमानांनी येऊन बाँबवर्षाव केला. केवळ प्रसंगावधानाने बंडखोर वाचले. आपल्या सैंपाकाच्या धुरामुळे विमानांना आपला पत्ता

लागला असावा असे त्यांना वाटले. पण युतिम्योचा कुणाला संशय आला नाही. त्याच सुमारास जवळच्या एका खेड्यातील दहा माणसे बंडखोरांना येऊन मिळाली आणि त्यांची सख्या वाढली. युतिम्यो कँप सोडून निघून गेला असतानाच पुन्हा दोनदा बाटीस्टाच्या सैनिकांनी बंडखोरांवर हल्ले केले तेव्हा कुठे त्याचा संशय येऊ लागला.

परंतु हा संशय येण्या अगोदर युतिम्योने फिडेलचा खून करण्याचा एकदा प्रयत्न केला. पण त्याला धैर्य झाले नाही. एके रात्री आपल्याजवळ ब्लँकेट नसल्याची युतिम्योने तक्रार केली आणि फिडेलचे ब्लँकेट मागितले. फेब्रुवारीमधील त्या रात्री अतिशय कडक थंडीच्या होत्या. फिडेल म्हणाला, "मी जर तुला ब्लँकेट दिलं तर आपण दोघंही गोठून जाऊ. त्यापेक्षा माझे दोन कोट आणि ब्लँकेट पांघरून एकत्रच झोपू."

ती सबंध रात्र युतिम्योने फिडेलच्या शेजारी झोपून काढली. त्याच्या अंगावरच एक पिस्तूल होते आणि पळून जाताना कव्हर म्हणून दोन हँडग्रेनेडस् होते. त्या वेळी चे गव्हेरा आणि युनिव्हर्सो सॉचेझ हे फिडेलच्या अगदी जवळ जवळच असत. त्यांच्यापाशी युतिम्योने कोण कोण पहारेकरी कुठे कुठे आहेत याची झोपण्यापूर्वी चौकशी केली. फिडेलच्या संरक्षणासाठी तीन खास पहारेकरी ठेवले आहेत; शिवाय 'ग्राम्मा' चे जुने सहकारी असे चे आणि युनिव्हर्सो असे दोघे आहेतच असे त्यांनी त्याला सांगितले.

## ती रात्र...

चे गव्हेरा लिहितो; अशा रीतीने युतिम्योने क्रांतीच्या नेत्याच्या शेजारी झोपून रात्र काढली. फिडेलचे आयुष्य त्याच्या हातातील पिस्तुलावर होते. फिडेलचा खून करण्याची तो संधीच शोधत होता. परंतु त्याला धैर्य झाले नाही. एका देशद्रोह्याच्या मनातील विचित्र अनाकलनीय गुंतागुंतीवर धैर्य आणि भीती, सद्‌बुद्धी आणि सत्ता व पैसा आणि लालसा यांच्यामधील झगड्यावर त्या रात्री क्यूबन क्रांतीच्या अग्रदूताचे आयुष्य अवलंबून होते. सुदैवाने युतिम्योच्या मनावरील आणि बुद्धीवरील बंधने अधिक प्रभावी ठरली आणि काही वाईट गोष्ट न घडताच पहाट उजाडली.

पुढे एक-दोनदा बंडखोरांच्या ठिकाणांवर हल्ले झाल्यावर आणि युतिम्योला संशयास्पद रीतीने काही सैनिकांबरोबर हिंडताना पाहिल्यावर त्याच्या द्रोहाची क्रांतिकारकांना खात्री पटली. जुआन अलमैडा आणि त्याच्या गटावर त्याला पकडून आणण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

युतिम्योला पकडण्यास फार वेळ लागला नाही. त्याच्या अंगावर लपविलेले पिस्तूल, दोन हातबाँब आणि सुरक्षित प्रवासाचा सैन्याचा पास सापडला. पुरावा उघड होता. आपले काय होणार हे युतिम्योला कळून चुकले. फिडेलच्या समोर जाऊन तो गुडघ्यावर पडला आणि 'मला ठार मारा, मी मरायच्याच लायकीचा आहे', असे

म्हणाला. आपली चूक त्याने कबूल केली.

त्याच्या फितुरीबद्दल फिडेलने त्याला चार गोष्टी सुनावल्या. युतिम्योचा जिवलग मित्र सिरो फ्रायस हाही भावनातिरेकाने त्याला टाकून बोलला. युतिम्योच्या फितुरीमुळेच सिरोचा एक भाऊ गेला होता. आम्ही तुझ्यासाठी आणि तुझ्या कुटुंबासाठी एवढे केले आणि तू मात्र असा दगा दिलास ना ? असे विचारीत सिरोने एक लहानसे भाषण केले तेव्हा सर्वांच्या डोळ्यात पाणी आले. तुझी शेवटची इच्छा काय असे विचारता युतिम्योने सांगितले, माझ्या मुलांची क्रांतिकारकांनी काळजी घ्यावी.

'तेवढ्यात प्रचंड वादळ सुटले, आकाश काळवंडून आले. ढग गडगडू लागले आणि विजा चमकू लागल्या. एकापाठोपाठ एक असा गडगडाट चालू असताना आणि विजेचा एक प्रचंड लोळ खाली कोसळत असतानाच युतिम्यो ग्वेराचे आयुष्य संपले. अगदी त्याच्याजवळ उभे असलेल्यांनादेखील पिस्तुलाच्या गोळीचा आवाज ऐकू आला नाही –'

असे बरेच दगाबाज निघाले. जे सापडले त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. युतिम्यो प्रकरणाचा बंडखोरावर खूपच परिणाम झाला होता म्हणून त्याच्याविषयी लिहिले. खुद्द ग्व्हेराने आपल्या पुस्तकात त्याच्यावर एक प्रकरण खर्ची घातले आहे. युतिम्योच्या अंतकाळच्या प्रसंगाचे वर्णन ग्व्हेराचेच. दगाबाजीचे परिणाम बंडखोरांनी आधीच भोगले होते. त्यामुळे शिस्त अधिकच कडक झाली.

बंडखोरांचे जीवन भयंकर हालाचे असल्याने सर्वचजण तग धरू शकणारे नव्हते. पहिल्या बारा जणांना येऊन मिळणाऱ्यांपैकी सगळेच लोक एवढे सहनशील नव्हते. काही पळून जात. सतत हालचाल, सतत पाण्याची तहान, भूक आणि बाटीस्टाचे सैनिक सतत पाठीवर. हा ताण काही जणांना सहन होत नसे. अशांच्या नर्व्हज् तुटत आणि ते पळून जात. ते काही दगाबाज नव्हते. पण बाटीस्टाच्या सैनिकांच्या हाती सापडल्यावर त्यांच्या हालांना बळी पडून ते सर्व माहिती सांगणार नाहीत कशावरून? त्यामुळे फिडेलने बंडखोरांना सोडून पळून जाणे हा गुन्हा ठरवून त्याची शिक्षा देहदंड ठरविली. परिस्थिती बिकट होती. आणि शिस्त अत्यंत महत्त्वाची होती. पोलादी हिंमत आणि आपल्या ध्येयावरील अनन्य श्रद्धा ज्यांची असेल अशीच माणसे त्या हालअपेष्टांमध्ये टिकू शकत होती, जी टिकली तीच आज फिडेल कास्ट्रोच्या नेतृत्वाखाली क्यूबन सरकार चालवीत आहेत. क्रांती ही अनियमित असते. त्यामुळे क्रांतीचे नियमही अनियमित असतात. एक तर ते पाळावे तरी लागतात किंवा मरण तरी पत्करावे लागते.

सुरुवातीला तरुण किंवा आजूबाजूच्या खेड्यातले संतप्त तरुण किंवा शहरांमधील फिडेलचे निकटचे सहकारीच बंडखोरांना सिएरा मेस्त्रामध्ये येऊन मिळत.

या सुरुवातीच्या काळातच येऊन मिळणारी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे सेलीया सांचेझ, सिएरा मेस्त्राशी प्रथम संपर्क जुळविणारी शहरातील सव्वीस जुलैची कार्यकर्ती म्हणजे सेलीयाच. डिसेंबरच्या शेवटालाच तिला कळले की फिडेल आणि त्याचे साथीदार जिवंत असून ते सिएरात लपून आहेत. त्याबरोबर ती सिएरात आली. सुरुवातीचे काही दिवस सिएरा आणि सांत्यागो या दरम्यान तिने वाटाड्याचे आणि निरोप्याचे काम केले. पण फेब्रुवारी १९५७ च्या बैठकीनंतर सेलीया सिएरा-तच राहिली.

सेलीया सांचेझ खरे म्हणजे एका श्रीमंत डॉक्टरची मुलगी, पण सव्वीस जुलै चळवळीशी तिचा जवळचा संबंध आला. मोंकाडा प्रकरणानंतर एक वर्षात म्हणजे १९५४ साली ती चळवळीत सामील झाली आणि लवकरच चळवळीच्या आतल्या वर्तुळात तिने प्रवेश केला. 'ग्राम्मा'मधील आघाडीसाठी तिला मेक्सिकोत जायचे होते. पण बरोबर कुणी स्त्री नको म्हणून फिडेल कास्ट्रोनेच परवानगी नाकारली, 'ग्राम्मा'च्या स्वागताची क्यूबात तयारी करणाऱ्यांमध्ये ती फ्रँक पेयसबरोबर आघाडीवर होती. पुढे भूमिगत झाली. सिएरात येऊन मिळाल्यावर तेथील सर्व तऱ्हेच्या हालअपेष्टा तिने विनतक्रार सहन केल्या. एवढेच नव्हे तर हाती बंदूक घेऊन लढायांमधून भागही घेतला. कमकुवत मनाच्या क्रांतिकारकांना तिचा उत्साह आणि तिची सहनशीलता स्फूर्तिदायी वाटत होती.

प्रथमपासून सेलीया सांचेझ ही फिडेल कास्ट्रोच्या अत्यंत विश्वासातील. ती एक बुद्धिमान आणि धाडसी स्त्री आहे. सिएरातील सर्व हालअपेष्टा तिने हसत हसत सहन केल्या आणि फिडेलवर तिची अगदी प्रथमपासून अनन्य साधारण निष्ठा आहे.

फिडेलच्या आयुष्यातील तिची भूमिका रहस्यमय आणि रोमँटिक आहे. फिडेल-वरील निष्ठेबरोबरच त्याच्यावर ती अपार प्रेम करते आहे हे सिएरा मेस्त्रामध्येच उघड झाले होते. दोघांचा विवाह झालेला नाही, पण क्रांतीनंतर सेलीयाने फिडेलच्या गृहिणीची भूमिका घेतली. हवानामधील फिडेल कास्ट्रोच्या घराची देखभाल सेलीयाच करते. फिडेल वैयक्तिक बाबतीत अत्यंत बेशिस्त सवयींचा माणूस. त्याचे कपडे गबाळे आणि अ‍ॅशट्रेमध्ये सिगार झटकायचा त्याला मनस्वी कंटाळा. या उलट सेलीया सांचेझ अत्यंत शिस्तीची. घर अगदी चकचकीत ठेवणे तिला आवडते. दोघांचे जमते कसे ? हे कोडेच आहे. या दोघांमधील रोमांचकारी नात्याचेही क्यूबात कौतुक आहे. क्रांतीनंतर सेलीयाला फिडेलच्या मंत्रीमंडळात एक महत्त्वाचे खाते मिळाले.

फेब्रुवारी १९५७ च्या सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत अधिक कुमक पाठविण्याचे फ्रँक पेयसने आश्वासन दिले होते. ही कुमक येईपर्यंतचा काळ फार अवघड गेला. अनिश्चितपणे बंडखोर भटकत होते. बातीस्टाच्या सैनिकांशी अधून मधून चकमकी घडत होत्याच. 'ग्राम्मा'मधून आलेले आणि सिएरामध्येच लपत-

छपत हिंडत असलेले तिघे क्रांतिकारक बंडखोरांना त्यांचा पत्ता काढत काढत येऊन मिळाले.

तेवढी संख्या वाढली. पण परिस्थिती बदलली नाही. भूक, तहान, पाऊस आणि वादळे यांनी बेजार केले होते. शिवाय बाटोस्टाचे सैनिक होतेच. सैनिक जंगलामध्ये कधीच शिरत नसत. पण अधूनमधून बाहेरूनच ठिकठिकाणच्या झाडयांमध्ये गोळीबार करीत राहात. पुन्हा एकदा फिडेल मेल्याच्या बातम्या बाहेर पसरल्या.

तेवढ्यात चे गव्हेराच्या दम्याने भयानक उचल खाल्ली. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अशी सतत हालचाल करीत असताना अधूनमधून सैनिकांना चुकवून पळत जावे लागे. चेला दम्याच्या उबळीमुळे चालणेही अशक्य होई. त्याच्याबरोबर फिडेलने एका नव्या जवानाला सोबतीला दिले होते. चेला खेचत, त्याची बकोटी धरून, त्याला धक्के मारीत तो त्याला पुढे सरकवी. बंदूक टेकवून तिच्यावर भार देत, या झाडापासून त्या झाडापर्यंत हेलपाटे खात, प्रत्येक झाडाला टेकून विश्रांती घेत, दम्याची उबळ मोठ्या प्रयासाने आवरीत चे पुढे सरकीत होता. त्या लहान क्रांतिकारकाची ही अवस्था मोठी केविलवाणी होती. परंतु मोठ्या जिद्दीने आणि विलक्षण मानसिक सामर्थ्याच्या जोरावर चे हे हाल सहन करून जगत होता.

अशा तऱ्हेने नव्या कुमकीची वाट बघत सिएरा मेस्त्रात बंडखोर हिंडत असतांनाच तिकडे शहरांमधील चळवळींनाही एक वेगळीच धार आली होती. मार्च १३ ला काही विद्यार्थ्यांनी हॅवानातील बाटोस्टाच्या राजवाड्यावर हल्ला करून त्याला ठार मारण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्याच्याही बातम्या आल्या.

## तंग परिस्थिती

हॅवानामधील आणि साऱ्या क्यूबामधील राजकीय परिस्थितीच भयंकर तंग होत होती. भ्रष्टाचार पराकोटीला पोचला होता, हॅवाना म्हणजे श्रीमंत अमेरिकन प्रवाशांचे विलास स्थानच झाले होते. कोवळ्या वयाच्या क्यूबन मुली तेथील वेश्यागृहात मिळतात म्हणून हॅवानाची सर्वत्र ख्याती झाली होती. थोड्या संशयाने विद्यार्थ्यांना पकडले जाई आणि तुरुंगात त्याचे हाल केले जात. सर्वत्र अत्यंत अशांततेचे वातावरण पसरले होते, बाटोस्टाची दुष्कीर्ती अगदी शिगेला पोचली होती आणि जो तो मनातल्या मनात बाटोस्टाशी लढण्याचे बेत आखीत होता. त्यांचे आशास्थान होते. फिडेल आणि त्याचा लहानसा गट.

मार्च १३, १९५७ रोजी दुपारी तीन वाजता हॅवानामधील अध्यक्षीय राजवाड्यासमोर एक मोठा ट्रक अचानक वेगात येऊन थांबला. शस्त्रधारी माणसांनी या ट्रकमधून भराभर खाली उड्या टाकल्या आणि ते राजवाड्यात घुसले. समोरच्या पहारेकऱ्यांना काय प्रकार आहे हे कळण्याच्या आतच त्यांच्या छातीत मशीनगनच्या गोळ्या घुसल्या. बंडखोर आत शिरले आणि सरळ पहिल्या मजल्यावरील बाटोस्टाच्या ऑफिसात शिरले. पण दैवयोगाने बाटोस्टा त्या वेळी तिथे

नव्हता. काही मिनिटापूर्वीच डोके दुखते आहे म्हणून दुसऱ्या मजल्यावरील आपल्या झोपण्याच्या खोलीत तो गेला होता. तोवर सगळीकडे गडबड उडाली होती. बंडखोरांना दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा रस्ता माहित नव्हता. जादा सैनिक धावून आले आणि काही मिनिटातच राजवाड्यात शिरलेले पंचवीस बंदुकधारी तरुण जागच्या जागीच रक्ताच्या थारोळ्यात मरून पडले. हॅवाना विद्यापीठातील क्रांतिकारी संचलन या एका जहाल संघटनेचे ते तरुण सभासद होते. कास्ट्रोच्या सहवीस जुलै चळवळीशी त्या वेळी तरी त्यांचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. पण कास्ट्रोला ते स्वभावतःच आपला स्फूर्तिदाता मानीत होते.

राजवाड्यात मरून पडलेल्या एका तरुणाच्या अंगावरील कपड्यात एका कागदावर हॅवानातील एक सुप्रसिद्ध वकील डॉ. पेलायो कुर्वो याचे नाव लिहिलेले पोलिसांना सापडले. झाले. तावडतोब पोलिसांच्या दोन गाड्या त्यांच्या घरी रवाना झाल्या, डॉ. पेलायो घरी नव्हता. तेवढ्यात कळले की, तो त्याच्या एका मित्राकडे गेला आहे. पोलिस तिथेही पोचले. तेथून पोलिसांनी त्याला खेचून काढले. आणि घरासमोरच, रस्त्याशेजारच्या एका डबक्याजवळ एका पोलीस अधिकाऱ्याने त्याला सरळ गोळी घालून ठार मारले.

बाटोस्टावरील मारेकऱ्यांच्या प्रयत्नामुळे तर क्यूबात खळबळ उडालीच, पण डॉ. पेलायोच्या खुनामुळे सर्वत्र संतापाची एक लाटच पसरली. कारण डॉ. पेलायो हा वरच्या थरात वावरणारा एक प्रतिष्ठित सुप्रसिद्ध वकील होता. आणि काहीही चौकशी न करता त्याला मारण्यात आले हे सगळ्यांना कळून चुकले होते. त्यामुळे हॅवानामधील उच्च स्तरातही बाटोस्टाविरुद्धचा असंतोष वाढीला लागला. सगळी-कडे धरपकड सुरू झाली. दडपशाही अधिकच वाढली. ज्याला फिडेल कास्ट्रोसह बाटोस्टाशी लढायचे असेल त्याने आधी शस्त्र मिळवले पाहिजे असा सहवीस जुलै चळवळीचा आदेश होता. त्यामुळे ठिकठिकाणी एकटचा दुकटचा पोलिसांचे मुडदे पडून त्यांच्या बंदुका लांबविल्या जाऊ लागल्या.

सहवीस जुलैचा हॅवानामधील पुढारी आर्मांडो हार्ट याला 'ग्राम्मा' प्रकरणाच्या वेळीच अटक झाली होती. हॅवाना मध्येच त्याच्यावर खटला चालू होता. एके दिवशी खटल्यासाठी त्याला नेत असतानाच त्याने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पलायन केले. त्याला पकडून नेणाऱ्या पोलिसाच्या हाती फक्त त्याचे जॅकेट राहिले. या घटनेलाही क्यूबात भलतीच प्रसिद्धी मिळाली. पोलिसांच्या फजितीमुळे लोकांना भलताच आनंद झाला.

त्यानंतर काही दिवसांनी आणखी एका प्रकरणाला मोठी प्रसिद्धी मिळाली. फिडेल कास्ट्रोवरील बाटोस्टाच्या सैनिकांचा दबाव कमी करण्यासाठी कॅलिक्सो सांचेझ या तरुणाने मेक्सिकोतून आणखी एका सशस्त्र तुकडीला आणून क्यूबन किनाऱ्यावर उतरविण्याचा उपक्रम केला. एका बोटीतून सत्तावीस सशस्त्र तरुणांना

घेऊन कॅलिक्सो क्यूबात उतरला खरा. पण त्याच्या, उतरण्याची जागा पोलिसांना आधीच माहीत झाली होती. हा गट जेव्हा उतरला तेव्हा 'व्हिवा कास्ट्रो' (कास्ट्रोचा विजय असो) अशा घोषणा देत काही शेतकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. या शेतकऱ्यांनी त्यांच्याभोवती पक्के कोंडाळे केले तेव्हा कुठे बंडखोरांना कळून चुकले की ते शेतकरी नसून शेतकऱ्यांच्या वेशातील बाटीस्टाचे सैनिक आहेत.

पण तोवर फार वेळ झाला होता. एक गोळीही न झाडता त्यांना शरण जावे लागले. परंतु सैनिकांचा नेता कर्नल कोले याने त्यांच्यापैकी सतरा जणांना जागच्या जागी गोळ्या घालून ठार मारले. गोळागोळीला सुरुवात होताच गडबड उडाली. आणि दहा बंडखोर जीव वाचवून पळून जाण्यात यशस्वी झाले. आजूबाजूच्या डोंगरांमधून आणि गावांमधून ते भूमिगत कामे करू लागले. फिडेल कास्ट्रो ज्या सिएरा मेस्त्रात हालचाल करीत होता त्यावरील लष्करी वेढा कायम राहिला.

## कुमक पोचली

अखेर फ्रँक पेयसने कबूल केलेली कुमक सैनिकांच्या लायनी शितोफीने ओलांडून सोळा मार्च रोजी सिएरा मेस्त्रामध्ये येऊन पोचली. स्वतः फ्रँक सांत्यागोमध्ये पोलिसांकरवी पुन्हा पकडला गेला होता. पण त्याने पाठविलेली पन्नास सशस्त्र तरुणांनी कुमक सुरक्षित पोचली.

नव्याने आलेल्या तरुणांना सिएरा मेस्त्राच्या प्रखर कष्टमय जीवनाची एवढी-शीही जाणीव नव्हती. त्यांचे स्वच्छ कपडे, चकचकीत दाढ्या, लवकर येणारा थकवा, बेशिस्त, प्रदेशाचे अज्ञान यामुळे ते घाणेरड्या मळक्या कपड्यांच्या आणि दाढ्या वाढलेल्या जुन्या दठाकर बंडखोरांहून एकदम वेगळे पडत. हळूहळू हे नवे लोकही रुळले, त्यांच्याही दाढ्या वाढल्या, कपडे मळले, लांब, लांब चाल करून जाण्याची सवय झाली, तहान, भुकेला तेही सरावले. हाल अपेष्टा सहन करून येणारी जिद्द त्यांच्यातही आली. लौकरच ते गनिमी युद्ध तंत्रातही तयार झाले. तक्रारी करण्याची सवय गेली. येईल त्या प्रसंगाला धैर्याने तोंड देण्याइतपत तयारी झाली. आता बंडखोरांजवळ शस्त्रास्त्रे त्यांच्या एकूण संख्येपेक्षा कमी होती. पण क्रांतिकारकांच्या संघटनेत गुणवत्तात्मक बदल झालेला निश्चित दिसून येत होता.

काही दिवसाने सांत्यागोहून काही शस्त्रेही चळवळीच्या कार्यकर्त्यांनी पाठविली. मशिन गन्स, बंदुका काडतुसे. बंडखोरांनी आता एक निश्चित भूभाग मुक्त केल्या-सारखा झाला होता. घनदाट जंगलांनी व्यापलेल्या या भागात बाटीस्टाच्या सैनि-कांनी येण्याचे सोडून दिले होते. शेतकऱ्यांशी अधिक घनिष्ट संबंध ठेवून बंड-खोरांनी आपल्या दळणवळणाची व्यवस्था चोख ठेवण्यास प्रारंभ केला. वेगवेगळे मार्ग मुक्रर करून त्या मार्गावर ठिकठिकाणची शेतकऱ्यांची घरे निवडणे व त्या घरांमध्ये शस्त्रांचा, अन्नाचा पुरवठा करून ठेवणे असा क्रम त्यांनी आरंभला. अशा तऱ्हेच्या गुप्त ठिकाणांचे जाळेच सर्व सिएरा मेस्त्रामध्ये निर्माण झाले. ही घरे

म्हणज संदेशांची देवाणघेवाण करणाऱ्या अथवा शहरातून माल आणणाऱ्या दूताची विश्रांतीस्थळेच झाली. याच सुमारास सेलीया सांचेझ आणि हेडीं सांतामारिया या दोन कार्यकर्त्या शहरांमध्ये सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांनी गोळा केलेला पैसा घेऊन सिएरा मेस्त्रात आल्या. पैश्यांच्या उपलब्धतेमुळे शेतकऱ्यांशी चांगले संबंध ठेवणे कठीण गेले नाही.

फिडेल कास्ट्रो किंवा त्याचे सहकारी बंडखोर हे सारे मध्यमवर्गीय आणि शहरी, पण कोणतेही गनिमी युद्ध स्थानिक लोकांच्या मदतीशिवाय होणे अशक्य आहे हे फिडेलने हेरले होते. सिएरा मेस्त्रामधील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दरिद्री. लोकसंख्या विरळ. त्यामुळे त्यांची सामुदायिक प्रतिकारशक्ती अथवा संघटना शून्य. त्यामुळे शेतकऱ्यांना एकत्र संघटित करणे हे मोठेच कठीण काम होते. विशेषत: अत्यंत विरळ लोकसंख्येमुळे बाटीस्टाचे सैनिक कोणत्याही एकट्या दुकट्या घरावर हल्ला करू शकत होते.

## स्थानिक जनतेचा पाठिंबा

त्यामुळे शेतकऱ्यांना संघटीत करण्यापेक्षा गनिमी सैन्य वाढवून शेतकऱ्यांच्या मदतीवर टिकाव धरणे हाच मार्ग फिडेलला होता. चळवळ जसजशी वाढू लागली तसतसा शेतकऱ्यांचा पाठिंबा वाढू लागला. शेतकऱ्यांची तरुण, बेकार मुले बंडखोरांना येऊन मिळू लागली. येताना बरोबर शस्त्र हवेच हा तर नियम होता. एकट्या-दुकट्या सैनिकाला किंवा पोलिसाला अंधारात गाठायचे, त्याची मान दाबायची किंवा पोटात चाकू खुपसायचा आणि त्याची बंदूक पळवायची, असे प्रकार सर्रास चालू झाले. बाटीस्टाच्या सैनिकांची सिएरा मेस्त्राच्या जंगलात घुसण्याची हिंमत संपली तेव्हा ते आजूबाजूच्या खेड्यांमधून जुलूम करू लागले. बंडखोरांचा सहाय्यक असा कोणावरही आरोप करून, त्याच्या घरावर धाडी टाकून सर्रास खून करू लागले तेव्हा शेतकरी अधिकच चिडले. बंडखोरांविषयीची त्यांची सहानुभूती वाढली. सैनिकांच्या हालचाली, त्यांची संख्या, त्यांच्याजवळील शस्त्रे या विषयीची इत्थंभूत माहिती ते बंडखोरांना आस्थेने पुरवू लागले. स्थानिक जनतेला प्रेमाने आणि आपल्या कामाने फिडेलने आपल्या बाजूला वळवून घेतले यातच त्याने अर्धा विजय मिळविला होता.

दोन महिने असेच हिंडण्यात आणि शेतकऱ्यांशी संबंध मजबूत करण्यात गेले. मे १९५८ मध्ये सांत्यागोला तीस नोव्हेंबरच्या आंदोलनात भाग घेतलेले जे आरोपी पकडले होते, त्यांच्यावर खटला चालू होता. आरोपींमध्ये फ्रँक पेयस् हाही होता आणि 'ग्रामा 'मधून उतरलेल्या बंडखोरांपैकी बावीस लोक पकडले गेले होते तेही होते. या बावीसांनाही शिक्षा झाल्या. खटला चालविणाऱ्यांपैकी एक मॅजिस्ट्रेट डॉ. मॅन्युअल उरुतिया याने या शिक्षेविरुद्ध मत देऊन हुकूमशाहीविरुद्ध आंदोलन करण्याचा लोकांचा हक्क उचलून धरला. या प्रकरणामुळे उरुतियाला बरीच

प्रसिद्धी मिळाली. पुढे क्रांती यशस्वी झाल्यावर त्याला क्यूबाचे अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. परंतु नंतर क्रांतिकारकांना त्याने भक्कम पाठिंबा न दिल्याने त्याला राजीनामा द्यावा लागला.

खटल्यातून सुटका झालेल्यांमध्ये फ्रँक पेयस् हाही होता. सुटका होताच फ्रँक पुन्हा तावडतोब भूमिगत झाला आणि लगेच त्याने फिडेलशी संपर्क साधला. फ्रँक हा फिडेलच्या अत्यंत जवळचा सहकारी होता. तो एक साधा शाळामास्तर होता. पण त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. निष्ठा असाधारण होती आणि कामाचा झपाटाही विलक्षण होता. तो अत्यंत धाडसी होता. एकदा बघितले, की लोक त्याला विसरत नसत. बंडखोरांमध्ये तो अत्यंत प्रिय होता. सांत्यागोमध्ये राहून त्याने बंडखोरांना अत्यंत मोलाची मदत केली. पुढे तीस जुलै रोजी बाटीस्टाच्या पोलीसांना सांत्यागोमधील त्याच्या लपण्याचे ठिकाण सापडले आणि त्याला गोळी घालून ठार मारण्यात आले. सबंध सांत्यागो शहराने त्या दिवशी दुःखवटा पाळला. सिएरा मेस्त्रामध्ये फिडेल आणि त्याच्या सहकाऱ्यांना तर अधिकच दुःख झाले. कारण त्यांचा निकटचा सहकारी आणि लाख मोलाचा कार्यकर्ता गेला होता.

नव्याने येऊन मिळालेले बंडखोर सिएरा मेस्त्राच्या परिस्थितीत रुळल्यावर आणि शस्त्रांची नवी कुमक मिळाल्यानंतर नवा आक्रमक पवित्रा घेण्याविषयीचे विचार बंडखोरांच्या डोक्यात घोळू लागले. रस्त्यांवरून जाणाऱ्या सैनिकांच्या ट्रक्सपैकी एकटयादुकटया ट्रकला अडवून त्यावर हल्ला करावा अशी सूचना चे गव्हेराने केली. परंतु अशा क्षुद्र हालचालींपेक्षा एल् उव्हेरो या सिएरा मेस्त्रामधील एका लहानशा लष्करी तळावर हल्ला चढवून तो काबीज करावा अशी योजना फिडेलने मांडली. असा तळ जर आपण काबीज केला तर सबंध देशभर त्याचे पडसाद उमटतील आणि जिकडे तिकडे याच गोष्टीची चर्चा होईल. ट्रक काबीज करून हे जमणार नाही. हायवेवरील एक क्षुल्लक अपघात म्हणून ती गोष्ट सहज दुर्लक्षिली जाईल आणि सिएरा मेस्त्रामधील आपली प्रभावी उपस्थिती लोकांना कळणार नाही असे फिडेलचे म्हणणे होते. याचा अर्थ सापडतील ते ट्रक्स पकडायचे नाहीत असा नव्हे. पण आपल्या साऱ्या हालचाली एक ट्रक पकडण्यासाठी केंद्रित होता कामा नयेत.

अखेर एल् उव्हेरो तळावर हल्ला करण्याचे पक्के झाले आणि बंडखोरांची जोरात तयारी सुरू झाली. बंडखोरांची सिएरा मेस्त्रामधील ही पहिली महत्त्वाची मोठी लढाई होती.

[ क्रमशः ]

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. **निरोध** वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. **निरोध** हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे खरी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे **निरोध** अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत ?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




**लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा**

# निरोध ▼

**लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक**

केमिस्ट, वाणी जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/460

# क्रीडांगण

## भारतीय कुस्तीगीर म्युनिचकडे !

**मुकुंद मणूरकर**

यजमानाकडील वास्तव्याबद्दल पाहुण्यांनी चार बरे शब्द बोललेच पाहिजेत असा काही नियम नसतो. पण तरीदेखील तो पाळला जातो. यातील अभिप्रायाला बहुधा औपचारिकपणाचाच वास येतो. पण कधी कधी बोल मनापासूनही बोलले जातात.

आता हेच पहा ना.

अरण्येश्वरच्या मागील बाजूस, पर्वतीच्या डाव्या कुशीत एका टेकडीवजा जागेवर नेहरू वसतीगृहाची छोटीशी इमारत विसावली आहे. शहराच्या गजबजाटापासून अति दूर, चहूबाजूला भरपूर मोकळी जागा आणि याला पुण्याच्या परंपरागत आल्हाददायक हवामानाची जोड ! अशा या जागेत सध्या भारतातील काही नामवंत बलवान मंडळींचा मुक्काम आहे. आणि या मंडळींचे मत – 'भारतात कुस्तीच्या सरावासाठी यापेक्षा चांगली जागा दुसरी कुठलीही नाही !' यातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी एक जाणवतेच, की ही जागा अतिशय रम्य आहे. कुणाचेही मन प्रसन्न करेल अशी ! या जागेच्या निवडीबद्दल संयोजकांना शंभर मार्क दिले पाहिजेत.

तर ही मंडळी जमली आहेत, कुस्तीच्या ऑलेंपिकपूर्व शिबिरासाठी. भारतातील निवडक चाळीस मल्लांत चाचणी सामने घेऊन ऑलेंपिकसाठी सहा जणांची निवड केली. गेले दोन महिने या कुस्तीगीरांचा सराव चाललेला आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या किंवा अधिक अचुक बोलावयाचे झाल्यास मामासाहेब मोहोळ यांच्या संयोजनाखाली हे शिबिर चालू आहे. मार्गदर्शक आहेत श्री. बाळासाहेब लांडगे. लांडग्यांना प्रत्यक्ष कुस्तीचा अनुभव भरपूर आहे, शिवाय त्यांनी पतियाळा येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ स्पोर्टचा मॅटवरील कुस्तीच्या कोचिंगचा अभ्यासक्रमही पूर्ण केला आहे. त्यामुळे मार्गदर्शनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आणि ते ती समर्थपणे सांभाळीत आहेत.

भुरभुरत्या पावसाच्या एका रम्य पहाटे मी या शिबिरात प्रवेश केला. वसतीगृहाच्या प्रवेशद्वारापाशीच एक दोर टांगलेला आहे. त्यावर एकजण अतिशय चपळपणे चढत उतरत होता. बाळासाहेब लांडग्यांनी ओळख करून दिली, ' हे सुदेशकुमार ! ' दिल्ली विद्यापीठाचा हा वीस वर्षांचा तरुण बावन्न किलोखालील गटात खेळणार आहे. पूर्वीचे नेत्रदीपक यश याच्या गाठीला आहे. गेल्या ऑलेंपिक स्पर्धेत याचा सहावा नंबर लागला होता. तर सत्तर साली कॅनडातील जागतिक स्पर्धेत याने पाचवी जागा संपादन केली होती. बँकॉकच्या आशियाई स्पर्धेत व राष्ट्रकुल स्पर्धेत विजेतेपद ! आणि ' या ऑलेंपिक स्पर्धेत सुवर्णपदकाचा खात्रीचा मानकरी '–इति बाळासाहेब लांडगे.

आज मॅटवर निवड झालेले काही मल्ल (दोघे अनुपस्थित होते) आणि काही राखीव मल्ल सराव करीत होते. एका कडेला लहान गटातील दोन मल्ल काही डाव करीत होते. त्यापैकी एक होता दिल्ली विद्यापीठाचा प्रेमनाथ. हा सुदेशकुमारचा चुलतभाऊ. निवडसमितीने याला सातवा नंबर दिला आहे. भारतीय ऑलेंपिक समितीने सातव्या मल्लास पाठविण्यास परवानगी दिली, तर याला संधी मिळणार आहे. पाठीशी अनुभव आहे फक्त १९७० च्या टोकिओमधील जागतिक ज्युनिअर स्पर्धेचा. प्रेमनाथबरोबर खेळत होता तो महाराष्ट्राचा मारुती आडकर. अठ्ठेचाळीस किलोखालील गटात हा खेळणार आहे. यादीत याचा सहावा क्रम असल्याने ऑलेंपिकची संधी नक्कीच मिळणार आहे. मागे आशियाई स्पर्धेच्या वेळी याची निवड झाली असतानाही आयत्यावेळी दुसऱ्यालाच पाठविले.

मध्यभागी एक सावळ्या रंगाचा धिप्पाड असा मल्ल सराव करीत होता. हा कोल्हापूरचा हरिश्चंद्र बिराजदार. महाराष्ट्र केसरीपासून रुस्तमे हिंदपर्यंत चढत्या श्रेणीने विजय संपादन केलेला ! पण याची अधिकृत निवड झाली नाही. सातव्या मल्लास पाठविण्याचा निर्णय घेतल्यास मार्गदर्शक बिराजदारची (ग्रीक रोमन कुस्तीसाठी) शिफारस करणार आहेत. पण सध्या मात्र ऑलेंपिकवारी अनिश्चित !

आणि पलीकडे एक उंचापुरा तगडा असा गौरवर्णी मल्ल वनराजाच्या डौलात येरझारा घालीत होता. वार्मिंग अप् करीत होता. याची ओळख करून घेण्याची गरजच पडली नाही. तो होता भारतातील सध्याचा सर्वोत्कृष्ट मल्ल, मास्टर चंदगीराम ! शिबिरातील सर्वांत मोठे आकर्षण ! भारत केसेरी मेहेरदीन चंदगीरामपेक्षा उंचीत चार इंचांनी आणि वजनात वीस किलोहून जास्त. पण यालाही चंदगीरामने तीन वेळा अस्मान दाखविले आहे. चंदगीरामचा बांधा काहीसा शिडशिडीत असला तरी त्याचे सर्व सामर्थ्य एकवटलेले आहे त्याच्या बाहूत ! लांबसडक आणि जबरदस्त बाहू ! याच्या मनगटाचे प्रताप सर्वश्रुत आहेत. म्युनिचमधील याच्या यशाबद्दल मार्गदर्शकांना मुळीच शंका नाही.

बाळासाहेब लांडग्यांच्या मदतीला आहेत भारतीय कुस्तीगीर परिषदेने पाठ-

विलेले एक निरीक्षक, श्री. गुप्तेश्वर मिश्रा. हे बनारस हिंदू विद्यापीठाचे कोच असून त्यांनी पॅरीसमधील कुस्तीचा डिप्लोमा कोर्स पूर्ण केला आहे. संघटन व संयोजन या कार्यात हे विशेष वाकबदार! भारतीय कुस्तीगीर परिषदेचे 'ब्रेन' म्हणून हे ओळखले जातात.

या सर्वांबरोबर चर्चा केल्यानंतर अनेक वऱ्यावाईट गोष्टी नजरेस आल्या. मुख्य गोष्ट म्हणजे आर्थिक चणचण! प्रत्येक पैलवानास दररोज आहार वगैरे-साठी फक्त दहा रुपये भत्ता दिला जातो. हे म्हणजे एखाद्या मोठ्या वटवृक्षाला झारीने पाणी घालण्यासारखे हास्यास्पद आहे. पैलवानांची इतकी क्रूर चेष्टा दुसरी कुठलीही नसेल. कारण नामवंत पैलवानांचा रोजचा खर्च कमीत कमी पन्नास ते सत्तर रुपयांपर्यंत असतो. बरे, नोकरी करून करण्यासारखा कुस्ती हा खेळ नाही. आणि सर्वच पैलवान काही सधन नसतात. त्यामुळे आपोआपच हे पैलवान इनामी कुस्त्यांकडे वळतात. नेहमी मातीतील कुस्त्या खेळावयाच्या व स्पर्धेच्या काही दिवस आधी मॅटवरील कुस्त्यांचा सराव करावयाचा, पण आंतरराष्ट्रीय स्पर्धेत एवढासा सराव पुरेसा नसतो. त्यामुळे आपले खेळाडू मागे पडतात. चार वर्षांपूर्वी, मेक्सिको ऑलिंपिकच्या वेळी एका नियतकालिकात एक चित्र प्रसिद्ध झाले होते. चित्रात बारा ते सोळा वर्षांपर्यंतची जपानी मुले-मुली अॅथलेटीक्सचा सराव करीत होती.

---

## खासबाग मैदान–कुस्तीगीरांची काशी

कोल्हापूरबद्दल चंदगीरामला विशेष आपुलकी आहे. खासबाग मैदानाची त्याने खूप प्रशंसा केली. तो म्हणाला, 'मी १९६१ साली प्रथम कोल्हापूरला आलो. त्यावेळी खासबाग मैदान बघितले. त्याच्या भव्य स्वरूपाकडे पहात मी काही क्षण स्तब्ध झालो. जसा हिंदू एकदा तरी काशी-बनारसची यात्रा करतो (हा वादाचा विषय आहे!) त्याप्रमाणे प्रत्येक कुस्तीगीराने या मैदानात एक तरी कुस्ती खेळलीच पाहिजे. हे मैदान म्हणजे कुस्तीगीरांची काशीच!' कोल्हापूरच्या कुस्तीशौकीनांबद्दलही त्याने गौरवोद्गार काढले. 'मी अनेक ठिकाणी कुस्त्या खेळलो. पण कोल्हापूरसारखे कुस्तीचे शौकीन मी कुठेही पाहिले नाहीत. भारी भारी दराची तिकिटे काढून हे कुस्ती पहायला येतात. कुस्ती निकाली झालीच पाहिजे, ही त्यांची मागणी! पैलवानांनी आपापसात बेबनाव केल्यास हे संतप्त होतात. प्रसंगी दगड-विटाही फेकतात. मग हा आपल्या घरचा पैलवान, तो आपल्या बाहेरचा, असा भेदभाव ते करीत नाहीत. अशा प्रेक्षकांसमोर कुस्ती खेळताना मला स्फुरण येते!'

---

आणि चित्राखाली टीप होती–'बहात्तरच्या ऑलेंपिकची तयारी!' म्हणजे चार चार वर्षे ही मुले सक्त सराव करीत असतात. यांचा सर्व खर्च सरकार करते. आणि शिवाय स्पर्धेत यश मिळो वा न मिळो, यांच्या भवितव्याची तरतूद करून ठेवलेली असते. उगीच नाही हे खेळाडू शेकड्यांनी पदके मिळवीत! या बाबतीत आपल्याकडील तुलना केल्यास काळाकुट्ट अंधार दिसतो. ऑलेंपिकचे वारे वाहू लागले की आधी 'ऑफिशिअल्स' म्हणून कुणी कुणी वारी करावयाची याबाबत हाणामाऱ्या सुरू होतात. आणि स्पर्धा ऐन तोंडावर आली असतानाही खेळाडूंची अंतिम निवड होऊ शकत नाही. खेळाडूंना इतके गौणत्व दुसऱ्या कुठल्याही देशात प्राप्त होत नसेल.

एक नुकतीच प्रसिद्ध झालेली बातमी – भारताचा हॉकीतील जादूगार ध्यानचंद. भारताला ओळीने तीन वेळा सुवर्णपदक मिळवून देण्यात याचा सिंहाचा वाटा. छत्तीस साली बर्लिनमध्ये तो शेवटची ऑलेंपिक स्पर्धा खेळला. पण तेथील प्रक्षकांवरची त्याच्या खेळाची मोहिनी अजून उतरली नाही. यंदा म्युनिच ऑलेंपिक मध्ये त्यांनी ध्यानचंदला सन्माननीय पाहुणा म्हणून खास आमंत्रित केले आहे. निवृत्त झालेल्या आणि तेही एका परदेशी खेळाडूबद्दल किती ही आस्था!–आणि आपल्याकडे? बाळासाहेब लांडगे सांगत होते, आपल्याकडे अर्जुनपदक मिळविलेला एक कुस्तीगीर सध्या पोस्टात पोती उचलण्याचे काम करीत आहे. नाहीतरी खेळात चमकत असेपर्यंत उदोउदो आणि नंतर एकदम दुर्लक्ष, क्वचितप्रसंगी कुचेष्टा ही आपली परंपराच आहे!

शिबिरात नजरेत आलेले आणखी दोन प्रसंग सांगतो. पैकी एक आहे पैलवानांच्या भाबड्या समजुतीचा. ह्या लोकांना दुसऱ्याने तयार केलेले अन्न चालत नाही. का तर म्हणे त्याला नजर लागते. पण स्वत: सर्व स्वयंपाक करण्यासाठी

---

## चंदगीराम प्रसिद्धीच्या मागे

प्रसिद्धीची चटक ही वाईट. चंदगीरामसारखा नामवंत पैलवान, जो अनेक मोहांपासून दूर राहिला आहे, आता प्रसिद्धींच्या मागे लागला आहे. प्रसिद्धीचे मोठे साधन म्हणजे सिनेमा! दारासिंगाच्या पावलावर पाऊल टाकून चंदगीरामनेही या क्षेत्रात प्रवेश केला आहे. आतापर्यंत पंधरा चित्रपटात तो चमकला आहे. 'एका चित्रपटात काम करणे म्हणजे शंभर कुस्त्यांपेक्षाही कष्टप्रद,' चंदगीराम सांगत होता, 'पण लोकप्रिय व्हायचे तेच एक साधन. म्हणून मी विनावेतन चित्रपटात काम करतो. कुस्तीपेक्षा या माध्यमातूनच मी जास्त लोकप्रिय होईन!'

---

यांना किती कष्ट पडतात ! अगदी दळण आणण्यापासून पाणी भरण्यापर्यंत सर्व कामे हे स्वत:च करतात. विनाकारणच कार्यशक्तीचा ऱ्हास होतो.

आणि हा दुसरा प्रसंग. निवड झालेल्या एका मल्लाच्या कानाला दुखापत होते. पण त्याला उपचारासाठी पाठविले जाते, लांब कसबा पेठेतील एका डॉक्टरांकडे आणि तेही बसमधून ! परप्रांतातील या पैलवानावर मग पुण्यातील बोळांमधून डॉक्टरचा पत्ता हुडकण्याची जबाबदारी येते. वास्तविक अशा प्रसंगी किमान टॅक्सी, रिक्षाची तरी सोय हवी.

गुप्तेश्वर मिश्राजी आणखी काही सांगत होते. पण मी मात्र एक स्वप्न पाहात होतो. सर्व कुस्तीगीरांची सोय ब्ल्यू डायमंडसारख्या एखाद्या आलीशान हॉटेलात केली आहे. कुस्तीच्या सरावाच्या ठिकाणी नेण्याआणण्यासाठी इम्पाला सज्ज आहे. कुस्तीगीरांना मसाजसाठी खास सोय आहे. तज्ज्ञ डॉक्टर दिमतीला आहेत आणि या सर्वांबरोबर भविष्यातील आर्थिक तरतुदीची सुस्पष्ट ग्वाही दिली आहे. मग काय विशाद आहे यांनी पदके मिळविली नाहीत तर ?

निरोपाच्या वेळी सर्व पैलवानांना सदिच्छा अर्पण केल्या. त्यावेळी चंदगीराम म्हणाला, ' या सदिच्छा पाठीशी आहेत म्हणून आम्ही खेळतो. सरकार आम्हाला अर्जुनपदक, पद्मश्री वगैरे देते. यात खरा एक कागदच असतो. पण या कागदाशी कोटयावधी लोकांच्या भावना निगडीत असतात याची आम्हाला कल्पना असते. आम्ही जरूर विजयी होऊ ! '

कुस्तीगीरांचा सकाळचा सराव संपला होता. सर्वजण घामाने निथळत होते. हे घर्मबिंदू बरेच काही सांगून गेले. एक मात्र प्रकर्षाने जाणवले, की यातील काही घर्मबिंदूंची किंमत खूप खूप मोठी आहे.

हो, अगदी म्युनिचमधील सुवर्णपदकाएवढी !

□ □ □


# अग्निपुत्र

**वसंत पोतदार**

मूल्य : रुपये चौदा
राजहंस प्रकाशन
पुणे ३०

## पुन्हा एकदा शाही शिकार.... पृष्ठ ८ वरून

शिकारीच्या छंदापाई शासनाला फार मोठचा प्रमाणात खर्च करावा लागेल ही पूर्व कल्पना असतानासुद्धा त्या छंदाप्रीत्यर्थ शिकारीला जाणे हे माझ्या दृष्टीने आजच्या परिस्थितीत चुकीचे आहे. सभागृहात प्रत्येक प्रश्नावर शासनातर्फे उत्तर देताना पैसा उपलब्ध नाही म्हणून अमूक अमूक योजना हाती घेतली नाही वा पुरी होऊ शकली नाही असे सांगण्यात येते. तेव्हा या पार्श्वभूमीवर शिकारीचा भार शासनावर टाकणे चुकीचे आहे. तांत्रिकदृष्टचा हा गैरवापर म्हणता येणार नाही परंतु सध्याच्या आर्थिक टंचाईच्या परिस्थितीमुळे नैतिकदृष्टचा तो गैरवापरच म्हणता येईल.

कोणीही शाही शौक करायला हरकत नाही पण त्याचा भार शासनावर कोणत्याहीरितीने पडू नये याची संपूर्ण काळजी घेतली पाहिजे. तसा जर तो पडत असेल तर तांत्रिक कैफियती देऊन त्यातून सुटण्याचा प्रयत्न करणं चुकीचे आहे.

शासनातर्फे मुख्यमंत्र्यांच्या संरक्षणासाठी जो खर्च झाला तो अवास्तव आहे. पण यापुढे तरी मुख्यमंत्रीपदावर असेपर्यंत असा प्रकार होऊ नये याची त्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे.

हा शिकारीचा दौरा ' मल्टि पर्पज ' होता हे मला काही पटलेले नाही. कारण दौऱ्याचा उद्देश जनसंपर्क नव्हताच. मुख्यमंत्री आले की आदिवासी वा अधिकारी त्यांची भेट घेणारच. परंतु यामुळे शिकारीच्या दौऱ्याचे उद्दिष्ट आदिवासींची गाऱ्हाणी दूर करणे हे होऊच शकत नाही. त्यासाठी आदिवासींना भेटण्यासाठी खास दौरे काढून त्यांचे प्रश्न हाताळण्याचा विषेश प्रयत्न झाला पाहिजे.

## श्रीमती मृणाल गोरे (समाजवादी पक्ष)–

मुख्मंत्र्यांच्या खुलाश्याचे तीन भाग आहेत. स्वत: खर्च केला हा एक भाग. सरकारी अधिकारी व पोलीस येणे हा अपरिहार्य भाग होता हा दुसरा आणि जंगलातील आदिवासींना भेटणे हा तिसरा. यातील तिसरा भाग उघड उघडच सारवासारव करणारा आहे. वसंतरावांना आदिवासी वा जंगलातील लोकांना भेटण्याची संधी केव्हाही उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी उथळ खुलाशाच्या भानगडीत त्यांनी पडायला नको होते.

शासनयंत्रणेचा गैरवापर तर निश्चितच झालेला आहे. कारण मुख्यमंत्र्यांच्या संरक्षणासाठी आलेले पोलिसच फक्त तेथे होते असे नाही तर वनविभागाचे चिफ कॉन्झर्वेटस, दोन कॉन्झर्वेटर्स, पाच डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर्स, १० एस. ई. एफ. पंचवीस रेंजर्स, पन्नास दफेदार, दीड-दोनशे फॉरेस्ट गार्डस वगैरे वडा लवाजमाही

तेथे होता. मुख्यमंत्र्यांची शिकार म्हणजे काही वनविभागाचे काम नाही. हा शासन-यंत्रणेचा दुरुपयोग नाही तर काय ?

खर्चाबाबत बोलायचे तर जेवणा-रहाण्याचा खर्च मुख्यमंत्र्यांनी स्वतः केल्याचा निर्वाळा दिला पण कोळश्याच्या जंगलात ३ लाख रुपये खर्च करून रेस्ट हाऊस बांधण्याची काय आवश्यकता होती ? इतर जंगलात अशी रेस्ट हाऊसेस आहेत का ?

मुख्यमंत्र्यांसह कोणत्याही व्यक्तीने शिकारीचा शौक करायला हरकत नाही पण शासनाच्या श्रेष्ठपदी असलेल्या व्यक्तीने अशा शौकाखातर शासनयंत्रणेचा गैरवापर होणार नाही याची डोळयात तेल घालून काळजी घेतली पाहिजे. नाहीतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर त्यांचा वचक कसा रहाणार ?

या गरीब देशात उच्चपदस्थ व्यक्तीने साधेपणाचा आदर्श जनतेसमोर ठेवावा असे गांधीजींचे म्हणणे होते. त्यांच्या नावाचा वेळोवेळी वापर करणारे त्यांचे चेले शाही इतमामाचा शौक करीत आहेत हे योग्य नव्हे.

## श्री. श्री. शं. ऊर्फ काकासाहेब नवरे (ज्येष्ठ पत्रपंडित) –

हे पहा तुमच्या चारी प्रश्नांची उत्तरे संकलितरीत्या देतो. ते एकमेकांशी इतके निगडीत आहेत, की ते वेगवेगळे काढून उत्तरे देणे कठीण जाईल : मुख्यमंत्र्यांनी आपल्या शिकारीच्या छंदाविषयी आणि त्यात आपण पाळीत असलेल्या मर्यादे-विषयी नुकतेच स्पष्टीकरण केले आहे. जोपर्यंत त्याविरुद्ध भरभक्कम पुरावा पुढे येत नाही तोपर्यंत त्यांचे म्हणणे खरे धरून चालण्यास हरकत नाही.

शिकारीचा नाद शाही म्हणून चैनीचा व रिकामटेकडेपणाचा आहे असे मला वाटत नाही. राज्यकारभारातून वेळ काढून मर्दुमकीचे खेळ खेळणे हे पुरुषार्थाचे लक्षण समजले पाहिजे. प्राचीन काळी आपले राजेलोक मधून मधून मृगया खेळायला जात असतच की ! त्यांना राज्यकारभाराची महत्त्वाची कामे नसत असे म्हणता येणार नाही. उलट यामुळे करमणूक होऊन राज्यकारभार करायला उत्साह मिळणे शक्य नाही का ?

जर्मनीचे प्रिन्स बिस्मार्क फावल्या वेळी पोहायला जात तर इंग्लंडचे चर्चिल चित्रे काढीत. तेव्हा राज्यकारभार सोडून भलत्याच गोष्टी त्यांनी केल्या व वेळ फुकट घालविला असे म्हणता येणार नाही. मृगया हा तर शौर्याचा खेळ आहे. क्रिकेट, टेनिस इत्यादी खेळापेक्षा शिकार खेळणे अधिक पराक्रमाचे नाही काय ?

मुख्यमंत्र्यांनी आपला हा शौक तडीस नेताना कोणत्याही निर्बंधांचे उल्लंघन केले नाही असे तेच म्हणतात. येथे अडचण अशी उत्पन्न होते, की सत्ताधीश माणूस खाजगी गोष्टी करू लागला की खाजगी आणि सरकारी क्षेत्रांची इतकी सरमिसळ

होते की त्यांना एकमेकांपासून विलग करणे जड जाते.

शिकारीचे कशाला, निवडणुकीत काय होते ? मंत्री आपल्या सरकारी कामाकरिता सरकारी खर्चाने जातो व प्रचाराचेही काम करतो. मग कोणता खर्च कुठे केला हे सांगणे कठीण जाते. राज्यकारभारातील प्रामाणिकपणा नष्ट झालेला असेल तर या मिश्रणातून दोन्ही गोष्टी वेगळ्या करणे जिकीरीचे ठरते. मंत्री असेही म्हणू शकेल, की मी केवळ निवडणूक प्रचारासाठी फिरलो असतो तर माझे शासकीय काम अडून पडले असते आणि त्या कामात गुंतून पडलो असतो तर निवडणुकीसाठी खटपट करण्याचा माझा लोकशाहीतील हक्क मला बजावता आला नसता. दोन्हीही कामे मी एकाच वेळात व खर्चात केली तर बिघडले कुठे ? हा युक्तिवाद जितका खरा तितकाच फसवाही आहे. येथे माणसाचा प्रामाणिकपणा महत्त्वाचा आहे.

राज्यकारभार आणि शिकार यांचा ताळमेळ बसविणे अशक्य नाही. राज्यकारभारातील आवश्यक त्या गोष्टी करून विश्रांति घेतली तर बिघडले कुठे ?

अगदी मनकवडे असल्याशिवाय यातील चांगले वाईट आपल्याला वेगळे करता येणार नाही.

## श्री. नीळकंठ खाडिलकर (संपादक नवाकाळ)–

प्रश्नाची उत्तरे देण्यापूर्वी वृत्तपत्रासंबंधी थोडे सांगणे आवश्यक वाटते. कुठल्याही नियतकालिकाने गंभीर आरोपकरण्यापूर्वी जबरदस्त तयारीनिशी लेखणी हाती धरली पाहिजे. तसे न केल्यास वृत्तपत्रांविषयीचा वाचकांचा विश्वास उडून जातो. वृत्तपत्रस्वातंत्र्य ही अमोल देणगी आहे. याचा फायदा घेऊन जेव्हा आरोप केले जातात तेव्हा ते वाचकांच्या दृष्टीने सिद्ध करण्याची जबाबदारी लेखक व संपादक यांच्यावर असते. आरोपांचा इन्कार होताच ताबडतोब पुराव्यानिशी तो खोटा पाडता आला पाहिजे. तसे केले तर त्यात जनसेवा तर साधतेच पण वृत्तपत्राचे वजनही अमाप वाढते.

विधानसभेत मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारण्यात आले. व त्यांचा त्यांनी खुलासा केल्यानंतर त्यांच्या एकाही विधानाला आव्हान देण्यात आले नाही. आरोप करणारेच बेजबाबदार आहेत असा समज झाला तर तो दोष कुणाचा ?

नियतकालिकात नुसते खरे लिहून भागत नाही तर ते खरे आहे याची लोकांना पुराव्यानिशी खात्री करून द्यावी लागते. दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक रुपये धाडीत मिळाल्याची बातमी काही दिवसापूर्वी प्रसिद्ध झाली. ती खरी ठरतो तर राजिनाम्याशिवाय गत्यंतरच नव्हते. अशा बातमीचा इन्कार होणार हे उघडच होते. तसा तो झालाच. पण त्यानंतर कोणीही पुराव्यानिशी आव्हान दिले नाही. परिणामी वृत्तपत्रे बेजबाबदारपणे आरोप करतात किंवा ती लाच खाऊन गप्प बसतात असे लोकांना मनातून वाटू लागते.

शिकार प्रकल्पातील आरोप धाड प्रकरणाइतके गंभीर नव्हते पण खळबळ उडविण्याइतके गंभीर खासच होते. असे आरोप तयारीशिवाय करणे म्हणजे बुमरँग सोडण्यासारखे आहे.

व्यक्तिगतरीत्या आपण खर्च करावा की नाही हाही व्यक्तिगत प्रश्न आहे. प्रायव्हेट मोरॅलिटी व पब्लिक मोरॅलिटीची गल्लत करता कामा नये. शिकार प्रकरणातील आरोप सरकारी खर्चाबाबत होता. तो सिद्ध करता येत नसेल तर व्यक्तिगत जीवन तपासण्यात काहीच अर्थ नाही.

मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी ते कशी पार पाडतात हाच सार्वजनिक प्रश्न असतो. ती जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडून त्यांनी सरकारी खर्च न करता कसलाही कायदेशीर शौक केला तर त्यात लक्ष घालण्याचे कारण नाही. किंबहुना व्यक्तिगत टीका हा टीकेचाप्रकार अत्यंत हीन गणला गेला पाहिजे.

मुख्यमंत्र्यांच्या खुलाशानंतर जो पर्यंत त्याला आव्हान दिले जात नाही तोपर्यंत आरोप करणारे बेजबाबदार आहेत असे अनुमान निघते व तेच मनाला पटते.

एखादा दौरा विविध उपयोगी असू शकतो का ! मुंबईहून पुण्याला पहिल्या वर्गाने विश्रांतीसाठी जाणारा एखादा पत्रकार गाडीत चांगली बातमी मिळवू शकतो किंवा एखाद्या विषयाची तयारी करू शकतो. टीका दौऱ्यावर होऊ शकत नाही. दौऱ्याच्या दुरुपयोगावर झाली पाहिजे. तशी ती येथे झाली पण ते सिद्ध करण्यात आले नाही. अशा वेळी हा लेखणीचा व वृत्तपत्र स्वातंत्र्याचा दुरुपयोग झाल्यासारखे होईल.

वृत्तपत्र स्वातंत्र्य हे सदोदित धोक्यात असते. जोपर्यंत वृत्तपत्र स्वातंत्र्याचा सदुपयोग केला जातो तोपर्यंतच हा धोका टाळता येतो नाहीतर क्षणात काढून घेता येईल असे हे स्वातंत्र्य एक दिवस खरोखरीच नाहीसे होईल व आवाज उठवायलाही मग संधी मिळणार नाही.

## श्री. मधू शेटये (फ्री प्रेस जर्नल, वार्ताहर) –

मुख्यमंत्र्यासारख्या अधिकारावरील व्यक्तीने शिकारीसारखा शाही शौक करू नये. संपूर्ण वेळ जनसेवेसाठी देत असणाऱ्या राज्यकर्त्यांना विश्रांती घेण्याची आवश्यकता नाकारता येणार नाही. शासनाच्या जबाबदाऱ्या इतक्या वेळखाऊच असतात, की सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांना त्यांच्या वैयक्तिक वा कौटुंबिक जीवनाला पारखे व्हावे लागते. अशावेळी विश्रांतीची अपार आवश्यकता असते हे मान्य व अशी विश्रांती स्वखर्चाने वा मंजूर अशा शासकीय खर्चातून करणे वावगे नाही. पण कोणत्याही प्रकारची उधळपट्टी होऊ न देता हे झाले पाहिजे. पण आजच्या लोकशाहीच्या व समाजवादाच्या काळात शिकारी सारखे शाही शौक हे गैरलागूच नव्हेत तर गुन्ह्यास पात्र ठरविले गेले पाहिजेत. असे शौक सरंजामशाही

युगास साजेसे आहेत. लोकशाही समाजवादाच्या गप्पा मारणाऱ्या तोंडी तर ते बिलकूल शोभत नाहीत. गरिबी हटावोची घोषणा करणाऱ्यांनी शिकारीचे विलास शासकीय खर्चाने करावेत व जनतेत याबाबत संतापाची प्रतिक्रिया उमटू नये, ही बाब पुरोगामी विचाराच्या कार्यकर्त्यांना चिंतनीय वाटते. दोन शतके औद्योगिक क्षेत्रात मागासलेल्या आपल्या देशाला केवळ गरिबीच हटवायची नसून अणु युगातील राष्ट्रांशी स्पर्धा करायची आहे. अर्थरचनेच्या गतिमानतेचा वेग प्रचंड प्रमाणात वाढणे आवश्यक आहे. हे साध्य करायचे असल्यास नेतृत्व, विशेषत: शासकीय नेतृत्व साऱ्या राष्ट्राला दिव्य आणि त्यागी व आत्मसमर्पिततेचा आदर्श देणारे पाहिजे. पण हे घडत नाही. लोकशाहीला सूज चढली आहे.

मुख्यमंत्र्यांनी विश्रांती जरूर घेतली पाहिजे पण ती शिकारीच्या शाही माध्यमातून नव्हे आणि म्हणूनच म्हणावसे वाटते, की आदिवासींच्या प्रश्नाची उकल करण्यासाठी शिकारीचे माध्यम हाही एक शाही Excuse चा प्रकार आहे.

□

अशी ही एका मुक्तचिंतनावरील मुक्त चर्चा.

मुख्यमंत्र्यांनी आता मर्दपणे जाहीरच करून टाकलेले आहे, की 'शिकार मी माझ्या खर्चाने करतो आणि यापुढेही करणार!' (पहा–मराठा, ११ जुलै) तेव्हा अशा मुक्तचिंतनाचा आणि मुक्तचर्चेचा उपयोग काय हाही प्रश्नच आहे. तरीपण आणखी एक वरील चर्चेत न आलेला मुद्दा असा : गेल्याच वर्षी महाराष्ट्रात अकलुजचे आमदार श्री. शंकरराव मोहिते यांच्या लक्षभोजनाचे प्रकरण थेट दिल्लीपर्यंत गाजले. ही लक्षभोजने शंकरराव मोहिते यांनी अर्थातच सरकारी पैशाने घातलेली नव्हती. हे माझे खाजगी कार्य आहे व पुढचे कार्य यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर मी करणार आहे, असे त्यांनीही मर्दपणे ठणकावून सांगितल्याचे वृत्तपत्रात त्यावेळी प्रसिद्ध झालेले होते. तरी हे लक्षभोजन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना आक्षेपार्ह वाटले. इदिराजींना आक्षेपार्ह वाटले म्हणून अर्थातच मा. यशवंतराव चव्हाण यांनाही ते आक्षेपार्ह वाटले. मा. यशवंतरावजींना आक्षेपार्ह वाटले म्हणून अर्थातच मा. वसंतराजींनीही त्यावेळी त्याबद्दल नाराजी दाखवली. खाजगी असले तरी संपत्तीचे हे असंस्कृत प्रदर्शन ठरले, सरंजामशाहीयुगाचा हा आविष्कार ठरला, अशा समाजवादाशी विसंगत वाटणाऱ्या समारंभावर बहिष्कार पुकारण्याचे फतवे निघाले, वरपासून खालपर्यंत आक्षेपच आक्षेप; सर्वत्र नुसती टीकेची, नापसंतीची झोड उठली. आता हे आक्षेप, ही टीका, ही नापसंती चुकीची होती, गैरसमजावर आधारलेली होती, असे समजण्यास हरकत नाही. शाही शिकार समाजवादाच्या कक्षेत बसू शकते तर लक्षभोजनेही तशी का बसू नयेत?–संपादक

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

[ मुखपृष्ठ २ वरून ]

रहाळकर, विजय कान्हेरे, प्रफुल्ल बिडवई, शिवराम जटाळे आणि स्थानिक तरुण कार्यकर्ते यांनी या कार्यक्रमाकरता परिश्रम घेतले. मारहाण, पोलिसी दडपशाही, कस्टडीत विजेचे शॉक देऊन कबुलीजबाब घेतल्याच्या बातम्या, कोर्टकचेऱ्या या सगळ्यामधून आदिवासींना जागे राहून, शांतपणे पण खंबीरपणे प्रतिकार करण्याची दृष्टी आली.

मार्चमधल्या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा कार्यक्रमसुद्धा चांगला यशस्वी झाला. आदिवासींच्या तक्रारी सोडवणे, त्यांना संघटित करणे, शिक्षण, दारू याबाबत जाणीव करून देणे याकरता सहा केंद्रे खेड्यापाड्यात उभी झाली. छोटे छोटे सत्याग्रह झाले. श्री. एस. एम. जोशी, रा. कृ. पाटील, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बाबा आमटे यांनी भेटी देऊन कामाबद्दल समाधान दाखवले.

एक मेच्या कामगारदिनी दहा हजारांची प्रचंड सभा शहाद्यात झाली. सालदारांचे साल वाढवून मिळावे, मजुरी वाढवावी अशा घोषणांवर कार्यक्रम आखला गेला. रायखेड, तराडी, परिवर्धा वगैरे अनेक जागी संप झाले. पडिक जंगल जमिनी ताब्यात घेतल्या गेल्या.

आतापर्यंत ३००० एकर जमीन आदिवासींना परत मिळाली आहे. सालात ५०-१०० रुपयांनी वाढ झाली, मजुरी वाढली आणि मुख्य म्हणजे आदिवासी जागा झाला. तो संघटित होऊन मानाने जगण्याकरता उभा राहीला.

तेथला छळ आणि अन्याय संपावा याकरता आपण येथूनही काही करू शकता. तेथे काम करणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांचा जेवणाखाणाचा खर्च आहे, थोडासा कोर्टकचेऱ्यांचा खर्च आहे. स्थानिक पैसे उभे करण्याचा प्रयत्न चालू आहेच; पण भुकेलेल्या आदिवासींकडे मागणार तरी किती? म्हणून शहाद्यातल्या कामाकरता आपण आर्थिक मदत करावी व छळ आणि दारिद्र्य यांच्याविरुद्धच्या या लढाईत आपला वाटा उचलावा अशी आपल्याला विनंती आहे. आपल्या इच्छेनुसार काही सहाय्य दरमहाप्रमाणे करावे. त्यासाठी पत्ते खाली दिले आहेत.

आपले

| | | |
|---|---|---|
| १. अण्णासाहेब सहस्रबुद्धे | ४. गं. बा. सरदार | ७. अरविंद लेले |
| २ वि. म. दांडेकर | ५. ग. प्र. प्रधान | ८. यदुनाथ थत्ते |
| ३. एम्. एम्. जोशी | ६. नरूभाऊ लिमये | |

| | | |
|---|---|---|
| १. सुधीर बेडेकर<br>'मागोवा'<br>१२५९/२ जं. म. रस्ता,<br>पुणे ४ | २. बालमोहन लिमये<br>३६, स्नेहसदन<br>कुलाबा पोस्टासमोर<br>कुलाबा, मुंबई ५. | ३. संयोजक<br>ग्रामस्वराज्य समिती<br>सर्वोदय छापखाना<br>शहादा, जि. धुळे |

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

कमरेला लंगोटी किंवा लज्जारक्षणासाठी स्त्रियांनी गुंडाळलेले एखादे सुडके, वर्षातून दोन महिने मिळाली तर खायला नागली, नाहीतर जंगलातील कंदमुळे; वैद्यकीय मदतीचा अभाव, शिक्षणाचे नावच नको. मलेरियामुळे मोठ्या झालेल्या प्लीहेने पुढे आलेली पोटे घेऊन शेंबडी, घाणेरडी, हातापायाच्या काड्या झालेली त्यांची मुले. डोळ्यांत तेज नाही, चेहऱ्यावर आशा नाही अशा प्रकारचा हा तथाकथित मानवी समूह आमच्याभोवती वावरत आलेला आम्ही लहानपणापासूनच पाहात होतो.......

—डॉक्टर सुधीर फडके

# कोठे आणि कधीतरी

आदिवासींच्या जीवनाशी
समरस झालेल्या
एका विठू मास्तरची कहाणी